
दिनांक
१५ डिसेंबर १९७३

किमत
एक रुपया

चित्र वार्ता पुस्तक

# माणूस



# माणूस चित्र वार्ता पुस्तक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| दिनांक | किंमत | अंक |
|---|---|---|
| १५ डिसेंबर १९७३ | एक रुपया | दहावा |



मुक्काम पुणे

ज्या दिवशी या इंद्रायणी तीर प्रथमांकाचे प्रकाशन झाले त्याच दिवशी रात्री तळेगाव जनरल हॉस्पिटलचे संस्थापक, प्रख्यात नेत्र विशारद डॉ. दि. स. सरदेसाई यांचे निधन झाले. इंद्रायणी महाविद्यालयाचे डॉ. सरदेसाई हे पदाधिकारी नव्हते. तरी केवळ त्यांच्या सक्रीय प्रोत्साहनामुळे इंद्रायणी महाविद्यालय सुरू होऊ शकले व आजतागायत त्याची सतत वाढ होत राहिली. यामुळे या संस्थेच्या वतीने डॉ. सरदेसाई स्मृतीविशेषांक प्रकाशीत करण्याचे ठरले व त्याप्रमाणे गेल्या ३० नोव्हेंबरला श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या हस्ते या अंकाचे यथोचित प्रकाशन झाले. याप्रसंगी भाषण करताना सौ. जयश्रीबाई वैद्य. श्री. वसंतराव वैद्य व सौ. जयश्रीबाई हे उभयता संस्थेचे जणू संपन्न माहेरच आहे.




ग. दि. मा. यांच्या हस्ते 'इंद्रायणीतीर' या तळेगाव येथील इंद्रायणी महाविद्यालयाच्या नियतकालिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन गेल्या महिन्यात झाले. या अंकासाठी ग. दि. मांनी लिहिलेला अभंग.

इंद्रायणी तीरीं, माती झाली कृपा
ज्ञानदेव, तुका, वावरले.
वावरल्या ओव्या, गीता हो मराठी
झाले लोकांसाठी, ज्ञान सोपें.

सोप्या ज्ञानाच्या वाटा, जन्मसार्थकाच्या
ज्ञानोबा तुकोच्या, ज्ञानदानें
ज्ञानदान हेंचि, घेऊनिया व्रत
वाहतसे शांत, इंद्रायणी

ग० दि० माडगूळकर




ठाण्याकडे जाणाऱ्या दोन लोकल कॅन्सल. तिसरी आली तीच पॅक होऊन. त्यावेळी छायाचित्र काढले असते तर स्वतंत्र माणूसच दिसला नसता. म्हणून एक लोकल जाऊ दिली व लगेच मध्य रेल्वेच्या दादरच्या तीन नंबर प्लॅटफॉर्मवर कॅमेरा लावला. तरी माणसांचा हा थवा !

# अशी मुंबई.. धुमश्चक्री मुंबई

छाया : मोहन नावेलकर

गाडी आली आणि एकच धुमश्चक्री उडाली. जिवंत राहिले ते घरी गेले असावेत. बाकी प्लॅटफॉर्मवर परत उरले.



मुंबईकर दुष्काळातून सहीसलामत सुटले म्हणे ! निदान महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची तरी हीच भावना आहे. दुष्काळात मुंबईकरांनी सोसलं ते सोसलं. क्वचित त्याविरुद्ध आवाजही फुटला.

पण आज मुंबई धुमसते आहे. कोणत्या क्षणी स्फोट होईल हे सांगता येत नाही. त्याची कारणे अनेक आहेत. पण नैमित्तिक कारण झाले आहे रेल्वेमधील संपाचे. मध्य व पश्चिम या दोन्ही रेल्वेच्या सिग्नल व टेलिकम्युनिकेशन्स खात्यातील कर्मचाऱ्यांची 'गो स्लो' संप पुकारला आहे. यामुळे विस्कळीत झालेली मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था लोकांच्या गेल्या वर्षभर चिघळत असलेल्या महागाई–टंचाई वगैरे दुःखांचा एखादे वेळी स्फोटही घडवून आणील.

गेल्या काही दिवसांतील येथील वृत्तपत्रांतील बातम्या तेच बोलताना दिसतील.



के. ई. एम. मधील परिचारिकांनी संप पुकारला. कारण असुरक्षितता. गेल्या दोन महिन्यात तीन परिचारिकांवर हल्ले झाले. एक परिचारिका नंतर पाच दिवस बेशुद्ध होती.




टॅक्सीवाल्यांनी भाव वाढवून घेतले. तरीही संप पुकारला.

■ ■ ■

या मुंबईचे आकर्षण कुणाला नाही ? माणूस एकदा मुंबईला आला की मुंबईचाच होतो. आधी तो मुंबई सोडीत नाही. नंतर मुंबई त्याला सोडीत नाही. मग हे भिकारी तरी त्याला अपवाद कसे ?




त्याचबरोबर झोपडपट्टीही वाढत आहे. मुंबईत रस्त्याचा एक फूटपाथ नसेल की जेथे झोपडी नाही.






जिथे झोपडी नसेल तेथे फेरीवाले असतात. मग या रस्त्यावरून प्रवासी चालणार कोठे व मोटारी जाणार कशा ?


मग संध्याकाळी लोकं कामावरून घरटचात परततात तेव्हा याच रस्त्यांवरून अशी एक जत्रा होते. लोक कावतात, वैतागतात. पण तरीही रोज सकाळी उठून कामाला जातात व संध्याकाळी परत येतात. कारण ?...





कारण....मुंबईला एक लोभसवाणे रूप आहे. येथे नरीमन पॉईंटवर या स्कायस्क्रॅपर्सच्या रूपाने ते उभे राहात आहे.

याच रूपाचा हा दुसरा एक भाग. मुंबईच्या अरुंद झालेल्या रस्त्यावरून मोटरींचे ताफेच्या ताफे फोर्टाकडे येत-जात असतात. ते सगळेच कामात असतात असं नाही (कारण मुंबईची प्रमुख शॉपिंग एरियाही फोर्टातच आहे.) याचे प्रत्यंतर घ्यायचे असेल तर एकाद्या सिग्नलपाशी थांबून या गाड्यांतून डोकावयाला हवे. त्यातील बहुतेकांत तुम्हाला सुंदर रमणी, पुरंध्री वगैरे बसलेल्या दिसतील !






एक मान्य करावयाला हवे की, मुंबईच्या या प्रचंड विषमतेत खऱ्या समानतेने वापरले जात असेल तर ते संपाचे हत्यार. व्हाइट कॉलर, फ्लॅटमध्ये राहाणारे साहेबलोक असोत वा चाळी-झोपड्यांतून राहणारे कामगार लोक असोत ते सारख्याच प्रभावीपणे हे हत्यार वारंवार वापरतात आणि मुंबईचे आधीच बकाल अव्यवस्थित जीवन अधिक बिकट करतात.


आता हा सामान्य माणूस कोण ! हे विचारू नका. कारण तो येथे समूहरूपाने जगतच नाही. तो येथे व्यक्तिशः जगतो. तो ज्या क्षणी समूह रूपात येईल, त्याच दिवशी या त्रस्त मुंबईत... या धुमसत्या मुंबईत एक स्फोट घडेल.

या स्फोटाची आपण सारेच वाट पाहात अहोत.



पण या कशाकशाचीच कल्पना नसलेली,
आपल्याच राज्यात मस्त असणारी ही
बाल-गोपाळ सेना कशाची वाट पाहात आहे ?
....त्यांचं वाट पाहणं तरी निराळं असू द्या.


मानवतच्या खूनीला लाजेने मान खाली घालायला लावणारे बडे खून!
इंधण
TAXI


गोदी संप
विमा संप

# ॥ असे म्हणाला झरथुष्ट्र ॥

फ्रेडरिक नित्शे । अनुवाद : श्याम मनोहर

त्या वेळचा प्रशियाचा राजा चवथा फ्रेडरिक विल्यम ह्याचा १५ ऑक्टो. हा वाढदिवस. शाही घराण्यात शिक्षकाचे काम करणाऱ्या नित्शेच्या वडलांनी आपल्या मुलाचे नावही फ्रेडरिक विल्यम असे ठेवले. फ्रेडरिक नित्शेने आपल्या आत्मवृत्तात लिहिलेय : 'माझ्या लहानपणी माझा वाढदिवस सार्वजनिक उत्सव म्हणून आपोआपच साजरा होत असे.'

वयाच्या पंचविसाव्या वर्षी स्वित्झर्लंडमधील वासल विद्यापीठात भाषाशास्त्राचा प्राध्यापक म्हणून नेमणूक.

तिथून ऱ्होड ह्या मित्राला नित्शेने पत्र लिहिले : 'भाषाशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम करताना मला अधिकाधिक कठीण होत आहे. भाषाशास्त्रज्ञ मी होऊ शकेन की नाही ह्याची मला शंकाच वाटते. धोका हा : माझ्यापुढे आदर्श नाही...'

शॉपेनहॉवर वाचणे हा एक आधार होता. – 'शॉपेनहॉवर जणू काही व्यक्तीशः मलाच उद्देशून बोलतोय्'

दुसरा विसावा संगीत. – 'संगीताशिवाय जीवन म्हणजे एक घोडचूक.'

मैत्री, नाती–दुरावली. व्याधिग्रस्त शरीर, संपून गेलेल्या श्रद्धा – वयाच्या अठराव्या वर्षीच ख्रिश्चन श्रद्धा आणि परमेश्वर ह्यावरचा विश्वास साफ उडाला होता–

१८७९ : प्राध्यापकपदाचा राजीनामा.

शरीराला आणि मनाला मानवेल अशा जागेचा, हवेचा शोध घेत जर्मनी, इटली, स्वित्झर्लंडमधून भटकंती. आत्यंतिक एकाकीपणा. शरीर अधिकच खचलेले.

१८८६ मध्ये त्याने बहिणीला पत्रातून लिहिले : 'एखाद्या परक्याप्रमाणे आणि वाळीत टाकलेल्याप्रमाणे मी लोकांतून वावरतोय. कुणाचा एक शब्द वा एखादा दृष्टीक्षेपही माझ्यापर्यंत पोचत नाहीय्. मी मुका झालोय् – ज्याला खूप काही सांगायचंय् त्याच्यावर गप्प राहायची पाळी – किती भयंकर!'

१८८९ मध्ये अखेरचा झटका आला. मनावरचा ताबा पूर्ण गेला.

ठार वेडातच १९०० साली मृत्यू.

✤

नित्शेच्या लिखाणाचे आघात त्याच्या पश्चात जाणवले. नित्शेचे ग्रंथ व त्यातील राजकीय, सांस्कृतिक विचारसरणी नात्झीसारख्या अतिजहाल, राष्ट्रवादी, वंशवादी संघटनांकडून मार्गदर्शक व आदर्श म्हणून वापरली गेली...इतकी की त्याचे ग्रंथ एका हुकूमशहाकडून दुसऱ्या हुकूमशहाला समारंभपूर्वक भेट म्हणून दिले जात. हिटलरची निर्मिती ही नित्शेच्या विचाराचे फळ होय, असेही काही इतिहासकार मानतात. नात्झी संघटनेने नित्शे विकृतपणे वापरला असाही प्रतिवाद काही इतिहासकार करतात. ख्रिश्चॅनिटीचा प्रखर विरोधक म्हणून युरोपमध्ये आणि लोकशाही व समाजवाद ह्याचा कटवट टीकाकार म्हणून इतरत्र नित्शे बराच बदनाम पावला. नित्शेच्या राजकीय विचारांना आजच्या काळात वारसदार मिळणे कठिणच.

अशा अविश्वासाने नित्शेच्या विचारांचे विश्लेषण करूनही, विसाव्या शतकाच्या मूलभूत समस्या जाणणारा व त्यांचे उत्तर शोधण्यासाठी शारिरीक व मानसिक शक्तींची किंमत मोजणारा एक तत्त्वज्ञ म्हणून नित्शेचे स्थान तत्त्वज्ञानाच्या इतिहासकारांनी मान्य केलेले आहे.

'आपल्या अस्तित्त्वाला अर्थ आहे काय? असा एखादा अर्थ निर्माण करता येईल का? ज्यासाठी जगावे असे आपण काही निर्माण करू शकू काय?'

– आजच्या युगातल्या ह्या पिळवटून टाकणाऱ्या प्रश्नांची चिरफाड करण्यास नित्शेने प्रारंभ केला.

परंपरागत मूल्ये निःसत्त्व होत जाणार, मानवी जीवनात अपूर्व पोकळी, शून्यता येणार – ह्या जाणीवेने नित्शे अक्षरशः बेभान झाला होता.

सर्व मूल्यांचे पुनर्मूल्यमापन करायची व मानवासाठी नवी मूल्ये निर्माण करायची नित्शेला इतकी निकड लागली होती– की तेच त्याने स्वतःचे जीवित कार्य मानले.

'परमेश्वराचा अंत झाला" ह्या रूपका द्वारे नित्शेने विसाव्या शतकात होणाऱ्या मूल्यांच्या ऱ्हासाचे, शून्यवादाचे विश्लेषण करायचा प्रयत्न केला.'

परमेश्वराचा अंत झाला आणि माणूस स्वतंत्र झाला. तितकाच तो निराधार झाला. माणसाचे मग भवितव्य काय?

नित्शे म्हणतो : 'मानवजातीने आता अव्याहतपणे महान् मानव निर्माण करण्यासाठी धडपडावे; तेच आणि केवळ तेच मानवजातीचे कर्तव्य...

...अतिमानव हाच पृथ्वीचा अर्थ.

...माणसाने आता स्वतःलाच पार करावे."

ह्या अतिमानवाची लक्षणे तपासताना नित्शेने निष्कर्ष काढला : "जे जे सामर्थ्यातून जन्म पावते ते ते शिव आणि जे जे दौर्बल्यातून निर्माण होते ते ते अशिव."

ह्या प्रमेयावरून नित्शेने नव्या मूल्यांचा, नव्या नीतिशास्त्राचा वेध घेतला. त्याने जे निष्कर्ष काढले ते धक्कादायक आहेत. नित्शेने युद्धाचे जोरदार समर्थन केले. माणसातला भेकडपणा नष्ट होण्यासाठी, मानवातून अतिमानव उत्क्रांत होण्यासाठी, मानवातल्या हिंस्र प्रेरणांचे उन्नयन होण्यासाठी पुनः पुनः युद्धे होणे जरूर आहे. मानवातल्या पशुतुल्य प्रेरणांचा कस लागण्यासाठी माणसाने स्वतःच शिकारीचा पशू होणे जरूर आहे, तेव्हाच पूर्ण मानव निर्माण होण्याची शक्यता उपलब्ध होईल असे त्याचे प्रतिपादन होते. कारण, नित्शेच्या मते, पूर्ण मानव म्हणजे पूर्ण पशूही.

नित्शेचे निष्कर्ष जसेच्या तसे मान्य होणे

अवघडच. पण नित्शेने विसाव्या शतकातल्या परंपरागत मूल्यांच्या ऱ्हासाची, परमेश्वराच्या अंताची आणि त्यामुळे माणूस एका अर्थी स्वतंत्र आणि दुसऱ्या अर्थी निराधार होण्याच्या प्रक्रियेची जी कठोर चिकित्सा केली, त्या चिकित्सेचे परिणाम दुसऱ्या एका बाजूने झाले–माणसाला आपल्या उघडचा वागडचा प्रेरणांची जाण आली, स्वेच्छेचा अनुभव आला. अँद्रे जीद् हा प्रसिद्ध लेखक आत्मचरित्रात लिहितो : 'नित्शेने आमच्या प्रेरणांना शिकवायचे कसे ते शिकवले. मला स्वतःला नीट जुळवून घ्यायला मदत केली.'

नित्शेच्या ह्या विचारप्रवाहाचे परिणाम वाङ्मय, कला, मनोविज्ञान, संस्कृति शास्त्र ह्यात प्रकर्षाने उमटले. फ्राईड, अॅडलर, श्वायत्झर, शॉ, थॉमस मान, रिल्के इ. मानसवैज्ञानिक, संस्कृतिशास्त्रज्ञ, लेखक, कवी यांनी नित्शेचे हे ऋण मान्य केलेय्. ही यादी काम्यू, सार्त्र ह्या 'अस्तित्ववादी तत्त्वज्ञा'-पर्यंत वाढवता येईल.

–हरघडी आंतरिक भयाने व्याकूळ होणाऱ्या विसाव्या शतकाच्या नागरिकाला नित्शेच्या विचारांशी ताडून पाहाणे मैत्रीचे वाटेल; कारण नित्शे जीवनाला होकार देतो.

नित्शेचा मानसपुत्र झरथुष्ट्र म्हणतो : "ह्या पृथ्वीशी प्रामाणिक राहा आणि जे पारलौकिक आशा दाखवितील त्यांच्यावर विश्वास ठेवू नका."

"असे म्हणाला झरथुष्ट्र" ह्या ग्रंथात प्रेषिताप्रमाणे नित्शेने आपले विचार काव्यमयतेने, अत्यंत तीव्र, लाटांप्रमाणे बेबंदपणे गुंफलेत.त्यातील दोन प्रवचनाचा हा अनुवाद. ✤

## १ : रात्र–गीत

रात्र झालीय आत्ता उसळून वाहणारे सारे झरे अधिक मोठ्याने बोलतात. आणि माझा आत्माही उसळणारा एक झरा आहे.

रात्र झालीय : आता फक्त प्रेमिकांची गाणीच जागी असतात. आणि माझा आत्मादेखिल प्रेमिकाचेच एक गीत आहे.

कधीही शांत न झालेली, कधीही शांत न होण्याजोगी अशी एक गोष्ट माझ्यात आहे : ती उच्चार शोधतेय. प्रेमासाठी असलेली एक इच्छा माझ्यात आहे. आणि ती प्रत्यक्ष प्रेमाची भाषा बोलतेय.

मी प्रकाश आहे : अरे, मी रात्र असतो तर! पण माझा हा एकाकीपणा प्रकाशाने वेढला जाण्यासाठी आहे.

अरे; मी रात्रीप्रमाणे दाट अंधार असतो तर! मी प्रकाशाच्या स्तनांशी कसे पिऊ शकलो असतो!

आणि हे चिमुकल्या, चमचमणाऱ्या ताऱ्यांनो, उंचावरच्या काजव्यांनो, मी तुम्हालादेखिल आशीर्वाद देईन आणि प्रकाशाच्या देणगीने तुम्ही धन्य असाल!

पण मी आपल्या स्वतःच्या प्रकाशात जगतो, माझ्यापासून उफाळणाऱ्या ज्वाळा पुनः मी पितो.

घेणाऱ्याचा आनंद मला माहित नाही. आणि मला वारंवार असे वाटत आले आहे की घेण्यापेक्षा हळूच चोरणे अधिक मधूर असावे.

हे माझे दारिद्र्य की द्यायला माझा हात कधी थकत नाही, ही माझी जळजळ की मी अभिलाषी डोळे आणि वासनांच्या प्रकाशित रात्री पाहातो.

रे दात्याच्या दुःखा! रे माझ्या सूर्याच्या ग्रहणा! गे वासनांसाठी असलेल्या वासने! आकंठ तृप्तीमधूनही उफाळत राहाणाऱ्या भुके!

ते माझ्याकडून घेतात : पण मी त्यांच्या आत्म्याला स्पर्श करतो का? देणे आणि घेणे ह्यामध्ये एक फट असते; आणि ती सर्वात लहान फटच अखेरीस जोडून टाकायची असते.

माझ्या सौंदर्यातून एक भूक निर्माण होते : ज्यांना मी प्रकाशित करतो त्यांना मी आनंदाने इजा करीन; ज्यांना मी माझ्या भेटी देऊन टाकल्यात; त्यांना मी आनंदाने लुटीन. अशाप्रकारे मी दुष्टपणासाठी भुकेला आहे.

हात मिळवणीसाठी एखादा हात पुढे सरसावलेला असता माझा हात मागे घेणारा; कोसळायच्या वेळी क्षणभर थांबणाऱ्या धबधब्याप्रमाणे का कू करणारा अशाप्रकारे मी दुष्टपणासाठी भुकेला आहे.

माझे वैपुल्य अशा सूडाचे चिंतन करते; माझ्या एकाकीपणातून अशी दुष्टेच्छा उफाळून वर येते.

माझा देण्यातला आनंद देण्यानेच मरून गेला. माझा सद्‌गुण खुद्द त्याच्याच वैपुल्याला वैतागून गेला.

जो देतो त्याला नेहमीच आपली लाज गमावली जाण्याचा धोका असतो.

जो नेहमी वाटून टाकीत असतो; त्याचे हृदय आणि हात कठोर बनतात ते त्याच्या वाटून टाकण्यामधूनच.

जे भीक मागतात त्यांची लाज वाटून इतःपर माझे डोळे भरून येत नाहीत; माझे हात इतके टणक झालेत की त्यांना भरलेल्या मुठींची थरथर जाणवत नाही.

रे देणाऱ्याच्या एकाकीपणा! प्रकाशणाऱ्याच्या एकाकीपणा! माझ्या डोळ्यातले अश्रू कुठे गेले? माझ्या हृदयाची मृदुता कुठे गेली?

उजाड अंतराळात कित्येक सूर्य फिरतात : जे जे अंधारलेले असते त्याच्याशी ते प्रकाशाने बोलतात. माझ्याशी ते गप्प असतात.

जे प्रकाशते त्याच्याशी प्रकाशाचे हेच ते शत्रुत्व! निर्दयपणे प्रकाश आपला मार्ग आक्रमितो.

जे प्रकाशते त्याच्याशी निष्ठूर, सूर्याशी थंड–अशाप्रकारे प्रत्येक सूर्य मार्ग आक्रमितो.

वादळाप्रमाणे सूर्य आपले मार्ग आक्रमतात. असेच असतात त्यांचे प्रकाश. ते आपली कठोर इच्छा अनुसरतात–असा असतो त्यांचा थंडपणा.

अरे, हे एकाक्यांनो, काळ्या ठिक्करांनो, रात्रीच्यांनो, तुम्हीच फक्त त्या प्रकाशणाऱ्यापासून ऊब काढून घेता! होय, प्रकाशाच्या कासेतले दूध आणि ताजेतवाणेपणा तुम्हीच फक्त पिता!

अरेरे, माझ्यासभोवती सगळीकडे बर्फ आहे, ह्या बर्फाळपणाला स्पर्शिल्याने माझा हात जळतोय! अरेरे, माझ्यात एक तहान आहे, जी तुमच्या तहानेसाठी धपापते आहे!

रात्र झालीय : अरेरे, मी प्रकाश व्हायला हवे!–आणि जे रात्रीचे आहे आणि एकाकीपणाचे आहे त्यांची तहान!

रात्र झालीय : आता झऱ्याप्रमाणे माझी इच्छा उफाळतेय. मी बोलू इच्छितो.

रात्र झालीय् : आता उसळून वाहणारे सारे झरे अधिक मोठ्याने बोलतात आणि माझा आत्माही उसळणारा एक झरा आहे.

रात्र झालीय् : आता फक्त प्रेमिकांची गाणीच जागी असतात आणि माझा आत्मासुद्धा प्रेमिकाचेच एक गीत आहे.

असे गायला झरथुष्ट्र.

✤

## २ : नृत्य–गीत

एका रात्री झरथुष्ट्र आपल्या शिष्यांबरोबर जंगलातून चालला होता आणि तो जेव्हा एका झऱ्याजवळ पोचला; काय आश्चर्य बघा ! तिथे त्याला एक हिरवेगार, निस्तब्ध कुरण आढळून आले. सभोवती झाडे, वेली होत्या. तिथे काही युवती समूह-नृत्य करीत होत्या. त्या युवतींनी झरथुष्ट्राला ओळखले मात्र, लगेच त्यांनी नृत्य थांबवले; पण झरथुष्ट्र मैत्रीच्या भावनेने त्यांच्याजवळ गेला आणि हे शब्द बोलला :

हे सुंदर युवतींनो, नृत्य थांबवू नका. दुष्ट नजरेचा–कुणी खेळ बिघडवून टाकणारा, युवतींचा कुणी शत्रू आलेला नाही.

सैतानासमोर ईश्वराची बाजू उचलून धरणारा मी आहे. सैतान म्हणजे साक्षात् जडत्वाचे मूलतत्त्व. हे चपल-चरण युवतींनो, अलौलिक नृत्यांचा वा युवतींच्या नाजुक नुपुरांनी सजलेल्या चरणांचा मी वैरी कसा असेन ?

खरोखर मी जंगलासारखा आणि श्यामल वृक्षांच्या छायेसारखा आहे, पण ज्याला माझ्या अंधाराचे भय वाटत नाही, त्याला माझ्या सायप्रस वृक्षाखाली गुलाबांनी फुललेले काठ गवसतील.

आणि निःसंशय त्याला युवतींचा सर्वांत प्रिय असा लहानसा ईश्वरसुद्धा तिथे गवसेल : तो झऱ्याजवळ पहुडला आहे, शांत, पापण्या मिटून.

खरोखर, दिवसाढवळ्या तो गाढ झोपी गेलाय्. आळशी कुठला ! त्याने फुलपाखरांचा बराच वेळ पाठलाग केला की काय ?

हे सुंदर नर्तकींनो, त्या लहानग्या ईश्वराला प्रायश्चित्त देऊन मी शुद्ध करून घेतो म्हणून माझ्यावर रागावू नका ! तो रडेल, ओरडेल, ह्यात शंका नाही–पण त्याच्या डोळ्यात अश्रू असतात तेव्हादेखील तो हास्यास्पदच असतो.

आणि अश्रूपूर्ण डोळ्यांनी तो तुम्हाला नृत्यासाठी विनवणी करील; आणि त्या नृत्यासाठी मी स्वतः एक गीत गायीन :

एक नृत्य-गीत, जडत्वाच्या मूलतत्त्वाची थट्टा करणारे गीत. जडत्वाचे मूलतत्त्व म्हणजे माझ्या दृष्टीने सैतानांचा सैतान, त्याला ते म्हणतात, ' जगाचा स्वामी '–

आणि त्या युवती व मदनराजा एकत्र नृत्य करू लागले तेव्हा झरथुष्ट्र हे गीत गायला.

हे जीवन-स्त्रीये, खूप उशीरा मी तुझ्या डोळ्यात पाहिले ! आणि मला वाटले की, खोल अनंतामध्ये मी बुडून गेलोय्.

पण मला तू आपल्या सोनेरी गळाने बाहेर ओढून काढलेस. मी तुला अनंत म्हटले, तेव्हा तू मला थट्टेने हसलीस.

'सगळे मासे असेच म्हणतात,' तू म्हणालीस; 'त्या माशांना जे मोजता येत नाही, त्याला अनंत म्हणतात.'

तथापी मी चंचल आहे आणि उनाड आणि सर्वस्वी एक स्त्री आणि सद्गुणीही नाहीय्–

–जरी तुम्ही पुरुष मला 'खोल' किंवा 'विश्वासू' किंवा 'शाश्वत' किंवा 'गूढ' म्हणत असला तरीही.

पण हे गुणवंतांनो, तुम्ही पुरुषच आम्हा स्त्रियांना तुमच्या गुणांचे नजराणे बहाल करता !'

ती अविश्वासू जीवन-स्त्री अशी हसली ! पण ती जेव्हा असे स्वतःबद्दल वाईट बोलते, तेव्हा मी तिच्यावर किंवा तिच्या हास्यावर कधीच विश्वास ठेवीत नाही.

आणि मी एकटाच माझ्या उनाड शहाणपण-स्त्रीशी बोललो, तशी ती रागाने म्हणाली : तू इच्छा धरतोस, आसक्ती बाळगतोस, प्रेम करतोस–म्हणूनच केवळ तू जीवनाची स्तुती करतोस !

जवळजवळ रागानेच मी प्रत्युत्तर दिले आणि रागावलेल्या तिला सत्य तेच सांगितले; आणि आपल्या शहाणपण-सखीला रागावून 'सत्य सांगण्याव्यतिरिक्त' दुसरे काहीच सांगणे शक्य नसते.

तर आम्हा तिघांच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे. माझ्या अंतर्यामी मी जीवन-सखीवरच फक्त प्रेम करतो. आणि खरोखर मी जेव्हा जीवन सखीचा अधिकच तिरस्कार करतो, तेव्हा तर मी तिच्यावर जास्त जास्तच प्रेम करतो.

पण मी शहाणपण-सखीला प्रीय मानतो आणि नेहमीच अतिशय प्रीय–कारण ती मला जीवन सखीची आठवण करून देते !

शहाणपण-सखीजवळ जीवन-सखीचा डोळा आहे, जीवन-सखीचे हास्य आहे आणि जीवन सखीचा मासे पकडायचा लहानसा सोन्याचा गळदेखील आहे. शहाणपण स्त्री आणि जीवन स्त्री, ह्या दोघी अगदी एकमेकींसारख्या आहेत हा काय माझा गुन्हा ?

आणि एकदा जीवन-स्त्रीने जेव्हा मला विचारले : 'शहाणपण-स्त्री ? कोण रे ती ?'–तेव्हा मी इतक्या घाईने उत्तर दिले : 'वा, शहाणपण-स्त्री !'–

तिचीच तर प्रत्येकाला तहान असते आणि ती तहान भागतही नाही; कुणी पडद्यातून तिच्याकडे पाहात असते, तर कुणी जाळीमधून तिच्याकडे दृष्टी लावून डोळे शिणवीत असते.

ती सुंदर आहे का ? मला काय माहीत ! पण अगदी वृद्ध मासेदेखील तिच्या आमिषावर उड्या मारतात.

ती चंचल आहे आणि आव्हान देणारी; मी तिला नेहमीच ओठ चावीत असताना आणि केस विंचरताना पाहिलंय.

कदाचित ती दुष्ट आणि मायावी आणि संपूर्णतया छचोर अशी स्त्री आहे. पण ती स्वतःबद्दल वाईट बोलते तेव्हा मात्र ती सर्वात जास्त भूल पाडते –

जीवन-स्त्रीला मी असे बोललो तेव्हा ती दुष्टपणाने हसली आणि तिने आपले डोळे मिटून घेतले. "तू कुणाबद्दल बोलतोयस ? मला सांग तरी. माझ्याबद्दलच का ?"

आणि समजा, तुझे बरोबर असले–तरी एका पुरुषाने असे–माझ्या तोंडावर सांगावे ! तर आता तू आपल्या शहाणपण-स्त्रीविषयीही बोल ना.'

वा ! प्रीये, जीवन-सखी, आता तू पुनः तुझे डोळे उघडलेसच न ! आणि आता मी खोल अनंतामध्ये बुडून गेलोय् असे पुनः वाटू लागलय्–

असे गायला झरथुष्ट्र. पण नृत्य संपले आणि साऱ्या युवती निघून गेल्या, तसा तो दुःखी झाला.

सूर्य केव्हाच मावळलाय्, अखेरीस तो म्हणाला, कुरण ओलं झालय् आणि जंगलातून थंडीची लाट येतेय्.

एक अनोळखी अस्तित्व जवळ येतेय् आणि चिंतन मग्नतेने न्याहाळतेय्. काय ? झरथुष्ट्रा, अजून तू जिवंत आहेस ?

का ? कशासाठी ? कुठे ? कसा ?– अजूनही जिवंत राहाणे हा वेडेपणा नाही का ?

अरेरे ! माझ्या मित्रांनो, हीच ती संध्याकाळ, माझ्यात असे प्रश्न निर्माण करतेय् ! माझ्या दुःखाबद्दल मला क्षमा करा !

संध्याकाळ होतेय्. संध्याकाळ होतेय्, ह्याबद्दल मला क्षमा करा !

असे म्हणाला झरथुष्ट्र.

फ्रेड्रिक विल्यम नित्शे.

जन्म : १५ ऑक्टोबर १८४४. ऱ्याकन (प्रशिया).



# वकील निवृत्तीतला

## म. अ. दळवी

कुणाची तरी पाऊलं उमटली होती. त्यातील एक स्त्रीचं असावं. दुसरी दोन पुरुषांची असावीत. काहीतरी झटापट होऊन घडलं असावं असं दिसत होतं! जिथं ती पाऊलं रस्त्याच्याकडेला संपली, तिथं एक छापील ओळखपत्र सापडलं होतं.

काही अंतरावरील त्या सुबक बंगल्यात विशेष असं घडलं होतं! सारा बंगला अस्ताव्यस्त स्थितीत होता. कुणीतरी काही-तरी शोधण्यासाठी लगबगीनं आलं असावं. हे लोट, ते लोट करून सारं सामानसुमान विखरून दिलेलं होतं. बंगल्यातील कुणीही व्यक्ती तेथे नव्हती. माळी नित्याच्या सूचना घेण्यासाठी तेथे आला असताना त्याला हे दृष्य दिसलं होतं. त्यानं सावधगिरी बाळ-गून दूरध्वनीवरून पोलिसांना पाहिलेलं वृत्त कळवलं होतं. थोड्याच वेळात त्या छोटयाशा टुमदार गावचे पोलिस प्रमुख तेथे उपस्थित झाले होते.

त्यांच्या मनात एक विचार प्रामुख्याने ते दृष्य पाहून जागृत झाला. त्या बंगल्यांच्या मालकांनी तेव्हा त्यांच्याजवळ संरक्षण मागि-तलं होतं. केवळ अपुऱ्या पोलीस संख्येमुळं त्यांनी ते नाकारलं होतं. त्या नकारामुळं मालक चिडूनच तेथून गेले होते. प्रमुखांनी परि-स्थितीचा आढावा आणि टिपण घेऊन आपलं चौकशीचं काम संपविलं. आपल्या सहकाऱ्यांस आणि बंगल्याच्या मालकास काही सूचना देऊन ते निघून गेले.

त्या बंगल्याचे मालक एक वकील होते. पन्नाशीतच व्यवसायातून निवृत्त होऊन त्या मोठ्या शहरातून त्या लहानशा गावी येऊन स्थायिक झाले होते. त्यांनी तेथे तो बंगला व त्याच्या भोवतालची जमीन विकत घेतली होती. वीस वर्ष सतत वकीली करून, पुरेसा पैसा मिळवून, आता अधिक कष्ट नको म्हणून हवी असलेली विश्रांती घ्यावी म्हणून ते तेथे स्थायिक झाले होते. बागकामाची त्यांना मुळातच आवड होती. आणि निवृत्तीत तेच काम ते अष्टौप्रहर करताना आढळत. शरीरप्रकृतीनं ते किरकोळ होते. व्यवसा-यात साक्षीदारांना ते आपला दरारा दाख-वून नामोहरम करण्यात सफल ठरले होते. तशी त्यांना प्रसिद्धी खूपच लाभली होती. न्यायालयातील हा वाघ स्वतःच्या घरी मात्र शेळी होता. त्यांची पत्नी त्यांच्यामानानं प्रचंड होती. धडधाकट आणि बलशाली होत्या. त्या स्त्रीचा दरारा त्यांच्यावर अत्यंत प्रभावी होता. त्या बाईला नवऱ्याबद्दल काडी-मात्र अनुकंपा, प्रेम अथवा सहानुभूती नव्हती. ती उघड आपलं नवऱ्यावरील प्रभुत्व

जाहीर करी. अक्षरशः नवऱ्याला आपल्या बोटावर नाचवीत असे. ते निमुटपणं सारं सहन करीत. त्या गावी आल्यानंतर तरी एकांतवास लाभेल अशी त्यांची अपेक्षा होती. पण तसलं कुठं व्हायला ? त्या बाईनं तेथेही आपल्या आडदांड भावास बोलावून घेतलं ! हा माणूस बहिणीहून धिप्पाड; पहेलवानी प्रकृतीचा होता. दिवसभर शरीर कमावणं हाच त्याचा व्यवसाय होता. शिवाय बहीण सांगेल ती ताबेदारी करण्यात दक्ष होता. वकिलांनी जोपासलेल्या फुलांच्या ताटव्यांतून आपल्या जड पावलांनी त्यांचा नाश करण्यात त्याला विशेष हर्ष असे. ती बहीण आणि तो भाऊ त्यांना मारझोड करण्यासही मागंपुढं पहात नसत. अशी परिस्थिती बंगल्याच्या त्या निवृत्त वकील मालकाची होती.थोड्याच अवधीत त्या वकीलीणबाईनं आपल्या मर्यादा विरहित तोंडानं आणि शक्तीनं स्थानिक स्त्रियांच्या समाजात आपलं वर्चस्व स्थापलं होतं. तर तिच्या भावापासून गावकरी दूर रहाणं शहाणपणाचं समजत. कुठून या व्यादी आपल्या गावात आल्या असं त्यांना झालं होतं ! त्यामुळं बहुतेक सर्व गावकऱ्यांना वकीलसाहेबांबद्दल आस्था आणि सहानुभूती वाटे. त्यामुळं वकीलांचं नाहीसं होणं जरी अगदीच आश्चर्यकारक वाटलं नव्हतं तरी काळजीपूर्वक मात्र खचितच वाटत होतं. त्याचे अनेक तर्कवितर्क चालले होते.

वकिलांना संरक्षण का हवं होतं ? त्यांच्या पत्नीकडून आणि तिच्या भावाकडून धोका होता. त्यांच्यावर कुणी पाळत ठेवल्यासारखं त्यांना वाटत होतं. तसं त्यांच्या माळचालाही आढळून आलं होतं. पोलिसांना त्यांनी काही पत्रंही पुढं करून दाखविली होती. ती पत्र नजीकच्याच शहरातून कुणी पाठविली होती. ती त्यांच्या पत्नीला आलेली होती. त्या पत्रावर पत्ता अथवा पूर्ण नावही नव्हतं. ती प्रेमपत्र होती. पहिलं पत्र चुकून त्यांच्या हाती आलं होतं. त्यानंतर आपण पाळत ठेऊन इतर माहिती मिळविली असं त्यांचं म्हणणं होतं. पत्नीच्या या प्रियकरामुळं अधिकच धोका आपल्या जिवाला निर्माण झाला आहे असा त्यांचा समज होता. म्हणून त्यांना संरक्षण हवं होतं. !

वकीलसाहेब नाहीसे होण्यापूर्वी 'आपण आपल्या जीवनाबद्दल आपल्या पत्नीशी सोक्षमोक्ष करून घ्यावयाचं ठरविलं आहे असं गावातल्या एकदोन व्यक्तींशी आणि माळचाशी ठामपणं बोलल्याचंही आढळून आलं होतं. त्यामुळं तर त्यांच्या नाहीसं होण्यामागं विस्मयास जागा निर्माण झाली होती.

या घटनेनंतर काही दिवसांनी कुणाच्यातरी दूरध्वनीवरून सांगितल्यामुळं ते त्या बंगल्यापाशी आले. अन् आश्चर्य हे की वकीलसाहेब नेहमीप्रमाणं आपल्या बागेत काम करीत होते. फक्त फरक एवढाच होता की त्यांचं अंग अनेक ठिकाणी खरचटल्यासारखं व्रणांवरून दिसत होतं. एक-दोन ठिकाणी पट्टया बांधल्या होत्या. पोलीस प्रमुखांनी नमस्कार चमत्कार झाल्यानंतर सहज चौकशी केली. तेव्हा वकीलसाहेबांनी त्यांना आपल्याला कसं पळवून नेलं, काही अज्ञात इसमांनी, शहराच्या कुठल्याशा भागात एका तळघरात कसं डांबून ठेवलं नि आपल्यावर लक्ष ठेवणारा रक्षक दारू पिऊन लोटपोट झाला असताना आपली सुटका आपण कशी केली आणि घरी कसे परतलो वगैरे सारं काही सांगितलं. पोलीस प्रमुखांनी अनुषंगानं ती पत्रं तपासणीसाठी मागितली. पण वकीलसाहेब ती देण्यासाठी नाखूश दिसले.

पोलीस प्रमुख आपल्या कचेरीत परत फिरले तेव्हा त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. ते विचार करीत होते. वकीलसाहेबांच्या व्यक्तीमत्त्वाचं दुसरंही काही अंग असलं पाहिजे. आपण इतरही सहाय्य मिळवावयास हवं. ज्या कारणासाठी वकीलसाहेबांनी काही दिवसांपूर्वी संरक्षण मागितलं त्या कारणाचा पाठपुरावा करण्यासाठी ती पत्रं आता मागितली. ती देण्यास ते तयार नाहीत. ही विसंगती प्रमुखांच्या लक्षात येताच त्यांनी कसून चौकशी सुरू केली. त्यांनी त्या सापडलेल्या ओळखपत्राची आठवण झाली. ते ओळखपत्र त्यांनी आपल्या पैशाच्या पाकीटात ठेवलं होतं. ते बाहेर काढलं. त्यावर एका गुप्तचर गृहस्थाचा पत्ता होता. त्यांनी गुप्तचर मान्यता खात्याकडं चौकशी केली. अशा प्रकारची कोणतीही व्यक्ती अस्तित्वात नव्हती असं त्यांना आढळून आलं. त्याचा अर्थ ते पत्र बनावट होतं. तशी पत्रं कोण छापतं या चौकशीत त्यांच्या सुदैवानं एक छापखाना, आपण त्याप्रकारची ओळखपत्रं एका किरकोळ शरीरप्रकृतीच्या इसमासाठी छापली होती असं सांगणारा आढळला. अधिक चौकशीनंतर गंमत म्हणून आपण ती पत्रं छापवून घेत आहोत असंही ती छापून घेणाऱ्या माणसानं सांगितलं अशी माहिती मिळाली. छापखान्यांतील सेवकानं वर्णन केल्यावरून ते वकील साहेबांच्या वर्णनाशी जुळतं निघालं. हाच धागादोरा हाती धरून त्यांनी वकीलसाहेबांनी दिलेल्या माहितीवरून ती पत्रं शेजारच्या शहरांतील एका पतपेढीत सुरक्षित ठेवल्यानुसार–पोलीस प्रमुखांनी त्या दिशेनं चौकशी सुरू केली. आणि पुनश्च एकदा त्यांना यश लाभलं. ती पत्रं त्यांना एका ठिकाणी आढळली व पहावयासही मिळाली. त्या टंकलिखित पत्रांची एक विशिष्ट ढब होती. आता त्यांना ज्या टंकलेखनयंत्रावर ती पत्रं टंकीत केली होती ते हवं होतं. प्रयत्न चालू होते. जे जे व्यापारी अशी यंत्र हाताळीत त्यांच्याकडं चौकशी सुरू झाली होती.


मध्यंतरी काही आणखी घटना घडल्या. त्यापैकी महत्त्वाची म्हणजे त्यादिवशी वकीलसाहेब आपल्या माळचाला म्हणाले, 'आता तिन्हीसांजा होत आल्या आहेत. आत्ताच मी जाऊन माझ्या पत्नीस सांगणार आहे की, या घरात जर तुला रहावयाचं असेल तर सारं माझ्या मनाप्रमाणं व्हावयास हवं ! नाहीतर तू चालती हो येथून. आणि तुझ्या त्या दांडगेश्वर भावालाही घेऊन जा. जर तुम्ही निघून गेला नाहीत तर होणाऱ्या परिणामास मी जबाबदार रहाणार नाही !' आणि बरं का ? जर काही झटापट झाली तर तू जवळपासच रहा. पोलीसांना बोलाव.'

त्यांच्याबद्दल सर्वांनाच सहानुभूती असल्यामुळं 'आता पुढं काय होतं ते पहावयास सर्व उत्सुक होते !' माळीही काही अंतर राखून बंगल्याबाहेर उभा होता. नंतर माळचाला जोरजोराचं भांडण ऐकू आलं. वकीलसाहेबानं ठामपणं पत्नीस व मेहुण्यास काय सांगावयाचं ते सांगितलेलं त्यानं ऐकलं. नि त्याला त्यांच्या या शौर्याबद्दल आनंद नि प्रौढी वाटली. त्याला आश्चर्य वाटलं ते या गोष्टीची की त्यांची ती भयंकर पत्नी आणि तिचा तो राक्षस भाऊ अगदी लीनतेनं आपणांस निराधार करू नका म्हणून वकीलसाहेबांस विनवणी करीत असल्याचंही त्यानं ऐकलं. लीनता त्या उभयतांना ठाऊक नव्हती. भीती त्यांना वाटणं तर दूरच राहो. नंतर बराच वेळ शांतता लाभली. मग अंमळशानं वकीलसाहेब बाहेर आले. त्यांना प्रसन्न वाटत असावं.

'ते आवरतो बांधाबांध करीत आहेत. उद्यापासून ती दोघं येथे दिसणार नाहीत.

# MSSIDC

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ




**या ठिकाणी**
**एवढे कोणत्या उद्योगात गुंतले आहे ?**

## अर्धविकसित विभागांत उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी कर्तबगार व्यावसायिकांना नवनव्या कल्पना सुचविण्याचे काम महामंडळ करीत असते..

विभागाविभागातील आर्थिक असमतोलामुळे शांतता, स्थैर्य आणि प्रगति यांना धोका निर्माण होतो. विकसित आणि अविकसित विभागांत अस्तित्वात असलेली ही विषमता होता होईल तेवढी कमी करावयाची तर त्यासाठी अविकसित विभागांच्या गरजाकडे आपणास विशेष लक्ष पुरविले पाहिजे. महामंडळ-प्रणित सघन विकास कार्यक्रम अविकसित विभागांसाठीच खास करून आखण्यात आला आहे.

स्थानिक नैसर्गिक संपत्तीचा अधिकाधिक वापर कसा करता येईल, समाजातील वेगवेगळ्या थरांतील साहसी व्यक्तींना औद्योगिक क्षेत्राकडे कसे आकर्षित करता येईल, यावर या कार्यक्रमाचा भर आहे. सोप्या शब्दांत सांगायचं तर महामंडळ लग्न जुळवायला निघाले आहे. एखादी भरघोस, उत्तम योजना आणि एखादा साहसी, कर्तबगार उद्योजक यांचं लग्न जुळविता आलं तर महामंडळाला पहायचं आहे.

सविस्तर माहितीसाठी महामंडळाच्या नजिकच्या कार्यालयास किंवा पुढील पत्त्यावर लिहा:

**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासन निर्मित संस्था)
कृपानिधी, बॅलार्ड इस्टेट, टपाल पेटी क्र. ३११ अ, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी: २६११२१ टेलेक्स: ०११-३३९९ तार: MASSIDCORP

CHAITRA-MSSIDC-69 MAR

कसा उबग आला होता मला या लाजिरवाण्या जीवनाचा. असो. आज वेळ आली !' त्याला पाहून वकीलसाहेब म्हणाले.

माळी नंतर तेथून निघून गेला तेव्हा रात्रच झाली होती. दुसऱ्या दिवशी माळ्याला वकिलीणबाई आणि तिचा भाऊ दिसला नाही. ती दोघं निघून गेली होती हे खरं.

'काय वकीलसाहेब, आपण गावाला जात आहात असं कळलं.' पोलीस प्रमुख हसत हसत म्हणाले.

पोलीस प्रमुख केवळ औपचारिक रीतीनं तिथं आले होते. पण त्यांच्या दृष्टीतून वकीलसाहेबांनी फरशी लावून नुकतीच रंगवून काढलेली दोन फुलझाडांची बेटं निसटली नव्हती. ती एक-दोन दिवसांपूर्वी तेथे नव्हती.

'नवी दिसताहेत ही !' पोलीस प्रमुख सहजच बोलले, 'काय लावलं आहे आत ?'

'काही झेंडू लावले आहेत,' वकीलसाहेब म्हणाले, 'पंधरा एक दिवसांत चांगले वर येतील !'

पोलीस प्रमुख जाता जाता म्हणाले, 'आठवडा तरी आपण बाहेरगावी असाल ?'

'हो तर' वकीलसाहेब म्हणाले, 'या सर्व प्रकारानंतर विश्रांती आवश्यक झाली आहे.'

वकीलसाहेब दुसऱ्या दिवसापासून परगावी गेले. ती संधी साधून त्यांनी वकीससाहेबांच्या माळ्यास गाठले. हळूहळू मागील सर्व घटनांवर त्याला बोलतं केलं. त्या संध्याकाळी काय घडलं होतं, दुसऱ्या दिवशी काय घडलं होतं. माळ्यानं प्रत्यक्ष घटना पाहिल्याच नव्हत्या. नुसत्या ऐकल्या होत्या असं सिद्ध झालं होतं.

विशेष असं त्यांना काहीच कळलं नाही. पण ते नाउमेद झाले नाहीत ते जेव्हा आपल्या कचेरीत परतले तेव्हा त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या मेजावर एक टंकलेखन यंत्र ठेवलेलं आढळलं. त्यांनी त्यावर काही छापलं. त्यांनी त्वरित निष्कर्ष काढला की, वकीलीणबाईंनां लिहिलेली प्रेमपत्रं त्याच यंत्रावर छापलेली होती. अधिक चौकशीअंती असं जाहीर झालं होतं की, वकीलसाहेबांच्या शरीरयष्टीशी जुळणाऱ्या व्यक्तीनच ते ज्या दुकानातून ते आणलं होतं त्याला विकत दिलं होतं. म्हणजे ती प्रेमपत्रं वकीलसाहेबांनीच लिहिलेली व पाठविलेली होती. आपल्या पत्नीविरोधी त्यांनी खोलवर विचार करून हे षड्यंत्र रचलेलं असावं. असा विचार त्यांच्या मनात उभा राहिला. ते बनावट ओळखपत्र, वकीलसाहेबांचं नाहीसं होणं; कुणीतरी त्यांच्या मागावर आहे असा वकीलसाहेबांचा समज; आपण आपल्या पत्नीला वठणीवर आणणार आहोत ही वल्गना आणि काही दिवस परगावी जाऊन येण्याची योजना आणि सर्वांत --महत्त्वाचं म्हणजे साक्षीदार ठेवून वकीलसाहेबांनी घडवून आणलेलं पत्नी व मेहुण्याबरोबरचं ते भांडण या सर्व गोष्टी हेतुपुरःसर केलेल्या त्यांना आढळल्या पण निश्चित पुरावा केवळ त्या टंकलिखीत पत्रांशिवाय व त्या ओळखपत्राशिवाय काहीच येत नव्हता.

त्या मानानं वकील साहेब खूपच लौकर आपल्या व्यवसायातून निवृत्त झाले होते. त्यांची कमाई चांगली होती हे प्रसिद्धच होते. पण निवृत्तीची एवढी घाई अपवादात्मकच होती. या गोष्टीच्या आधारावर वकीलसाहेब जेथे आपला व्यवसाय करीत होते त्या शहरात पोलीस प्रमुखांनी त्यांच्याबद्दल चौकशी सुरू केली. अनेक समजस विचारपुशीनंतर एक महत्त्वाचा मुद्दा त्यांना या चौकशीमुळं आढळून आला. त्यांना हवं असलेलं सांपडलं होतं. आता ते विचार करीत होते की त्या भांडणानंतर वकीलीणबाई आणि तिचा भाऊ ही कोठे गेली असावी ? त्यांनी अद्यापही वकील साहेबांकडून काही संपदा मिळवण्याचे कसे प्रयत्न केले नाहीत ? मघा त्यांना सपाडलेला मुद्दा आता त्यांना अक्षरशः त्रस्त करीत होता. अन अखेर त्यांनी तो निर्णय घेतला. त्यांनी चार दोन सहकाऱ्यांना समवेत घेऊन ते तडक वकीलसाहेबांच्या बंगल्यावर गेले.

वकीलसाहेब नित्यक्रमाप्रमाणं बागेत काम करीत होते. फाटकातून एवढे पोलीस आलेले पाहून आपणास आश्चर्य वाटत आहे असं त्यांनी प्रथमतः भासवलं. पोलीस प्रमुखांनी काहीही भाव आपल्या चेहेऱ्यावर दाखविले नाहीत. त्यांनी आपला उद्देश वकीलसाहेबांना तेथे येण्याचा काय होता ते सांगितलं. सहकाऱ्यांना त्यानं अटक करण्याचा हुकूम दिला.

'ठीक आहे !' वकीलसाहेब म्हणाले, 'आपण मला अटक करू शकता. पण मी स्वतः होऊनही माझा गुन्हा सिद्ध करावयाचा म्हटला तरी मला पुरावा देता येणार नाही !'

पोलीस प्रमुखांच्या चटकन लक्षात आलं की आपली गाठ पुरावा आणि कायद्याच्या बाबतीत एका कसलेल्या वकीलाबरोबर आहे. पण ते निर्णायक स्वरात म्हणाले, 'ते आपण नंतर पाहू, आपला व्यवसाय लक्षात घेऊन माझ्या खात्यानं काही कच्ची तयारी केलेली नाही. आपण मात्र या क्षणापासून जे बोलाल ते दक्षपूर्वक बोला. कारण आपण प्रत्येक शब्द न्यायासनापुढं आहे तसा मांडण्यांत येईल त्याचे परिणाम मी आपणास सांगण्याची आवश्यकता नाही !'

पोलीस प्रमुखांच्या स्वरांतील कणखरता वकीलसाहेबांना खूपच जाणवली. निश्चितच त्यांनी विशेष पुरावा खचित गोळा केला असणार. ते क्षणात अवसानघात होऊन गर्भगळीत झाले. पण उसनं बळ आणून काहीसं स्मित करीत म्हणाले, 'मी त्यांना केराच्या भट्टीत जाळून टाकलं नि त्यांची डोकी या ताटव्यांच्या बेटात पुरली आहेत. पण ती तुम्हाला सापडणार नाहीत.'

'अस्सं' पोलीस प्रमुख थोडयाशा उपहासानच म्हणाले, 'पाहू या तुमच्या सांगण्याचा खरेखोटेपणा !'

वकीलसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणं कचऱ्याच्या भट्टीत काहीच सापडलं नाही. ती नवी रंगविलेली फुलांची बेटं उकरली गेली. आणि वकील साहेब आणि पोलीस मंडळी यांच्या विस्मयास सीमा राहिली नाही. कारण ती डोकी झाडांना जे आम्लद्रव घातलं होतं त्यामुळं ती बहुतांशी टिकून ओळखण्यासारखी राहिली होती. माळ्यानं चूक केलेली वकीलसाहेबांच्या लक्षात त्वरीत आली. माळ्यानं चुकून एका ऐवजी दुसरंच आम्लखत झाडांना घातलं होतं. नाश करणाऱ्या आम्लाऐवजी टिकवणारं आम्ल घातलं गेलं होतं ! वकील साहेब अवाक् होऊन पोलिसाबरोबर कोणताही प्रतिकार न करता गेले.

त्या संध्याकाळी जे घडलं ते पोलीस प्रमुखांनी न्यायासनापुढं स्पष्ट केलं, 'न्यायाधीश महाशय, ज्या सायंकाळी वकील साहेबांनी आपली पत्नी आणि आपला मेहुणा यांचे खून केले त्या प्रसंगी आपल्या माळ्याचं बुद्धीभ्रंश करून आपण भांडणात आहोत असं दाखवून ते केले. वकीलसाहेब पक्षकार आणि साक्षीदार यांच्या बोलण्याची हुबेहुब नक्कल न्यायालय पुढं आलेल्या कामकाजाच्या ऐन महत्त्वाच्या क्षणी करून त्यांचा बुद्धीभ्रंश करून आपली बाजू सिद्ध करून घेण्यात नेहमीच यशस्वी झाले आहेत. तशी खात्रीलायक माहिती आम्ही मिळविली आहे. त्या संध्याकाळी माळ्याला दूर राहावयास सांगून पण श्रवणमर्यादेत राहता येईल अशा सावधगिरीनं वकीलसाहेबांनी भांडणाचं नाटक रचलं. माळ्याला वकीलसाहेबांच्या या सफल कलेची माहिती नसल्यामुळं तो फसला...'

सर्व खटला काही दिवसातच संपला. पुरावा सबळच होता. वकीलसाहेबांना दोषी ठरविण्यात पंचांना विशेष विलंब लागला नाही. त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. ती भोगीत असतानाच त्यांचा अंत झाला. त्या पोलीसप्रमुखांची सर्वत्र प्रशंसा झाली. [ आधारित ]

**(ही सत्यकथा १९२१ मध्ये अरोरा, इलिनॉई, अमेरिकेत घडली. वकिलांचं नाव होतं वॉरन लिन्कॉलन. पोलीसप्रमुखाचं नाव फ्रँक मिचेल्स)**



# गाय गिब्सन

अनुवाद
**अनंत भावे**

दुसऱ्या महायुद्धामध्ये ब्रिटिशांच्या सर्वच सैन्यशाखांनी मोठी बहादुरी गाजवली आहे. त्यातही विमानदलाभोवती असलेल्या अद्‌भुताच्या वलयामुळे, त्यातील शौर्यकथांना एक वेगळीच रोमहर्षकता प्राप्त झाली आहे. ब्रिटनच्या या शाही विमानदलाने, जर्मनांनी केलेल्या भीषण हवाई चढाईत आपल्या मायदेशाचे अटीतटीने संरक्षण तर केलेच; पण जर्मनव्याप्त युरोप आणि खुद्द जर्मनीमध्ये घुसून, नाझी युद्धतंत्र मोठ्या हिकमतीने खिळखिळे केले. त्या प्रयत्नात अनेक अद्‌भुत साहसे ब्रिटिश हवाई सैनिकांनी केली. त्यातील एक साहसकथा आणि तिच्या नायकाची चरित्ररेखा पुढील शब्दात सादर केली आहे.
गाय गिब्सन हे त्या वैमानिकाचे नाव. त्याची साहसकथा तर केव्हाच आख्यायिकास्वरूप झालेली आहे.

जर्मनव्याप्त हॉलंडमधील स्टीनबर्जेन हे खेडे गाढ झोपी गेले होते.

दुसऱ्या महायुद्धाचे अखेरचे पर्व चालू होते. बाजी आता जर्मनांवर उलटली होती. रोजच्या रोज ब्रिटिश विमाने आपल्या साहसी बॉंबफेकीने जर्मन युद्धतंत्र खिळखिळे करून टाकीत होती. त्या दिवशी रात्रीदेखील आपली साहसी कामगिरी संपवून सुमारे दोनशे लॅंकेस्टर जातीच्या बॉंबर विमानांचा ताफा मायदेशी निघाला होता. पाच हजार वस्तीच्या स्टीनबर्जेनने, झोपल्या झोपल्याच, परतणाऱ्या विमानांचा आश्वासक आवाज ऐकला. या थकल्याभागल्या लोकांचा मुक्तिदिन आणखी एका दिवसाने जवळ आला होता !

दोन तासापूर्वी हीच विमाने ऱ्हूर खोऱ्याच्या दिशेने गेली होती. गेल्या कित्येक रात्रींप्रमाणे याही रात्री त्या शूर विमानांना स्टीनबर्जेनवासियांनी शुभेच्छा चिंतिल्या होत्या. कामगिरीवर जाणाऱ्या विमानांचा आवाज वेगळा यायचा. त्यात करारीपणा, हुकुमत, असायची, परतताना तो हळुवार समाधानी आश्वासक व्हायचा. बऱ्याच वेळा हरपलेल्या मित्रांच्या स्मृतींनी तो व्यथितही व्हायचा. स्टीनबर्जेनला हे आवाज आता चांगले परिचित झाले होते.

## जखमी विमान

परतणाऱ्या लॅंकेस्टर्सच्या आवाजाने कळेल न कळेलसे चाळवलेले स्टीनबर्जेन पुन्हा गाढ झोपी गेले. फक्त एक माणूस मात्र जागा होता. तो म्हणजे गावातील साखर कारखान्याचा रखवालदार अंतोन ब्रुइन. परतणाऱ्या विमानांच्या आवाजाने त्याच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या होत्या. त्याच तो तंद्रीत होता.

इतक्यात कसल्याशा आवाजाने त्याची तंद्री भंग पावली. त्याने कानोसा घेतला. दुरून येणाऱ्या विमानाचा आवाज त्याला स्पष्ट ऐकू आला. परतणारे हे विमान एकाकी असावे, जखमी झालेले असावे, हे सारे त्या आवाजाने अंतोन ब्रुयेनला सांगितले. तो कारखान्यातून बाहेर पडून रस्त्यावर आला. आता आवाज भीषणच येत

होता. अंतोन जणू केंद्रबिंदू असावा असा साऱ्या दिशांनी आवाज त्याच्या कानावर आदळत होता. अकस्मात पूर्वेला घरांच्या छपरांवरून येणारे दोन इंजिनांचे, मॉस्क्विये जातीचे, एक ब्रिटीश विमान त्याला दिसले. विमान घिरट्या घालू लागले होते. उतरण्यासाठी सोयीची जागा ते पहात असावे. विमानात बसलेली दोन माणसे अंतोनला अगदी स्पष्ट दिसत होती.

मात्र या दोघांपैकीच एकाने त्या रात्रीच्या मोहिमेचे नेतृत्व व मार्गदर्शन केले होते हे बिचाऱ्या अंतोनला कसे कळावे? या आधी, सोळा महिन्यांपूर्वी, जर्मनीतील दोन भक्कम धरणे आपल्या अजोड साहसाने उध्वस्त करून ज्या वैमानिकाने खुद्द चर्चिलमहाशयांकडून 'धरणफोड्या' असे गौरवनाम प्राप्त केले होते. सर्वांनी एकमताने, ज्याला सर्वश्रेष्ठ बाँबर-पायलट मानले होते तोच गाय गिब्सन जिवाच्या आकांताने विमान सुरक्षितपणे उतरवण्याचा प्रयत्न करत होता. अंतोन द ब्रुयेन नकळत त्याच्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करू लागला होता.

त्या दिवशीची तारीख होती १९ सप्टेंबर, सन १९४४.

गाय गिब्सनचा जन्म आपल्या भारतात, सिमल्याला १९१२ साली झाला. वनखात्याच्या वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याचा हा मुलगा. त्याचे सारे शिक्षण ब्रिटनमध्येच झाले. शाळेत तो अभ्यासात वा खेळात कोठेच फारसा चमकेला नाही. मात्र प्रथमपासूनच तो निग्रही होता. मनात योजलेले साध्य करण्यासाठी भगीरथ प्रयत्न करायची त्याची नेहमीच सिद्धता असायची.

शाळेत असतानाच, १९२५ साली, त्याने शाही विमानदलात प्रवेश करण्यासाठी अर्ज केला, पण बुटका असल्याने त्याला प्रवेश नाकारण्यात आला. परंतु एक वर्षानंतर, अनेक अर्ज-विनंत्या केल्यावर आणि आश्वासने, अभिवचने दिल्यानंतर एकदाची गाय गिब्सनची विमानदलात वर्णी लागली.

मग मात्र आपल्या निरलस प्रयत्नाने त्याने विमानविद्येत प्राविण्य संपादन केले. युद्ध सुरू झाले तेव्हा तेवीस वर्षांचा तरणाबांड गाय गिब्सन बाँबर दलातील एका स्क्वॉड्रनचा प्रमुख होता! आता त्याचे सारेच व्यक्तिमत्त्व मोठे संपन्न आणि प्रभावी झाले होते. आनंदी पण थिल्लर नसलेला सर्वांशी मिळून मिसळून वागणारा पण मितभाषी, समजूतदार पण कमालीचा शिस्तप्रिय सर्वार्थाने गाय गिब्सन युद्धकाळात शाही विमानदलात उदयाला आलेल्या तरुण नेतृत्वाचा उत्तम प्रतिनिधी होता.

गिब्ससने लॅब्रेडॉर जातीचा, 'निगर' नावाचा एक कुत्रा पाळला होता. निगर सदोदित त्याच्या भोवती भोवती असायचा आणि गिब्सनचेही निगरवर आत्यंतिक प्रेम होते.

## गिब्सन नेतृत्व करील

१९४३ सालच्या मार्चपर्यंत गिब्सनने बॉम्बहल्ल्याची दोन सत्रे (एक सत्र = ३० मोहिमा) पुरी केली होती. शत्रुप्रदेशात घुसून अठ्ठ्याहत्तर वेळा–जीव धोक्यात घालून बॉम्बफेक केली होती. त्याशिवाय दोन सत्रांमध्ये, ज्यावेळी यथाव्यवस्था त्याने विश्रांती घ्यायची त्यावेळी आपण होऊन जवळ जवळ शंभर वेळा, लंडनच्या आकाशात, डोळ्यात तेल घालून रखवालदारी केली होती. विश्रांती घेण्याची अजूनही त्याची इच्छा नव्हती. परंतु अधिकाऱ्यांनी त्याच्यावर सक्तीच केली. विश्रांतिकाल सुरू झाल्यावर गिब्सनच्या मनावरचा ताण हळुहळू हलका झाला. मृत्यूची दैनंदिन भेडसावणारी भीती ओसरली. या युद्धातून आपण बहुधा जिवंत सुटणार, असे त्याला वाटू लागले. हा विश्रांतिकाल लांबवावा, निवांतपणे बायकोला भेटून यावे असे त्याला वाटू लागले. मोहिमांच्या सततच्या धालमेलीत, बायकोला भेटणे गेल्या कित्येक दिवसांत त्याला शक्य झाले नव्हते.

याच सुमारास बॉम्बर कमांडचे प्रमुख एअर चिफ् मार्शल सर आँर्थर हॅरिस आणि गिब्सनचे ग्रुप कमांडर राल्फ कोक्रेन यांच्यात एक संभाषण झाले.

'तुमच्यावर एक कामगिरी सोपवायची आहे,' हॅरिस कोक्रेनना म्हणाला.

हॅरिसने कामगिरीचे स्वरूप सविस्तर समजावून सांगितले. बार्न्स वॉलिस नावाच्या शास्त्रज्ञाने एक नवीन पद्धतीचा बॉम्ब तयार केला होता. जर्मनीतील मॉन आणि एडर ही प्रचंड धरणे या नवीन बॉम्बने उध्वस्त करून टाकता येतील अशी कल्पना होती. या धरणातूनच सर्व ऱ्हूर खोऱ्याला पाणीपुरवठा होत होता. या धरणाच्या पाण्यापासून वीजदेखील भरपूर प्रमाणात उपलब्ध होत होती. अत्यंत अनुभवी हवाई सैनिकांची एक खास तुकडी तयार करून त्यांनी एका हल्ल्यात ही दोन्ही धरणे फोडून टाकावयाची कामगिरी होती.

'ह्या खास तुकडीचं नेतृत्व कोण करणार? कोणाचं नाव सुचवू शकाल का आपण?' कोक्रेनने विचारले.

हॅरिसने या नावाचा विचार आधीच केलेला असावा. तो पटकन् म्हणाला, 'होय. गिब्सन नेतृत्व करील या तुकडीचं.'

गिब्सनला हे सांगण्याची जबाबदारी कोक्रेनवर पडली. त्याने गिब्सनला बोलावून घेतले. काही जुजबी प्रश्नोत्तरे झाल्यावर कोक्रेनने गिब्सनला विचारले,

'आणखी एखाद्या मोहिमेत भाग घेण्याची कल्पना, गिब्सन, तुला कशी काय वाटते?'

विश्रांतिकाल सुरू होऊन अजून पुरता आठवडादेखील झाला नव्हता. धकाधकीच्या मोहिमेत उत्कंठेने भाग घ्यावा इतका विश्रांतीचा कंटाळा गिब्सनला अजून आलेला नव्हता. ग्रुप हेडक्वार्टर्सला त्याची बदली करण्यात आली होती. तिथे आपल्या बॉम्बहल्ल्यांच्या मोहिमांतील अनुभवांचे संकलन पुस्तकरूपाने करावे अशी सूचना त्याला देण्यात आली होती.त्या कामात तो पूर्ण रमला नव्हता; परंतु स्वाभाविक शिस्तीने त्याने त्या कामाचा फडशा पाडायला सुरुवात केली होती. आता मोहिमेत भाग घ्यायचा म्हणजे सुखाची विश्रांती सोडून जीव पुन्हा मृत्यूच्या खाईत ढकलायचा होता. कोक्रेन असा काही प्रश्न विचारील अशी कल्पनाच गिब्सनने केली नव्हती. तो अगदीच बेसावध होता.

'कसली मोहीम, साहेब?' आपल्याला विचार करायला थोडा वेळ मिळावा या हेतूने गिब्सनने प्रतिप्रश्न विचारला.

'मोहीम फार महत्त्वाची आहे. कदाचित या युद्धातली सगळ्यात महत्त्वाची मोहीम ठरेल ही. यापेक्षा अधिक काही यावेळी सांगता येणार नाही मला. मात्र एक गोष्ट नक्की. या भूमिकेचं नेतृत्व तू करणार आहेस.'

गिब्सनचे रक्त नकळत सळसळू लागले. टेबलाशी बसून लिहिण्या-पेक्षा आकाशात विमान उडविणे, शत्रूप्रदेशावर हल्ला करणे याचेच आकर्षण त्याला अधिक होते. मात्र अजूनही त्याच्या डोक्यात उलट-सुलट विचारांची घालमेल चालली होती. इतक्यात कोक्रेनने निर्वाणीचा प्रश्न केला, 'मग, काय विचार आहे तुझा? होय म्हणणार की नाही?'

'ठीक आहे, साहेब. माझी संमती आहे.'

'छान झालं. यासंबंधीची अधिक माहिती लवकरच कळेल तुला.'


गिब्सनने संमती दिली आणि ही आपली अखेरचीच मोहीम ठरणार असे काहीतरी त्याला उगाचच वाटू लागले. विश्रांतीमुळे त्याच्या मनावरचा ताण हलका झाला होता. मन आता सहज मोहिमेचा विचार करायला तयार नव्हते. त्याचा कणखरपणा लोपला होता. नंतर जेव्हा लक्ष्यांबद्दल अधिक माहिती कळली तेव्हा त्याला थोडासा दिलासा मिळाला. कदाचित याही मोहिमेतून आपली सहि-सलामत सुटका होईल असे त्याला वाटू लागले.

त्यानंतरचे काही दिवस शिकणे, शिकवणे, योजना आखणे, सराव करणे यात गिब्सन अगदी गढून गेला. या मोहिमेत आपण जिवंत राहू की नाही असल्या स्वार्थी विचाराला या घाईगर्दीत डोके वर काढायला सवडच मिळाली नाही. आणि अचानक मोहिमेच्या आदल्या रात्री त्या विकृत भीतीने पुनः गिब्सनने अंतकरण कुरतडायला सुरवात केली. तोच काय पण कदाचित त्याच्या तुकडीपैकी कोणीच या विल-क्षण मोहिमेतून सुखरूप पार पडणार नाही असे त्याला वाटू लागले. मोहिमेत असलेले अनेक धोके त्याला आठवले आणि मनाच्या त्या विकल अवस्थेपुढे त्या धोक्यांना भयानक आकार धारण केले.

## धरण फोडण्यासाठी

जर्मनीतील रूर खोऱ्यात खूप आत घुसणे यात नेहमीचा जर्मन प्रतिकाराचा धोका होताच. अनेक महिन्यांच्या सरावाने अगदी खालून विमाने उडविण्याचे जे तंत्र या तुकडीने आत्मसात केले होते त्यायोगे हा धोका थोडासा कमी होणार होता हे खरे, पण त्याचीदेखील शाश्वती देतायेण्यासारखी नव्हती. त्याशिवाय हल्ला करावयाच्या विशिष्ट पद्धतीत फार मोठा धोका होता. मॉन किंवा एडर धरणा-वर सरळ बॉम्बफेक करायची इतका मामला साधा नव्हता. कारण उपलब्ध असलेल्या कोणत्याही बॉम्बच्या साहाय्याने सरळ मारा करून त्या धरणभिंती उखडणे शक्य नव्हते. सरळ हल्ल्याला दाद न देणारी ही सामर्थ्यशाली कॉक्रीटची धरणे शक्तिप्रेरित लाटांच्या जोरापुढे नमतील असा अंदाज होता. वॉन्स कॉलिसच्या संशोधना-प्रमाणे बॉम्बस् मुळी मॉन किंवा एडर धरणांच्या पाण्यातच टाका-यचे होते. बॉम्बस् पाण्यात पडल्यावर परिणामी होणाऱ्या स्फोटातून पाण्यात विलक्षण जोरदार शक्तिप्रेरित लाटा उत्पन्न होऊन त्या धरणाच्या भिंतीवर धडकणार होत्या. या लाटांच्या जोरापुढे ती सामर्थ्यशाली धरणे देखील कोसळतील असा बान्स कॉलिसचा कयास होता.

हे साधण्यासाठी विमानांना अगदी खालून विशिष्ट गतीने उडावे लागणार होते. विमाद प्रतिबंधक हल्ला चुकविण्यासाठी काही करता येणार नव्हते. त्याही पेक्षा वाईट गोष्ट अशी की बॉम्बची सगळी



गिब्सनच्या विमानावर चोहोबाजूंनी जर्मन तोफांचा भडिमार

शक्ती उपयोगात आणण्यासाठी त्यांना ज्या विशिष्ट उंचीवरून उडावे लागणार होते ती उंची निश्चित करण्यासाठी विमानावर दोन दिवे बसवावे लागणार होते. विमान आवश्यक अशा साठ फूट उंचीवरून उडू लागले म्हणजे दिव्यांची एकाखाली एक इंग्रजी आठच्या आकडचा-सारखी दोन प्रकाश वर्तुळे पाण्यावर उमटणार होती. उंचीचे गणित जमण्यासाठी या दिव्यांना वापरणे भागच होते; पण त्यामुळेच भोवतालच्या टेकड्यावरच्या आणि खुद्द धरणावरच्या विमानप्रति-बंधक तोफांना या स्थिर आणि प्रकाशित ब्रिटिश विमानांचा लक्ष्यवेध करणे सोपे जाणार होते.

सर्व विमानांनी एकदम हल्ला चढवून प्रतिकाराचा डोम तुड-विण्याची शक्यता असती तर स्थिर आणि प्रकाशित लक्ष्य लाभते याचीही वैमानिकांनी पर्वा केली नसती. परंतु बॉम्बहल्ला अगदी अचूक होण्यावर मोहिमेचे यश अवलंबून होते. त्यामुळे अंदाजाने बॉम्ब टाकणे योग्य नव्हते. प्रत्येक विमानाने स्वतंत्र आणि एकाकी हल्ला चढविणेच आवश्यक आणि इष्ट होते.

एकाच कोणत्यातरी बॉम्बने धरण फुटेल अशी अपेक्षा नव्हती. सगळ्या बॉम्बसचा एकत्र परिणाम विचारात घेतलेला होता. प्रत्येक स्फोटासरशी अधिकाधिक दुबळी होत गेलेली धरणभिंत अशा एका अवस्थेला पोहोचणार होती की नंतरच्या अचूक टाकलेल्या बॉम्बने ती पुरी उध्वस्त व्हावी.

या दोन्ही धरणांच्या संरक्षणाची व्यवस्था चोख होती. शिवाय मॉन धरणाच्या हल्ल्यातून सुटलेल्याला एडर येथील प्रतिकाराला तोंड द्यावे लागणार होते. एडर धरणावरचा हल्ला पुढे ढकलणे शक्य नव्हते; कारण त्यामुळे शत्रू सावध होण्याचा धोका होता.

## निगर मेला

हल्ल्याच्या आदल्या रात्रीचे अकरा वाजले. गेल्या कित्येक महि-

त्यांची तयारी पूर्ण झाली होती. ही तयारी इतकी परिपूर्ण होती की हल्ला यशस्वी व्हायला हरकत नव्हती. परंतु गिब्सनला अचानक भीती वाटू लागली. फार तर दोन तीन विमाने या मोहिमेतून कशी-बशी वाचतील; मोहिमेचा कर्णधार मात्र वाचण्याची सुतराम शक्यता नाही, असे त्याला वाटू लागले. म्हणून या मोहिमेची साद्यंत हकिकत लिहून ठेवावी; काही आघटित घडले आणि सारी तुकडीच नामशेष झाली तर निदान इतक्या कौशल्याने आखलेल्या या योजनेचा तप-शीलतरी मागे रहावा; असा विचार गिब्सन करू लागला.

आठवड्यामागून आठवडे सराव केल्यामुळे थकलेल्या, जबाबदारी-मुळे भारावलेल्या आणि संभाव्य संकटांच्या जाणीवेमुळे भेदरलेल्या गिब्सनला आपण व्यवस्थित झोप घेऊन दुसऱ्या दिवशीच्या हल्ल्या-साठी ताजेतवाने राहिले पाहिजे याची जाणीव होती. ऑपरेशन्स-मधून तो बाहेर पडला. बाहेरच त्याला स्टेशन कमांडर भेटला. तो म्हणाला, 'गाय, सांगायला फार वाईट वाटतं मला पण तुझा 'निगर' आत्ताच मेला. कॅम्पच्या बाहेरच्या रस्त्यावर मोटारीखाली सापडला तो. एका क्षणात मृत्यू आला त्याला.'

गिब्सनने काहीच उत्तर दिले नाही. जड पावलांनी तो आपल्या खोलीकडे निघाला. निगर त्याचा जिवाभावाचा दोस्त होता. निगर मृत्यू पावला होता आणि त्याचा शोक करण्यासदेखील त्याला सवड नव्हती. एका परीने तेच बरे होते म्हणा. परंतु निगर म्हणजे एक सामान्य पाळीव कुत्रा नव्हता. तर जणू गिब्सनच्या स्वतःच्या अविनाशित्वाचे प्रतीकच होता तो. अशुभ निवारणासाठी एखाद्याजवळ ताईत असावा तसाच निगर गिब्सनजवळ होता. मॉन धरणावरची मोहीम यशस्वी झाल्यानंतर ज्या परवलीच्या शब्दाने गिब्सन ही वार्ता वरिष्ठांना कळविणार होता तो परवलीचा शब्द 'निगर' होता. त्याच्या अपघाती मृत्यूमुळे साऱ्या मोहिमेवरती अशुभाचे एक सावट पडले.

खोलीत गेल्यावर गिब्सनला एकाकी वाटू लागले. त्याची बायको लंडनमध्ये होती आणि बायकांनी सैनिकी तळाच्या आसपास राहाणे त्याला पसंत नव्हते. आपण पुनः मोहिमेवर जाणार आहोत हे बायकोला त्याने कळविलेसुद्धा नव्हते. त्यामुळे तिच्याशी बोलून दिलासा मिळण्याचा संभव नव्हता आणि त्याला एक गोष्ट निश्चित ठाऊक होती ती ही की सरते शेवटी संघनेता हा एकाकीच असतो. निगरच्या मृत्यूमुळे हा एकाकीपणा वाढला, सर्वंकष झाला एवढेच. त्या परिस्थितीत त्याला आपले दुःख कोणालाही सांगता येण्यासारखे नव्हते. निगरच्या मृत्यूमुळे त्याच्या साऱ्या दोस्तांना खरे खरे दुःख होणार होते. पण ही वेळच अशी होती की यावेळी त्यांना दुःख करू देणे योग्य नव्हते. त्याने त्यांच्या नैतिक धैर्यावरती आघात झाला असता कदाचित. म्हणून निगरच्या मृत्यूची बातमी गुप्त ठेवण्याचा निर्णय गिब्सनने घेतला.

निगरने दरवाजावर केलेल्या पंजाच्या खुणाकडे त्याचे लक्ष गेले आणि निगरच्या अनेक आठवणी त्याच्या मनात जाग्या झाल्या. निगरचा विचार करता कामा नये हे पटत होते त्याला; पण त्याचा काही इलाज चालला नाही. नंतर बऱ्याच वेळाने त्याला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठला तेव्हा त्याला फार उदास वाटत होते आणि प्रयत्न करूनही ती उदासीनता त्याला झटकता येईना. मग मात्र सारा वेळ अखेरची तयारी करणे, आदेश देणे, काही व्यवस्था करणे यात तो इतका गढून गेला की त्याला निगरचा जवळ-जवळ विसर पडपडल्यासारखा झाला. परंतु मोहिमेवर निघण्यापूर्वी तळावरच्या एका अधिकाऱ्याला एका बाजूला घेऊन गिब्सनने निगरच्या मृत्यूची बातमी सांगितली. गिब्सन पुढे म्हणाला,'हा भलताच अपशकून झाला खरा. पण तू बोलू नकोस कोणाजवळ. याबद्दल आणि तू मला तसे वचन दे. पण आणखी एक गोष्ट करशील का माझ्या-साठी ? आज मध्यरात्री निगरला मूठमाती देशील काय ?'

बरोबर मध्यरात्रीच गिब्सनचा हल्ला सुरू होणार होता. १६ मे, १९४३ रोजी रात्री साडेनऊ वाजता लिंकनशायर परगण्यातील स्कॅम्प्टन विमानतळावरुन गिब्सन आणि त्याच्या आठ सहकाऱ्यांनी या ऐतिहासिक मोहिमेसाठी उड्डाण केले. आकाशात पूर्णचंद्र चमकत होता. थोडावेळ आधी दुसऱ्या पाच विमानांनी उड्डाण केले होते. ही विमाने सॉर्प धरणावर हल्ला करणार होती. जर्मनांचे लक्ष आपल्याकडे वेधावे आणि परिणामी गिब्सनच्या हल्ल्याकडे त्यांचे दुर्लक्ष व्हावे हा या हल्ल्याचा हेतू होता. त्याशिवाय आणखी चार विमाने या सॉर्पच्या हल्ल्याला मदत करणार होती. ग्रुप हेडक्वार्टर्सच्या जागी, ग्रांथॅम येथे, हॅरिस, कोक्रेन आणि वार्न्स वॉलिस हल्ल्याचा निकाल ऐकण्यासाठी आतूर झाले होते.

## अभेद्य धरण

विमाने उडाली आणि तळावरच्या सैनिकांत या मोहिमेबद्दलची कुजबुज जोरात चालू झाली. अनेकांच्या मनात या मोहिमेबद्दल शंका होत्या. वॉलिसने अनेक प्रयोग करून आपले सिद्धान्त पटवले होते. तरीही अनेकांना ही योजना आचरटपणाची वाटत होती.


वॉलिसवर विश्वास असणाऱ्यांनादेखील आता थोडी धाकधुक वाटू लागली. स्वच्छ चंद्रप्रकाश पडल्यामुळे दुसरी कोणतीही विमाने त्या रात्री मोहिमेवर जाणार नव्हती. म्हणजे जर्मनांचा सगळा प्रतिकार गिब्सनच्या तुकडीवरच एकवटणार होता. प्रखर प्रतिकाराची ठिकाणे कसोशीने टाळून विमानांचा मार्ग आखण्यात आला होता, परंतु एकदा ऱ्हाईन नदी ओलांडून विमानांनी ऱ्हूर खोऱ्यात प्रवेश केल्यावर असा निर्वेध मार्ग लाभणे शक्य नव्हते.

गिब्सनच्या विमानांचा थोडा प्रवास सुखरूप झाला. प्रकाशझोत आणि लक्ष्यवेधी तोफ माऱ्याला पुनः पुनः चुकवावे लागत होते. गिब्सनच्या बरोबर असलेल्या दोन विमानांपैकी एक विमान या प्रतिकाराला बळी पडले.

सॉर्पवर हल्ला करणाऱ्या विमानांपैकी दोघांना मागे परतावे लागले आणि दोघांची शत्रूने वासलात लावली. उरलेल्या एकाकी विमानाच्या मदतीला बाकीच्या चार विमानांची कुमक पाठविण्यात आली.

दरम्यान गिब्सनच्या मार्गदर्शनाखाली उरलेल्या आठ लॅंकेस्टर बॉम्बर विमानांनी डॉर्टमंड आणि हाम यांना वळसा घालून आता ती ऱ्हूर खोऱ्याभोवती पहारा करणाऱ्या टेकड्यांपाशी येऊन पोहोचली होती. आपल्या आखलेल्या मार्गाने त्यांनी टेकड्यांची शिखरे ओलां-डली आणि मॉनचे काळे, गहिरे, चमकणारे पाणी त्यांच्या दृष्टीला पडले.

पृष्ठ २९ वर



# फसलेला डाव!

द गॉलच्या खुनाच्या कटाभोवती विणलेल्या ‘ दि डे ऑफ दि जॅकल ’ या कादंबरी परिचयाचा तिसरा हप्ता

**वि. स. वाळिंबे**

**क्लॉड** लेबेलच्या टेबलावरचा टेलिफोन सारखा खणखणत होता. ‘ डगन ’संबंधी जेवढी माहिती मिळेल तेवढी तावडतोब मला कळवीत जा ’ हा त्याचा आदेश गेल्यापासून फ्रान्सच्या सीमा-रेषेवरील प्रत्येक तपासणी-नाके गेल्या काही दिवसातल्या आपल्या नोंदी तपासण्यात गुंतले होते. तपासणी पूर्ण झाली की प्रत्येक नाके निराशेच्या स्वरात लेबेलला टेलिफोनवरून सांगत होते, ‘ नाही बुवा, आमच्या इथं तर हे नाव सापडत नाही. ’

आणि हे ठराविक उत्तर ऐकून लेबेल स्वतःवरच चडफडत होता. त्यामुळे फोन उचलताना त्याचा चेहरा त्रासिक झालेला दिसे. एवढ्यात उत्तरेकडच्या तपासणी-नाक्यावरून फोन आला, ‘अॅलेक्झांडर जेम्स कॅंटिन डगन हे नाव धारण केलेली व्यक्ती ब्रुसेलसहून गेल्या बावीस जुलैला पॅरिसला आली असल्याची नोंद सापडली आहे. ’

लेबेलच्या चेहऱ्यावरचा भाव बदलला.

जॅकल प्रकरणातील एक धागा हाती लागल्याचे समाधान काही कमी नव्हते.

तेवढ्यात दुसऱ्या एका कचेरीतून निरोप आला, ‘ डगननं एकतीस जुलैला पॅरिसहून ब्रुसेलसला प्रयाण केलं होतं. ’

म्हणजे बावीस जुलै ते तीस जुलैपर्यंत जॅकलचे पॅरिसमध्ये वास्तव्य होते तर ! या काळात तो कोठे राहिला याचा शोध करणे आता अपरि-हार्य ठरले होते. पॅरिसमधल्या लहान-मोठ्या हॉटेलमध्ये फ्रेंच गुप्त-चरांच्या चकरा सुरू झाल्या. त्यातून लेबेलला हवी होती ती माहिती मिळाली. प्लेस द ला मॅदेलिन भागातील एका मोठ्या हॉटेलामध्ये जॅकलचा त्यावेळी मुक्काम होता.

अधीर झालेल्या कॅरॉने लेबेलला विचारले, 'आताच आपण त्या हॉटेलात जाऊन तेथल्या मालकाची जबानी घेऊ.'

'आता नको. त्या हॉटेलात आता वर्दळ असेल. अशावेळी तिथं गेल्यानं आपण कोणाचा तपास करीत आहोत याची वाच्यता होईल. म्हणून आपण उद्या पहाटे जाऊ.'

पहाटे चारच्या सुमाराला लेबेल आणि कॅरॉ यानी त्या हॉटेल-मालकाला उठविले आणि डगनसंबंधी बरीच माहिती विचारली. त्या हॉटेलमालकाचा निरोप घेताना लेबेल त्याला म्हणाला, 'तुम्ही आमचं एक काम करा. डगन जर पुन्हा इथं रहायला आला तर मला लगेच फोन करा.'

केवळ हॉटेलमालकाच्या आश्वासनावर विसंबून चालणार नाही हे ओळखून लेबेलने त्या हॉटेलच्या प्रवेशद्वारापाशी साध्या वेषातील पोलिसांना टेहेळणी करण्यास सांगितले.

कचेरीत परल्यावर लेबेल कॅरॉला म्हणाला, 'पॅरिसची नीट पहाणी करावी यासाठी जॅकल त्यावेळी इथं येऊन गेला असावा. मला वाटतं, तो पुन्हा याच हॉटेलात उतरेल.'

लेबेलने कॅरॉला दुसऱ्या एका कामगिरीवर पाठविले आणि तो स्वतःशी विचार करू लागला की ओ. ए. एस. संबंधी सहानुभूती बाळगणारी शेकडो माणसे पॅरिसमध्ये रहात असल्यामुळे त्या संघटनेचा कोणीही कार्यकर्ता पॅरिसमध्ये आला की अशाच एखाद्या घरी उतरतो. मग जॅकल तेवढा हॉटेलमध्ये का बरे उतरला असावा ? हां एक शक्यता आहे, जॅकलला आपली योजना ओ. ए. एस.-वाल्यांना देखील कळू नये असे वाटत असले पाहिजे. काही माणसे अशी असतात की ज्यांचा स्वतःच्या बुद्धीवरच काय तो विश्वास असतो. अशी माणसे फारशी कोणात मिसळत नाहीत. जॅकल तसाच असला पाहिजे.

हॉटेलमालकाला त्याने पुन:पुन्हा विचारले होते, 'डगनच्या वागण्या-बोलण्यात काही वेगळेपणा आढळला का ?'

आणि हॉटेल मालकाने एकच उत्तर दिले होते, 'हा कोणी वेगळा प्रवासी आहे अशी मला किंचितही शंका आली नाही एवढं त्याचं वागणं अगदी साधं होतं.'

लेबेलने टेबलाच्या खणातून कॅलथ्रॉप आणि डगन यांचे फोटो काढले आणि तो त्या दोन फोटोतील साम्य निरखून पाहू लागला. त्याच्या मनात हा विचार येत होता, कॅलथ्रॉप आणि डगन ही नावे घेऊन वावरणारा जॅकल प्रत्यक्षात कसा दिसत असला पाहिजे ! या फोटोंवरून तरी हा माणूस एवढा भयानक असेल असे वाटत नाही. पण चेहेरा आणि स्वभाव यांचे नाते असलेच पाहिजे असा काही नियम नाही. त्यातून जॅकल भलताच धाडसी असला पाहिजे. त्या-शिवाय द गॉलसारख्या नेहमी कडक बंदोबस्तात वावरणाऱ्या नेत्याच्या खुनाची हमी त्याने घेतली नसती. द गॉलपासून वीस यार्डावर असलेल्या स्त्रियांच्या हॅंडबॅगाही तपासल्या जातात, अशा परिस्थितीत ही स्वारी रायफल बरोबर घेऊन द गॉलपर्यंत पोहोचणार कशी ?

हे सारे पटण्याजोगे असले तरी जॅकलने ते आव्हान स्वीकारले आहे ही वस्तुस्थितीही लेबेलला नाकारता येत नव्हती. जॅकल आपल्याला सापडेल अशी ग्वाही त्याचे एक मन देत होते. जॅकल जे नाव घेऊन फ्रान्समध्ये येणार आहे ते नाव आपल्याला कळले असल्यामुळे जॅकलचा ठावठिकाणा सापडणे फारसे कठीण जाणार नाही असा त्याचा कयास होता. डगन हे नाव घेऊन जॅकल पॅरिस-मध्ये येणार आहे हे आपल्याला कळले आहे हे जॅकलला कळले नसणार असेही लेबेल मानीत होता.

बिचारा लेबेल ! □

डगनसंबंधीच्या विचारात लेबेल बुडून गेलेला असतानाच त्याला लंडनहून टॉमसचा फोन आला, 'डगन बी. ई. ए.च्या विमानानं गेल्या सोमवारी सकाळी लंडनहून रवाना झालाय.'

'कुठं ? पॅरिसकडे ?'

'नाही. त्याने लंडन ते ब्रुसेल्स असं तिकिट काढलं होतं.'

'तिथून तो कुठं गेला असावा याची काही माहिती आहे काय ? कदाचित तो लंडनला परतला असावा.'

'नाही, तो परत लंडनला आलेला नाही.'

टॉमसबरोबरचे बोलणे आटोपल्यावर लेबेलने ब्रुसेल्सला फोन करून टॉमसकडून कळालेली माहिती तेथील पोलिसप्रमुखाच्या कानांवर घातली आणि त्याला अधिक तपास करण्यासंबंधी विनंती केली. बेल्जियन पोलिसप्रमुखाने ब्रुसेल्स विमानतळावर चौकशी केली आणि त्याने लेबेलला कळविले, 'डगन गेल्या सोमवारी लंडन-हून इथं आला होता हे खरं आहे, पण त्याचा इथं मुक्काम फक्त पाचच तास होता. दुपारच्या विमानानं तो मिलानला गेला.'

लेबेलने मिलान येथील 'इंटरपोल'च्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला. मिलानहून डगनसंबंधी काय कळते आहे याची तो वाट पहात असतानाच इटली आणि फ्रान्स यांच्या सीमारेषेवर असलेल्या फ्रेंच तपासणी-नाक्यावरून त्याला कळविण्यात आले, 'डगन नावाचा माणूस काल सकाळी मिलानहून इथं आला आणि इथून त्यानं दक्षिणेकडे प्रयाण केलं एवढी नोंद आमच्याकडे झाली आहे.'

लेबेलने कपाळाला हात लावला. जॅकलने फ्रान्सच्या भूमीवर पाऊल टाकल्याला तीस तास होऊन गेल्यावर त्याला ही माहिती कळत होती.

लागलीच त्याने कॅरॉला बोलावून घेऊन सांगितले, 'डगन आता फ्रान्समध्ये येऊन पोहोचलाय. आपल्याला तातडीनं त्याचा शोध केला पाहिजे. नाही तर–!'

डगनसंबंधी जागरूक राहण्याचा इशारा सगळ्या पोलिस ठाण्यांना अगोदरच देण्यात देण्यात आलेला होता. त्यामुळे डगनला लपून राहणे फार काळ शक्य होणार नाही असा लेबेलला विश्वास वाटत होता. पण या आशेवर विसंबून राहून स्वस्थ बसून चालण्यासारखे नव्हते. कारण डगन फ्रान्समध्ये येऊन पोहोचला होता आणि तरीही त्याच्या प्रवासाचा मार्ग कळत नव्हता.

एवढ्यात गॅप नावाच्या खेडेगावातून लेबेलला फोन आला, 'डगनचा काल रात्री इथल्या एका हॉटेलात मुक्काम होता असं आम्हाला आताच कळलं. आम्ही लागलीच तिथं गेलो, पण सकाळी दहाच्या सुमाराला त्यानं हे गाव सोडलंय. कदाचित तो रात्री इथं परत येईल. कारण त्यानं आपण दोन दिवस इथं राहणार आहोत असं त्यानं हॉटेलमालकाला काल रात्री सांगितलं होतं.'

'तो तिथं परत आला तर ठीकच आहे. पण तो इतका धूर्त आहे की तो आपल्या पहिल्या मुक्कामावर परतणार नाही. बरं, त्याच्या मोटारीची कुठंतरी नोंद झाली असेलच. तेवढा तपशील सांगा.'

'तो अल्फा स्पोर्ट्स् कारमधून प्रवास करीत आहे. गाडीचा नंबर आहे एम. आय. ६१७४१.'

'ठीक आहे. थँक यू.'

लेबेलने हमरस्त्यांवर गस्त घालणाऱ्या पोलीसखात्याला कळविले— 'अल्फा मेक एम. आय. ६१७४१ नंबरची गाडी कुठं आढळली तर ती अडवा आणि लागलीच मला खबर करा.' ◻

गॅपसारख्या आडवळणाच्या खेड्यातील हॉटेलात रात्र काढून जॅकलने दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता ते गाव सोडले. गॅपमधून बाहेर पडण्यापूर्वी त्याने पोस्ट ऑफिसात जाऊन पॅरिसला फोन करून तेथील ताजी बातमी विचारली. नंतर त्याने एका दुकानातून रंगाचे डबे आणि ब्रश खरेदी केला. गॅपमधून बाहेर पडल्यानंतर तासा-दीड तासाने जॅकलने जंगलाचा रस्ता धरला. या भागात सहसा कोणी येत नाही याची त्याने भोवतालचा परिसर न्याहाळून खात्री करून घेतली आणि मग त्याने आपल्या मोटारीला निळा रंग द्यायचे काम आरंभिले. मोटारीच्या मागे आणि पुढे असलेल्या नंबरप्लेट काढून घेतल्या आणि त्या जागी नव्या बसविल्या. पॅरिसमध्ये खरेदी केलेल्या मोटारींच्या नंबरामध्ये शेवटी ७५ हा आकडा असतो हे त्याने मागच्या मुक्कामात पाहून ठेवले होते. त्यामुळे नवी नंबरप्लेट बसविली तेव्हा शेवटी ७५ हा आकडा लिहिला. 'अल्फा'चा पहिला रंग आणि नंबर बदलल्यामुळे, सीमा-चौकीवर नोंद झालेली आपली मोटार शोधणे पोलिसांना शक्य होता कामा नये यासाठी जॅकलला एवढी दक्षता घेणे भागच होते.

त्याने आपली गाडी सुरू केली तेव्हा पावणेचार वाजले होते. ◻

क्लॉड लेबेल आणि कॅरॉं गॅप गावात पोहोचले तेव्हा पावणेपाच झाले होते. ज्या हॉटेलमध्ये जॅकल एक रात्रभर राहून गेला होता त्या हॉटेलच्या मालकाकडून लेबेलला फारशी नवी माहिती मिळू शकली नाही. 'डगन गॅपच्या पुढे गेला आहे' हे एवढेच त्याला कळू शकले.

गॅपमधून बाहेर पडताना कॅरॉंने लेबेलला विचारले, 'आपण इथं दोन दिवस राहणार आहोत असं डगननं हॉटेलमालकाला सांगितलं होतं आणि हा हॉटेलमालक तर म्हणतोय, बिल चुकतं करून डगननं हॉटेल सोडलंय. हॉटेलवाला खोटं तर बोलत नाही ना?'

'नाही. डगननं आपला इथं दोन दिवस राहायचा बेत आज सकाळी बदलला असला पाहिजे. तो इथून कुठं गेलेला आहे हे इथं कळणार नाही. पण त्याच्या मोटारीचा नंबर आपल्याला मिळालेला आहे. त्यामुळे जिथं कुठं ती मोटार आढळेल तिथं ती नक्कीच पकडली जाईल. आपण पॅरिसला परत जाऊ. इथं थांबून काहीच कार्यभाग होणार नाही.'

नेहमीप्रमाणे रात्री दहा वाजता गृहमंत्री फ्रेच्या कचेरीत गृहखात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक भरली. लेबेलने आपण गॅपला जाऊन आल्याचे सांगताच सॅन्तक्लेअर कुत्सित स्वरात म्हणाला, 'डगन जिथं उतरला होता तिथं जाऊन देखील तुम्हाला त्याचा ठावठिकाणा कळू नये म्हणजे कमालच म्हटली पाहिजे. असा तपास होत राहणार असेल तर जॅकल पॅरिसला येऊन पोहोचला तरी कळायचा नाही.'

लेबेलने आपला शांत स्वभाव सोडला नाही. सॅन्तक्लेअरच्या उपहासाकडे लक्ष न देता तो उत्तरला, 'गॅपमधल्या एका हॉटेलात डगन उतरला आहे हे कळताच मी आणि कॅरॉं तिथं हेलिकॉप्टरनं जाऊन आलो. पण आम्ही तिथं पोहोचण्यापूर्वीच डगननं ते गाव सोडलं होतं. त्यामुळे त्याचा पाठलाग करणं शक्य नव्हतं. दुसरं असं की, फ्रेंच पोलीसखातं डगन नावाच्या खुनी माणसाच्या शोधात आहे, ही बातमी जाहीर होता कामा नये अशी मला सक्त ताकीद देण्यात आली आहे. त्यामुळे सगळीकडे याबाबत वाच्यताही करता येत नाही. तपासाला वेळ लागतोय याचं हे मुख्य कारण आहे.'

तरीही सॅन्तक्लेअर गप्प बसला नाही. तो म्हणाला, 'तू तिथं जाणार आहेस हे डगनला अगोदर कुणाकडून तरी कळलं असल पाहिजे. म्हणूनच त्यानं तातडीनं ते गाव सोडलं असलं पाहिजे.'

'तशी शक्यता मला कमी वाटते. उगाच धोका पत्करायला नको म्हणून त्यानं पहिला बेत बदलला असावा.'

बारा वाजता बैठक संपली. ◻

याच वेळेला जॅकलची गाडी उसेल गावातल्या एका छोट्या हॉटेलापाशी थांबली. दिवसभर त्याच्या पोटात काहीच गेले नसल्यामुळे त्याने हॉटेलवाल्याला म्हटले, 'वेळ बराच झालाय, हे मला माहीत आहे. पण निदान कॉफी आणि पाव मिळेल का? मला खूप भूक लागलीय.'

गरम कॉफी आणि पावाचा भला मोठा तुकडा पोटात गेल्यावर जॅकलला तरतरी आली. नंतर त्याने ते गाव सोडले आणि जंगलाचा रस्ता धरला. टॉर्च हातात घेऊन त्याने मोटारीतील तीन सूटकेसेस आणि खाली बांधलेली रायफल रस्त्यावर ठेवली आणि मग भोवतालचा पालापाचोळा त्या गाडीच्या अवतीभोवती रचला. जवळ गेल्याशिवाय येथे कोणी तरी मोटार टाकलेली आहे हे कळू नये एवढी व्यवस्था केल्यानंतर सूटकेसेस आणि रायफल हातात घेऊन तो हमरस्त्याच्या दिशेने चालू लागला. एवढे वजन हातात असल्यामुळे त्याला झपझप चालणे शक्य होत नव्हते. वाटेत थोडे थांबून तो पुन्हा वाटचाल करीत करीत हमरस्त्यापाशी पोहोचला. रायफलीचे सुटे भाग एका सूटकेसमध्ये भरून तो त्या रस्त्याच्या वळणावर दीड-दोन तास बसून राहिला. साडेपाचच्या सुमाराला तेथून एक मालमोटार जाताना आठवली होती. हात हलवून जॅकलने ड्रायव्हरला गाडी थांबविण्याची विनंती केली.

'का, गाडी बंद पडली का?' मालमोटारीच्या ड्रायव्हरने नेहमीच्या सवयीप्रमाणे विचारले.

'नाही. पायी प्रवासाला निघालोय. जे वाहन मिळेल ते पकडून पुढचा टप्पा गाठायचा अशी भटकंती करतोय सध्या. काल रात्री उसेलला मुक्काम केला आणि पुढच्या गावी जाणारं वाहन मिळतं की काय हे पाहण्यासाठी चालत चालत येऊन इथं थांबलोय.'

'जायचंय कुठं?'

'प्रथम तुले इथं. नंतर बोर्डेला मामाकडे.'

'मी तुलेला नाही चाललो. एग्लेतन्स गावापर्यंत तुम्हाला पोहोचवितो. तिथं दुसरी गाडी बघा.'

'ठीक आहे,' असे म्हणत जॅकल मालमोटारीच्या मागच्या बाजूला जाऊन बसला. पावणेसातला तो एग्लेतन्स येथे पोहोचला. गावाच्या वेशीपाशीच एक उपाहारगृह होते. तेथे जॅकलने विचारले, 'इथं टॅक्सीस्टॅंड कुठाय?'

'तुम्हाला टॅक्सी हवीय. थांबा. मी फोन करून मागवितो,' हॉटेलच्या व्यवस्थापकाने सांगितले.

साडेसातला टॅक्सी आली. जॅकलने टॅक्सीवाल्याला विचारले, 'इथून शॉलेनिएर गाव किती दूर आहे?'

'अठरा किलोमीटर्स,'

'चला. मला तिथं जायचंय.'

शॉलेनिएर हे एक डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं अगदी लहानसे खेडेगाव. तिथल्या एका हॉटेलपाशी जॅकलने टॅक्सी सोडली आणि समोर उभ्या असलेल्या खडुताला विचारले, 'मादाम कोलोते इथंच राहतात ना?'

'होय.'

'मला त्यांच्याकडे जायचंय.'

'पण एवढं सामान घेऊन तुम्ही पायी कसं जाणार तिथं. त्या टेकडीवर त्यांचा बंगला आहे. जीपने जावं लागेल. जीप हवीय?'

'मागवा.'

मादाम कोलोतेच्या प्रासादतुल्य बंगल्याच्या पायऱ्या चढत असतांना जॅकलला दोन दिवसांपूर्वी गॅप येथल्या हॉटेलमध्ये या धनाढ्य प्रौढेच्या सहवासात व्यतीत केलेली धुंद रात्र आठवली. त्या आधारावरच तो येथे आला होता. ही बाई पुन: आपल्याला जवळ करते की नाही याची त्याला खात्री नव्हती. म्हणून मादाम कोलोतेची भेट होईपर्यंत तो काहीसा अस्वस्थ होता.

पण एकाकी जीवन जगणाऱ्या त्या प्रौढेला जॅकलसारख्या बेदरकार जीवन जगणाऱ्या पुरुषाबद्दल वेगळेच आकर्षण वाटत होते. तिच्या डोळ्यातील ती सूचक भावना जागी होताच सुटकेसेस खाली ठेवून जॅकलने तिला आपल्या घट्ट बाहुपाशात घेतले. ◻

अजून जॅकल कसा सापडत नाही हा एकच प्रश्न लेबेलला सारखा सतावीत होता. तो फ्रान्समध्येच आहे की जवळच्या दुसऱ्या कोणत्या देशात निघून गेला हेही कळायला मार्ग नव्हता. त्यातून सॅन्तक्लेअर दररोजच्या बैठकीत असा काही हिणवायचा की नको त्या बैठकीला जाणे असे लेबेलला वाटायचे.

तो अक्षरशः वैतागला होता.

एवढ्यात उसेलहून फोन आला. 'आमच्या गावापाशी एक जुनी मोटार सापडलीय. ती निळ्या रंगाची असली तरी तो रंग घाईघाईनं दिलेला दिसतोय. शिवाय बाजूला एक नंबर प्लेट आढळली. तिच्यावर नंबर आहे, एम. आय्. ६१७४१! ही डगनचीच मोटार असावी आणि त्यानं ती मुद्दामच इथं टाकून दिली असावी. याचा अर्थ डगन या भागातच कुठंतरी असावा. मला वाटतं, तुम्ही इथं आलात तर बरं होईल.'

लेबेलचा वैताग क्षणात विरघळून गेला.

त्याने कॅरॉंला सांगितले, 'आज संध्याकाळी आपण हेलिकॉप्टरनं उसेलला जाणार आहोत. तत्पूर्वी मी गृहमंत्र्यांना भेटून येतो.'

फ्रेने लेबेलचा वृत्तान्त ऐकून घेतल्यावर विचारले, 'या साऱ्या प्रकारावरून तुला काय वाटतंय?'

'फ्रान्समध्ये पदार्पण केल्यानंतर आपली मोटार कुणी ओळखू नये म्हणून जॅकलनं प्रथम तिचा रंग आणि नंबरप्लेट बदलली असावी. हे काम त्यानं गॅप ते उसेल या मार्गावर पार पाडलं असलं पाहिजे. आपलं डगन हे नाव पोलिसांना कळलं आहे हे नंतर त्याला कळलं असावं म्हणून त्यानं ती गाडी टाकून दिली असावी.'

'पण डगन-प्रकरण इथं बैठकीला जमणाऱ्यांशिवाय कुणालाच माहीत नाही. म्हणजे आपल्यापैकीच कुणीतरी जॅकलला बातम्या पुरवीत असला पाहिजे असं तुला सुचवायचं आहे काय?'

'तसं नाही मला म्हणायचं. पण आपण कोणाच्या तपासात आहोत हे ज्यांना माहीत आहे त्यांच्यापैकी कुणीतरी कळत नकळत बाहेर बोलत असलं पाहिजे आणि तेथून ओ. ए. एस. च्या पॅरिसमधल्या माणसामार्फत जॅकलला बैठकीत आपलं काय ठरतं ते समजलं असलं पाहिजे. तसं नसतं तर गाडी टाकून पळून जाण्याचं जॅकलला काहीच कारण नव्हतं. मी म्हणतो ते पटतंय ना?'

फ्रेला आता या क्षुल्लक चर्चेत रस नव्हता. म्हणून तो म्हणाला 'तू असं कर, ताबडतोब उसेल इथं जाऊन ये. तिथं तुला जॅकलचा ठावठिकाणा कळू शकेल. निदान आपण प्रयत्नात तरी उणे पडता कामा नये.'

लेबेल उसेलला जाऊन आला. लगेच त्या भागातील सगळ्या रस्त्यांवर गुप्तचरांची गस्त सुरू झाली.

संध्याकाळी सॅन्तक्लेअर फ्रेला भेटायला आला तेव्हा फ्रेने लेबेल उसेलला जाण्यापूर्वी काय म्हणाला ते त्याला सांगितले. घरी परतल्यावर सॅन्तक्लेअर जॅकेलिनला म्हणाला, 'आमचा हा लेबेल म्हणज शुद्ध गाढव आहे. म्हणतो काय की आमच्यापैकी कुणामार्फत तरी जॅकलला बैठकीत काय घडतं ते कळलं असलं पाहिजे. महामूर्ख आहे तो.'

जॅकेलिन निर्विकार चेहेऱ्याने म्हणाली, 'तू काय म्हणतो आहेस यातलं मला काहीही कळत नाही. मला त्यात रसही नाही. मला तू हवा आहेस. ये ना.'

जॅकेलिनच्या कमरेभोवती विळखा घालीत सॅन्तक्लेअर म्हणाला, 'तुम्ही बायका म्हणजे अशाच. घराबाहेर काय भयंकर घडत असतं हे तुम्हाला कधी जाणून घ्यावसं वाटतच नाही.'

जॅकेलिन त्याला अधिकच बिलगली. ◻

मादाम कोलोतेच्या घरचा सारा दिवस आणि रात्र जॅकलच्या दृष्टीने अशा काही नशेत गेली की आतापर्यंतच्या साऱ्या आयुष्यात त्याला एवढे सुख लाभले नव्हते. तरीही तो सावध होता. सकाळी मादाम उठायच्या आतच तो उठला आणि बाहेरच्या खोलीत जाऊन अगदी बारीक आवाजात त्याने पॅरिसला फोन केला,

'मी जॅकल.'

'मी वाल्मी.'

'काय खबर आहे?'

'तू टाकून दिलेली गाडी पोलिसांना सापडली आहे.'

'ठीक आहे.'

वाल्मीने फोन खाली ठेवल्यावर जॅकलने आपला पहिला बेत बदलला. येथे चांगले दोन दिवस रहावे आणि मादाम कोलोतेच्या मादक स्पर्शात बाकीचे सारे काही विसरून जावे असा त्याचा येथे येताना विचार होता. पण आता येथे रहाणे धोक्याचे ठरण्याची शक्यता होती.

फोन खाली ठेवल्यावर त्याला आतला रिसीव्हरही खाली ठेवण्यात आल्याचा आवाज त्याला ऐकू आला. म्हणजे आपले बोलणे आतल्या रिसीव्हरमधून मादाम कोलोतेने ऐकले असले पाहिजे. पण ती जागी कशी झाली? का तिने आपल्यास फसविण्यासाठी झोपेचे सोंग घेतले होते. तो हलक्या पावलानी आत गेला तेव्हा मादाम कोलेते त्याची सूटकेस उघडून बसली होती. रायफलचे सुटे भाग तिच्या हातात होते. क्षणभर दोघांपैकी कोणीच बोलेना. दोघांनीही परस्परांना बेसावध अवस्थेत गाठले होते. जॅकलने तिला स्पष्टच विचारले, 'मी पॅरिसमधल्या माझ्या मित्राशी जे काही बोललो ते तू ऐकलेलं दिसतंय. खरं ना?'

'होय, तू उठलास तेव्हा मीही जागी होते. म्हणून तू कुणाशी बोलत आहेस हे मला जाणून घ्यायचं होतं, आणि सूटकेसमध्ये ही रायफल कशासाठी ठेवली आहेस? कोणाचा खून करायचा विचार आहे की काय?'

जॅकल काहीच बोलेना.

मादाम कोलोते म्हणाली, 'तू त्या ओ. ए. एस.वाल्यांपैकी दिसतोस. द गॉलचा खून करण्यासाठीच तू फ्रान्समध्ये आला असावास. माझा अंदाज खरा असला पाहिजे.'

तरीही जॅकल स्तब्धच होता.

गाऊन चढवत मादाम कोलेते दरवाजाकडे लगबगीने जाऊ लागली. जॅकल धावत धावत तिच्या पाठोपाठ गेला आणि त्याने तिला पलंगावर ढकलून दिले. ती ओरडायचा प्रयत्न करते आहे न करते आहे तोच जॅकलने तिचा गळा दावला. तिच्या तोंडातून अस्फुटशी किंकाळी बाहेर पडली. पण भोवतालच्या आऊटहाऊसमध्ये राहणारी नोकरमाणसे अद्याप कामावर आलेली नव्हती त्यामुळे जॅकलला तेथून चटकन बाहेर पडता आले.

तो खालच्या मजल्यावर गेला आणि स्नानगृहात जाऊन त्याने हात आणि तोंड धुतले. नंतर डोक्यावरचे केस बरेच कमी केले. सूटकेसमधला त्याने जेन्सेन या डॅनिश धर्मोपदेशकाचा पोशाख चढविला आणि कोलेतेचीच मोटार घेऊन गावाबाहेर पडला.

टुले गाव यायच्या आधी जॅकलने डगनचे कपडे आणि पासपोर्ट ठेवलेली सूटकेस पुलावरून नदीत फेकून दिली. नंतर त्याने टुले गाठले आणि स्टेशनजवळच्या अलिकडच्या गल्लीत कोलोतेची मोटार ठेवून दोन सूटकेसेस हातात खेळवीत तो रेल्वे स्टेशनवर पोहोचला.

'मला पॅरिसला जायचंय. दुसऱ्या वर्गाचं इथनं भाडं काय आहे?'

'९७ फ्रँक्स.'

'गाडी केव्हा आहे?'

'अकरा पन्नासला. म्हणजे अजून जवळजवळ एक तास आहे. तुम्ही पहिल्या नंबरच्या प्लॅटफॉर्मवर थांबा. पॅरिसला जाणारी गाडी तिथंच येते. शिवाय त्या प्लॅटफॉर्मवर रेस्तारॉंही आहे.'

गाडी ठरल्या वेळेपेक्षा थोडी उशीरा आली. त्या गाडीतून जॅकल पॅरिसकडे निघाला. ¤

उसेलहून लेबेलला फोन आला, 'एग्लेतन्स गावाजवळच्या एका बंगल्यामध्ये त्या बंगल्याच्या मालकिणीचा आज सकाळी खून करण्यात आला आहे. खुनी माणसानं त्या बाईची मोटार पळविली आहे.'

'त्या गाडीचा नंबर माहीत आहे? नसला तर चौकशी करून ती गाडी कुठं आढळते आहे का याचा शोध घ्या.'

थोड्या वेळाने उसेलहून लेबेलला पुनः फोन आला— 'ती गाडी टुले रेल्वेस्टेशनजवळ सापडली आहे.'

'तुलेहून पॅरिसला जाणारी आगगाडी केव्हा सुटते?'

'अकरा पन्नास वाजता. पण आज ती थोडी उशीरा सुटली.'

'ती पॅरिसला केव्हा पोहोचते?'

'रात्री आठ वाजून दहा मिनिटांनी.'

लेबेल कॅरॉंला घेऊन पॅरिस स्टेशनवर गाडीच्या वेळेआधी दहा मिनिटे पोहोचला. पण तेथे त्याला संशयित प्रवासी आढळला नाही.

लेबेलने तुले येथल्या स्टेशनमास्तरला फोन करून तेथे गाडीत कोण कोण चढले याची माहिती विचारली होती आणि एका डॅनिश धर्मोपदेशकाने तुले येथे पॅरिसचे तिकीट खरेदी केले एवढे त्याला या चौकशीत कळू शकले होते. म्हणून तो पॅरिस स्टेशनावर डॅनिश धर्मोपदेशकाच्या वेषातील माणूस न्याहाळत होता, पण तसा कोणीच न आढळल्याने लेबेल निराश झाला.

जॅकल पॅरिसच्या अगोदरच्या स्टेशनावर उतरून टॅक्सीने पॅरिसमध्ये आलेला होता.

रात्रीच्या बैठकीत नेहमीप्रमाणे लेबेलने त्या दिवसातील साऱ्या घडामोडी कथन केल्या. जणू काही द गॉलच्या जीविताची सारी जबाबदारी आपल्या एकट्याच्या शिरावर आहे अशा थाटात सॅन्तक्लेअर म्हणाला, 'या सगळ्याचा अर्थ एवढाच आहे की, जॅकल आता खुद्द पॅरिसमध्ये येऊन पोहोचला असून आता त्यानं नवं नाव आणि नवा वेष परिधान केला आहे. एक परदेशी खुनी माणूस फ्रान्सच्या राजधानीत येऊन पोहोचल्यावरही आपल्याला सापडू नये हे लाजिरवाणे आहे.'

सॅन्तक्लेअरच्या वडबडीकडे लक्ष न देता फ्रेने लेबेलला विचारले, 'पॅरिसमध्ये डॅनिश लोकांची वस्ती किती असावी?'

'शेकड्यांनी.'

'मग या जॅकलला शोधून काढायचा कसा? एक गोष्ट आहे, जॅकल कोणत्या तरी हॉटेलमध्ये उतरणार. म्हणून प्रत्येक हॉटेलमध्ये जाऊन आज नवे कोण प्रवासी आले याची चौकशी करायचा.'

लेबेल अधिकच गोंधळात पडला.

कचेरीत परतत असताना कॅरॉं त्याला म्हणाला, 'मला एक कल्पना सुचलीय. जॅकलजवळ सध्या डॅनिश पासपोर्ट असेल ना?'

'होय. मग?'

'एक तर हा पासपोर्ट बनावट असणार किंवा जॅकलनं चोरलेला असणार. बहुधा त्यानं तो चोरलेलाच असावा.'

'बरं, मग?'

'जॅकल इथं येण्यापूर्वी लंडनला रहात होता हे आता आपल्याला समजलंय. याचा साधा अर्थ असा आहे की, त्यानं लंडनला असतानाच डॅनिश पासपोर्टाची चोरी केली असणार. ज्याचा पासपोर्ट चोरीला गेला असेल त्यानं लंडनमधल्या डॅनिश वकिलातीत जाऊन नवा पासपोर्ट मागितला असावा. म्हणून टॉमसला आपण असं सांगावं की, डॅनिश वकिलातीत जाऊन कुणाचा पासपोर्ट चोरीला गेला आहे का आणि त्या बदली त्याला नवा पासपोर्ट दिला आहे का याची चौकशी कर.'

कॅरॉंच्या या कल्पनाशीलतेवर लेबेल बेहद्द खूष झाला. कॅरॉंच्या सांगण्याप्रमाणे त्याने टॉमसला फोन केला. ¤

ज्या वेळेला फ्रेंच गुप्त पोलीस खाते पॅरिसमधल्या हॉटेलातील डॅनिश प्रवाशांबद्दल माहिती मिळवीत होते त्या वेळेला जॅकेलिन वाल्मीला फोनवरून सांगत होती— 'जॅकल डॅनिश माणसाचा वेष धारण करून पॅरिसला आलाय हे पोलिसांना कळलंय. ते प्रत्येक हॉटेल धुंडाळताहेत.'

हा फोन होताच टेलिफोन ऑपरेटरने लेबेलला कळविले— 'दररोज भल्या पहाटे जी बाई फोन करते तिनं आताच फोन केला.'

'कोणत्या नंबरला?'

'एम. ५९०१.'

'हा फोन कोणत्या पत्त्यावर आहे हे डिरेक्टरी पाहून मला सांगा.'

लेबेलला आता वाल्मीचा पत्ता मिळाला होता. कॅरॉंला बरोबर घेऊन तो वाल्मीच्या घराकडे जायला निघाला.

वाटेत कॅरॉंने विचारले, 'ती फोन करणारी बाई कोण आहे? तिचा पत्ता?'

'तेही सारं लवकरच मिळेल. मघाचं तिचं बोलणं ध्वनिमुद्रित करण्यात आलंय.'

टेलिफोन ऑपरेटरने दिलेल्या पत्त्यावर लेबेल जाऊन पोहोचला तेव्हा एक साधा गरीब शाळामास्तर वह्या तपासत होता. लेबेलने त्याला दरडावून विचारले, 'आपण वाल्मी हे नाव घेतलंय हे आम्हाला कळलंय.'

या बोलण्याचा आपल्याला काहीच बोध झालेला नाही असे दाखवीत वाल्मी म्हणाला, 'आधी आत या. मग बोलू.'

'आम्हाला तुमच्याशी बोलायला वेळ नाही. तुम्ही मुकाट्यानं आमच्याबरोबर चला.'

'बराय,' म्हणत वाल्मी कॅरॉंबरोबर बाहेर पडला.

लेबेल तेथेच थांबला.

दहा-एक मिनिटांत वाल्मीच्या घरातील फोनची घंटा निनादली. लेबेलने फोन घेतला. पलीकडची व्यक्ती सांगत होती— 'मी जॅकल.'

'मी वाल्मी,' लेबेल उत्तरला.

'काय, ताजी बातमी काय आहे?'

'काही नाही. पण सध्या तुझा मुक्काम कुठं आहे?'

'क्वा दे ग्रान्द ऑगस्तिन्स हॉटेलमध्ये. का?'

'नाही. उगाच विचारलं.'

या चौकशीवरून फोन वाल्मीने घेतलेला नसावा असा जॅकलला संशय आला. ¤

लेबेल आपल्या कचेरीत पोहोचला तेव्हा टॉमसकडून त्याला निरोप आलेला होता, 'पेर जेन्सेन नावाच्या डॅनिश धर्मोपदेशकाने चौदा जुलैला आपला पहिला पासपोर्ट हरविल्यामुळे आपल्याला नवा




## वर्गणी

¤ 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

¤ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

¤ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

¤ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

पासपोर्ट देण्यात यावा असा अर्ज डॅनिश वकिलातीकडे केला होता.'

लेबेलने तडक ग्रा दे ग्रान्द आगस्तिन्स हॉटेल गाठले आणि काऊंटरवरील माणसाला विचारले, 'मला पेर जेन्सेन याना भेटायचंय, ते इथंच उतरले आहेत ना ?

'उतरले होते, पण तासापूर्वीच त्यांनी हे हॉटेल सोडलं.'

लेबेल खूप हळहळला. ◻

जॅकल गारे दॉस्तरलित्झ हॉटेलमध्ये आला तो पेर जेन्सेन म्हणून नव्हे तर मार्टी शुलबर्ग हा तरणाबांड अमेरिकन विद्यार्थी म्हणून. आपण पॅरिसमध्ये आलेले आहोत हे पोलिसांना कळल्यामुळे आपण यापुढे हॉटेलात राहता कामा नये एवढी जाणीव जॅकलला झाली होती. पण हॉटेलमध्ये रहायचे नाही तर कुठे रहायचे, कोणाकडे रहायचे ? तेच ठरविण्यासाठी तो या हॉटेलमधून बाहेर पडला.

पेर जेन्सेन हातातून निसटल्यामुळे कमालीचा खिन्न झालेला लेबेल आपल्या कचेरीत येरझारा घालीत असताना, त्याला पुन्हा टॉमसचा फोन आला. टॉमस सांगू लागला, 'तुमचं काम सोपं व्हावं म्हणून गेल्या महिन्यात कुणाकुणाला इथं नवे पासपोर्ट दिले गेले याची मी चौकशी केली तेव्हा असं कळलं की मार्टी शुलबर्ग या अमेरिकन विद्यार्थ्यानं लंडनच्या विमानतळावर आपला पासपोर्ट हरवल्याचं सांगून नवा पासपोर्ट मिळविला. याचा अर्थ जॅकलपाशी पेर जेन्सेन प्रमाणे मार्टी शुलबर्ग या अमेरिकन विद्यार्थ्याचं नाव असलेला पासपोर्टही असला पाहिजे मी तुला अमेरिकन वकिलातीमार्फत शुलबर्गचा फोटो धाडून द्यायची व्यवस्था करतो.'

रात्री दहा वाजता फ्रेच्या कचेरीत बैठक भरली तेव्हा 'आम्ही वालमीला पकडले आहे' असे जेव्हा लेबेलने सांगितले तेव्हा सगळे जण खूप झाले. पहिल्या प्रथमच सॅन्तक्लेअरने लेबेलसंबंधी भले शब्द काढले.

लेबेल पुढे सांगत होता, 'वालमीला ज्या बाईकडून बातम्या मिळत होत्या तिचा टेलिफोनवरचा आवाज आम्ही टेपरेकॉर्ड केला आहे. तो मी आता तुम्हाला एकवितो.'

टेपरेकॉर्डवरचा संवाद ऐकून झाल्यावर फ्रेने विचारले, 'ही बाई कोण आहे ?

लेबेल सॅन्तक्लेअरकडे पाहू लागला.

सॅन्सक्लेअर खाली मान घालून म्हणाला, 'हा जॅकेलिनचा, माझ्या प्रेयसीचा आवाज आहे.'

त्याने आपल्या जागेचे त्यागपत्र तेथल्या तेथे फ्रेच्या हाती देऊन तो मुकाट्याने बाहेर पडला. फ्रे लेबेलला म्हणाला 'खुनी माणूस पॅरिसमध्ये आलेला आहे हे मी राष्ट्राध्यक्षांना सांगितले. पण पंचवीस ऑगस्टचे जाहीर कार्यक्रम रद्द करायला ते बिलकुल तयार नाहीत. मला वाटतं, त्या दिवशी राष्ट्राध्यक्षांचे बरेच जाहीर कार्यक्रम असल्यामुळे जॅकलनं तोच दिवस मुक्रर केला असावा. म्हणून आपला त्या दिवशी सगळ्या समारंभाच्या ठिकाणी अगदी कडक बंदोबस्त हवा आहे.' ◻

रात्री बारा वाजेपर्यंत पॅरिसच्या निरनिराळ्या रस्त्यांवरून मनसोक्त भटकल्यानंतर दमला-भागलेला जॅकल एका बारमध्ये आला आणि त्याने व्हिस्की मागवली. त्याच्या पाठीमागच्या बाजूस दुसरा एक गृहस्थ एकटाच मद्य पीत बसला होता त्याला काय वाटले कोणास ठाऊक, तो जॅकलपाशी येऊन म्हणाला, 'तुम्हीही एकटे दिसता. मीही एकटा आहे. मी तुमच्या टेबलापाशी आलो तर चालेल का ?'

'अवश्य'

'आपलं नाव ?'

'ज्यूल्स बर्नार्ड.'

'तुमचं ?'

'मार्टी शुलबर्ग.'

दोघे बराच वेळ पीत होते. दोघे एकदमच बाहेर पडले. बर्नार्डने जॅकलला विचारले,

'तुम्ही कुठं उतरला आहात ?'

'माझ्याजवळचे पैसे संपले आहेत. दोन-चार दिवसात येतील, पण तोवर कुठं रहायचं याच काळजीत मी आहे.

'मग असं करा, तुमचे पैसे येईपर्यंत तुम्ही माझ्याकडे रहा. मी इथं एकटाच असतो. मलाही मदत होईल.'

२५ ऑगस्ट १९६३– रविवार

फ्रान्सचा चौदावा मुक्तिदिन. पॅरिसमध्ये आनंद-उत्साहाला उधाण आले होते. सकाळी नऊ वाजता द गॉलने आर्क द त्रियांफजवळच्या अज्ञात वीरांच्या समाधीला पुष्पचक्र वाहिले. नंतर नोत्रदाम चर्चमध्ये प्रार्थना झाली. तेथून द गॉल एका नव्या स्टेशनाच्या पायाभरणीसाठी जाणार होता. तेथे काही निवृत्त सैनिकांना त्यांच्या विशेष कर्तृत्वाबद्दल सन्मानपत्रके देण्यात येणार होती. द गॉल ज्या मार्गावरून जाणार होता त्याच मार्गावर मादाम बर्थचे हॉटेल होते. मागच्या मुक्कामात जॅकल बऱ्याच वेळा या हॉटेलात आला होता आणि मादाम बर्थशी त्याने ओळख करून घेतली होती. पण आज त्या हॉटेलच्या प्रवेशद्वारापाशी कडक बंदोबस्त होता. हॉटेलमधील सारे प्रवासी मुक्तिदिनाचा सोहळा बघण्यासाठी बाहेर गेलेले असल्यामुळे मादाम बर्थ प्रवेशद्वारापाशी खुर्ची टाकून विणत बसली होती. पोलिसांचा पहारा असल्याशिवाय आज हॉटेलमध्ये कोणालाही प्रवेश देऊ नका असे तिला सरकारी अधिकाऱ्यामार्फत बजावण्यात आले होते.

एवढ्यात अंगावर जुना लष्करी गणवेश घातलेला म्हातारा गृहस्थ लंगडत लंगडत तेथे आला आणि मादाम बर्थला म्हणाला, 'उन्हानं मी फार कासाविस झालोय. पाणी देता का ?'

'चला' असे म्हणत मादाम बर्थ आत गेली. हा म्हातारा तिच्या पाठोपाठ गेला आणि तिचा आवाज बाहेर ऐकू येणार नाही इतक्या अंतरावर मात्र गेल्यावर त्याने तिचा गळा दाबला. त्या खोलीला कडी लावून तो म्हातारा गृहस्थ थेट सहाव्या मजल्यावर गेला आणि एका खोलीत शिरून आतून त्याने कडी लावून घेतली आणि मग ओव्हरकोटमधून रायफलीचे सुटे भाग काढून तो रायफल जुळवू लागला.

द गॉल काही मिनिटातच तेथून जाणार होता.

म्हणून लेबेल तेथे आला आणि प्रत्येक पोलिसाला विचारू लागला, 'इथं आता तुमच्याशिवाय कुणी आलेलं नाही ना ?'

एक पोलिस म्हणाला, 'एक म्हातारा माणूस तेवढा इथं आला

होता.'

'कुठं गेला तो?'

'या हॉटेलांत.'

'काय?' लेबेल अक्षरशः किंचाळला.

तो त्या हॉटेलमधील प्रत्येक खोली तपासू लागला. सहाव्या मजल्यावरची एक खोली आतून बंद असल्याचे आढळून येताच त्याने दुसऱ्या बाजूला जाऊन त्या खोलीत कोण आहे हे पहाण्याचे ठरविले. एक तरुण आपल्या हातातील रायफल सरसावून सज्ज आहे हे दिसताच लेबेलने गॅलरीतून त्या तरुणावर झेप घेतली.

'जॅकल, आता तुझी धडगत नाही. तू माझ्या हातात सापडला आहेस' हे लेबेलचे उद्गार ऐकताच जॅकलने आपल्या अंगातील सारे बळ एकवटून लेबेलला दूर लोटण्याचा प्रयत्न केला. त्याने रायफलीचे टोक लेबेलकडे वळविले, एवढ्यात लेबेलने चपळाई करून रायफल आपल्या हातात घेतली.

या झटापटीत रायफलीतून गोळी सुटली आणि जॅकलचा देह रक्ताच्या थारोळ्यात पडला.


झालेला प्रकार फ्रेच्या कानावर घालून, मोठ्या निश्चित मनाने लेबेल आपल्या कचेरीत परतला तेव्हा आज आपण भरपूर विश्रांती घ्यायची असे त्याने मनाशी ठरविले होते. एवढ्यात लंडनहून टॉमसचा फोन आला—'लेबेल, कॅलथ्रॉप नुकताच लंडनमध्ये सापडलाय. त्यामुळे कॅलथ्रॉपनं जॅकल हे नाव घेतलं आहे हा आपला समज खोटा ठरलाय.'

'ते काही का असेना, पण आता त्याची फिकीर नाही. जॅकलची आणि माझी आता नुकतीच झटापट झाली आणि त्यात तो मरण पावला.'

'हे चांगलं झालं, पण 'जॅकल' खरा होता कोण?'

'कुणास ठाऊक!'

# समाप्त



# गाय गिब्सन

पृष्ठ २० वरून

पाठोपाठ चोहोबाजूंनी त्यांच्यावर प्रकाशाचे झोत पडले आणि विमानवेधी तोफांचा मारा सुरू झाला. त्याचे सतत प्रतिबिंब खालच्या पाण्यात पडत असल्याने तो दुप्पट असल्याचा आभास होत होता. खुद्द धरणदेखील आता एखाद्या मजबूत आणि बेदरकार किल्ल्यासारखे त्यांच्यासमोर उभे टाकले. सकाळी तळावर धरणाच्या छोट्या प्रतिकृतीचा अभ्यास त्यांनी केला होता. प्रत्यक्ष धरणलादेखील चंद्रप्रकाशात आभासात्मक कळा आली होती. मात्र दुरूनसुद्धा त्याचा कणखरपणा नजरेत भरत होता. गिब्सनला तर ते अभेद्यच वाटले.

तलावाच्या एका बाजूला असलेल्या टेकड्यांवर विरट्या घालत गिब्सनने आपल्या सहकाऱ्यांची विचारपूस केली. सातांनी ताबडतोब प्रत्युत्तर दिले. म्हणजे आत्तापर्यंत एकच विमान त्यांनी गमावले होते. हल्ल्याची वेळ झाली होती. पण का कोणास ठाऊक गिब्सन उगाचच दिरंगाई करत होता. तो खचला होता. इतक्या दिवसांचा अविश्रांत मेहनतीची परीक्षा पाहायला तो धजावत नव्हता. पण कितीही दिरंगाई केली तरी हल्ला करणे कसे टाळणार! त्याने धरणाकडे पुन्हा एकदा नीट पाहून घेतले, आणि क्षणभर त्याला असे वाटले की जगातला कुठलाच बाँब या उद्दाम धरणाला नमवू शकणार नाही.

नंतर, आपण पहिला हल्ला करीत असल्याची माहिती सर्वांना देऊन संघाचा उपकप्तान असलेल्या मेल्विन यंग ला तो म्हणाला, हॅलो मेल्विन, माझं काही बरंवाईट झालं तर मोहिमेची जबाबदारी तू घ्यायची.' एवढे म्हणून त्याने आपले विमान धरणाकडे वळविले.

तलावालगतच्या उंच झाडावरून पुढे सरकून विमान पाण्यावरून अगदी खालून उडू लागले. उड्डाण उंची निश्चित करण्यासाठी गिब्सनने पाण्यावर प्रकाश झोत टाकले. थोड्याच वेळात त्याला हवा असलेला प्रकाशांकित आठचा आकडा जलपृष्ठावर उमटला. गिब्सनच्या विमानावर चोहोबाजूंनी मारा चालू होता. त्याच्या समोर असलेल्या काचेतून विमानाच्या दिशेने येणारे गोळे त्याला सहज दिसत होते. आता तर धरणाची भिंतच एकदम काचेसमोर आली. अचानक, विमानोड्डाण केल्यापासून जिचा विसर त्याला पडला होता ती मृत्यूची भीती त्याला आठवली. या किंवा पुढल्या क्षणा ते अटळ घडणार अशी खात्री त्याला वाटली. वैमानिकाच्या मुखवट्या आडचा त्याचा चेहरा घामाने डबडवून गेला. त्याने त्या स्थितीतच फ्लाईट इंजिनिअर पुलफोर्डला म्हटले, 'माझ्याजवळ उभा राहा म्हणजे मी जखमी झालो तर मला ओढून काढून तुला विमान चालू ठेवता येईल.' पुलफोर्ड आश्चर्याने थक्क झाला. गिब्सनच्या तोंडून अशी भेकड भाषा त्याने कधी ऐकली नव्हती.

विमान आवश्यक त्या योग्य उंचीवरून उडत होते, त्याचा वेगही योग्य होता. विमानाचा बाँबफेक्या, प्रतिकारी माऱ्याला न जुमानता, गिब्सनला सूचना देत होता. सूचना देता देता अगदी बाँबफेकीच्या वेळी त्याचा आवाज भावनावेगाने चमत्कारिक झाला.

प्रतिकार करणाऱ्या जर्मनांचा गोंधळ व्हावा म्हणून संदेशक त्यांच्या दिशेने व्हेरे (verey) प्रकाशझोत फेकत होता. काही क्षणातच बाँबफेक्याने 'बाँब फेकला' असे उद्गार काढले, गिब्सनने अगदी वेळेवर विमान वर उचलले नाहीतर सरळ धरणावर आपटून त्याचा कपाळमोक्ष होणार होता. धरणावरून पलीकडे जाताना पिछाडीच्या गोलंदाजाने धरणभिंतीवरचे कित्येक जर्मन गोलंदाज टिपून काढले आणि विमान प्रतिकाराच्या पल्ल्याच्या बाहेर गेले.

गिब्सनच्या बाँबचा जेथे स्फोट झाला होता त्या ठिकाणी जवळजवळ हजार फूट उंच असे पाण्याचे विक्राळ कारंजे आकाशात उसळले होते. घुसळले गेलेले पाणी प्रचंड खळबळ करीत होते. त्याच्या लाटा धरणाच्या भिंतीवरून पलीकडे जात होत्या. जणू एखाद्या क्रोधाविष्ट जलराक्षसाची जलक्रीडा चालली होती. प्रथम गिब्सनला वाटले की धरण फुटलेच; परंतु स्फोटासरशी उसळलेले पाण्याचे कारंजे तलावात विलीन झाले, तेव्हा धरण जसेच्या तसे असल्याचे गिब्सनच्या लक्षात आले. तो काहीसा निराश झाला. परंतु अदृश्य आणि शक्तिमान असे अंतःप्रवाह धरणाला धडका देण्याचे काम करीत असतील अशी आशा त्याला वाटत होती.

नंतर कितीतरी वेळ पाण्यातील खळबळ शांत झाली नव्हती आणि पाणी शांत होईपर्यंत दुसरा बाँब टाकता येत नव्हता; कारण या बाँबच्या बाबतीत अनेक पथ्ये पाळणे आवश्यक होते त्यातले शांत पाण्यात तो फेकणे हे एक होते.

बऱ्याच वेळाने पाणी शांत झाले. आणि गिब्सनाने हॉपगुडला हल्ला करायला फर्मविले.

प्रतिकार करणाऱ्या जर्मनांना गिब्सनचे येणारे विमान जरी दिसले होते तरी त्याच्या हल्ल्याची पद्धती इतकी अभिनव होती की थोडा अनपेक्षिततेचा फायदा त्याला जरूर मिळाल. दुसरा हल्ला करणाऱ्या हॉपगुडला तो मिळण्यासारखा नव्हता. धरणावरच्या गोलंदाजाना हल्ल्याची दिशा आणि पद्धती परिचित झाली होती. आता आक्रमण करणाऱ्या लँकेस्टरसमोर अग्नीचा एक पडदा उभा करून त्यातून त्या लँकेस्टरला जाणे भाग पडल्याने जर्मनांचे काम होणार होते.

हॉपगुडच्या प्रकाशझोतांनी जलपृष्ठावर आठाचा आकडा रेखला. आणि इतक्यात त्याच्या विमानाच्या डाव्या पंखावर आघात झाला. तो पंख जळू लागला. त्यामुळे जर्मन गोलंदाजांना नेम धरणे सोपे झाले. तरीही योग्य उंचीवरून योग्य वेगाने हॉपगुडचे विमान पुढे जातच राहिले. ते देखील धरणाच्या भिंतीवर आदळणार असे वाटले. पण नाही. वेळेवर हॉपगुडने विमान उंचावले. दरम्यान कधीतरी बाँब पडला होता.

तो अचूक न पडता धरणाच्या पलीकडे असलेल्या विद्युत्पादन केंद्रावरती पडला. विमान धडपडत उंचावर जाण्याचा प्रयत्न करीत होते; कारण त्यायोगे सैनिकांना हवाई छत्रीच्या साहाय्याने ह्यातून उड्या मारून जीव वाचवणे शक्य होते. परंतु विमान जेमतेम जमिनीपासून पाचशे फुटांवर असेल नसेल इतक्यात त्याचा एक पंख तुटून पडला आणि विमान वेगाने खाली येत भूमीवर कोसळले.

## गिब्सनचे प्रसंगावधान

हॉपगुड गिब्सनचा जानी दोस्त होता. त्यानेच गिब्सनला लँकेस्टर विमानउड्डाणाच्या खाचाखोचा समजावून सांगितल्या होत्या. बाँब-



अखेर धरणाला भगदाड पडलेच !

हल्ल्याच्या दुसऱ्या सत्रात तो सतत गिब्सनचा सहकारी होता. होता. त्यामुळे त्याच्या मृत्यूने गिब्सन खचल्यासारखा झाला. आपल्या या मोहिमेला यश येण्याची शक्यता नाही असे त्याला वाटू लागले. हॉपगुड सारख्या बंद्या वीराची ही कथा तर मागून येणाऱ्यांची काय अवस्था होणार हे स्पष्टच होते. कर्णधार या नात्याने गिब्सनला काहीतरी उपाय योजना शोधणे भागच होते. चोहोबाजूंनी तोफा डागणाऱ्या जर्मनांना चकवले नाही, त्यांचे लक्ष विभागले नाही, त्यांचा गोंधळ उडविला नाही तर एकामागून एक सगळे स्क्वाड्रनच बळी जाण्याचा संभव होता.

'चला आपण साफ राखरांगोळी करू त्या जर्मन गोलंदाजांची' ट्रेव्हर रोपर हा गिब्सनचा गोलंदाज म्हणाला. गिब्सनचा मनातील विचारांना असा अकस्मात दुजोरा मिळाला. त्याच्या मनात एक कल्पना आकार घेऊ लागली.

इकडे हॉपगुडच्या बॉंबचा स्फोट होऊन धुराचे लोटच्या लोट उसळत होते. धरणाच्या पात्रात देखील घुसला होता. तो विरून जाईपर्यंत थांबणे भागच होते.

या मोहिमेतून वाचणे क्वचित शक्य आहे असे जर गिब्सनने मानले असेल तर आता ती थोडी शक्यता देखील पार मावळली होती. कारण आता हल्ला करणाऱ्या विमानावर जर्मन गोलंदाजांचा अशेष मारा एकवटू नये या साठी स्वतः गिब्सन तो आपल्या विमानावर ओढवून घेणार होता. त्यासाठी आपणच हल्ला करतो आहो असा सारा आभास तो उत्पन्न करणार होता.

त्याने मार्टिनला तिसरा हल्ला करण्यास फर्माविले आणि या हल्ल्याच्या वेळी आपण त्याला कशी मदत करणार याचीही माहिती दिली.

शाही विमान दलातील एक उत्कृष्ट वैमानिक चेशायर याच्या मते मार्टिन हा गिब्सनहून देखील काकणभर सरसच होता. मार्टिनने धरणाकडे झेप घेतली. गिब्सन त्याच्या बाजूने पण थोडचा पुढे विमान चालवत होता. मशिनगनच्या पल्ल्यात आल्याबरोबर गिब्सनने आपले विमान धरणाच्या समांतररेषेत आणले आणि त्याच्या गोलंदाजांनी धरणावरची जर्मन ठाणी उध्वस्त केली. हॉपगुडच्या नाशाचा जणू बदलाच ते घेत होते. इतके करूनही मार्टिनचे विमान जायबंदी झालेच. मात्र त्याचा बॉंब अचूक पडला होता. पुन्हा एकदा पाण्याचे कारंजे आकाशात उसळले होते. मार्टिनच्या विमानाच्या उजव्या पंखाला मोठे भगदाड पडले होते परंतु ह्या बाजूला असलेल्या पेट्रोलच्या टाक्या काही वेळापूर्वीच रिकाम्या झाल्या होत्या. त्यामुळे ते बचावले.

उसळलेले पाणी पुन्हा तलावात जमा होत असताना गिब्सन त्याच्याकडे उत्सुकतेने पहात होता. एकदा तर त्याला धरणाची भिंत हलल्याचाही भास झाला. पण त्याने पुन्हा बारकाईने पाहिले. भिंत तशीच निश्चल उभी होती. बार्न्स वॉलिसचा हिशेब खरा असता तर एव्हाना धरण निकालात निघायला हवे होते, असे गिब्सनला वाटले.

काहीशा उदासपणेच गिब्सनने चवथ्या विमानाला हल्ला करावयास सांगितले. त्याच्या मनात नाही नाही त्या शंका येऊ लागल्या. वॉलिसच्या सगळ्या सिद्धांतात काही अकल्पित दोष तर निर्माण झाला नाही ना ? हे सगळे बलिदान व्यर्थ तर जाणार नाही ना ?

गिब्सनच्या आदेशासरशी भोवतालच्या टेकडयांच्या आश्रयाने लपलेल्या विमानांपैकी एकेक गुहेतून एखाद्या श्वापदाने बाहेर यावे तसे बाहेर येत होते. चवथा हल्ला मेल्विन यंग करणार होता. याही वेळेला जर्मन हल्ला स्वतःवर ओढवून गिब्सन यंगला मदत करणार होता. यंग हल्ल्यासाठी आवश्यक पवित्रा घेत असताना, धरणाच्या पलिकडच्या बाजूला जर्मन तोफांच्या पल्ल्याच्या पलीकडे राहून, हल्ला करण्याचा सगळा देखावा करून, विमानाची चित्रविचित्र हालचाल करत जर्मन गोलंदाजाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यात गिब्सन मोठ्या आश्चर्यकारक रीतीने याही वेळी यशस्वी झाला होता. त्यामुळे आपला बॉंब अचूक जागी टाकण्यात टांगला फारशी अडचण पडली नाही. याही वेळेला पाणी प्रचंड उसळले आणि धरण भिंतीवरून पलीकडे विद्युत्पादनकेंद्राजवळून दरीत कोसळले.

'फोडले ! मी धरण फोडले ! मी धरण फोडले !' यंगने विजयोग्दार काढला. परंतु तो वस्तुस्थितीचा निदर्शक न ठरता फक्त त्याच्या उताविळीचा निदर्शक ठरला. पलीकडे गिब्सनला धरणभिंत पूर्ण शाबूत असल्याचे व्यवस्थित दिसले होते.

## धरण फुटले !

आत्तापर्यंत चार विमानांनी आपले बॉम्बस टाकले होते. त्यातील तीन बॉम्बस बिनचूक, अगदी हव्या त्या जागी पडले होते. बार्न्स वॉलिसचा अंदाज खरा असता तर धरण या बॉम्बफेकीने कोसळायलाच हवे होते. पण तसे झाले नाही. गिब्सनच्या संदेशकाने काहीशा निराशेने ग्रांथॅमला ही बातमी कळविली. तेथे हॅरिस आणि कोक्रेन अगदी अस्वस्थ झाले. बार्न्स वॉलिसने आपले मस्तक दोन्ही हातात घट्ट पकडून धरले. त्याच्या दृष्टीने पहिल्यापासून ही मोहीम म्हणजे एक वस्तुनिष्ठ प्रयोग होता. त्याच्याशी संबंधित व्यक्तींचा विचारच त्याच्या कधी मनात आला नव्हता. आता मात्र, अकस्मात, आपल्या प्रयोगाची सत्यता पटविण्यासाठी हे झुंजार वीर मृत्यूला आलिंगन देत आहेत याची जाणीव होऊन त्याचा जीव व्याकूळ झाला.

पण इकडे गिब्सनला मात्र आता नवी आशा वाटू लागली होती. आपण यशाच्या अगदी उंबरठ्यावर उभे आहोत असे त्याला खात्रीने वाटू लागले होते. ही मोहीम पूर्णतया यशस्वी होणार, इतकेच नव्हे तर ती यशस्वी झालेली पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभणार असा विश्वास त्याला वाटू लागला. वास्तविक धरणाची कणखर भिंत अजून तशीच उभी होती. झरणाऱ्या चंद्रप्रकाशात ती दुर्भेद्य भासत होती. परंतु तिचा पाया खचला आहे; तिची अवस्था केविलवाणी झाली आहे; असे गिब्सनचा आतला आवाज सांगत होता. म्हणूनच मोठ्या उत्साहाने त्याने पाचव्या लॅंकेस्टरला हल्ला करायला फर्मावले. हा हल्ला डेव्हिड माल्टबी करणार होता. आपली पाळी येण्याआधीच धरण कोसळून जाईल अशी भीती माल्टबीला वाटत होती. परंतु मॉन धरणाने त्यालाही संधी दिली होती.

यावेळी गिब्सन, एका वेगळ्याच कोनातून, धरणावर हल्ला करीत असल्याचे नाटक करणार होता. एकच युक्ती दोन वेळेला वापरणे शक्य नव्हते. या वेळेला मार्टिनदेखील त्याच्या नाटकात सामील होणार होता.

माल्टबीचा हल्ला अचूक होता. जर्मन विमानवेधी तोफांचा तसाच मारा झाला; तसाच स्फोट झाला; तसेच पाण्याचे कारंजे उसळले; परंतु या खेपेला गिब्सनला मात्र बॉम्बचा नेमका परिणाम दिसू शकला नाही. धरणाचा सगळा परिसर जलकणांनी भरून गेला होता. पाऊस पडल्यासारखे, गिब्सनच्या समोरच्या काचेतून सारे अंधुक दिसत होते.

पाणी शांत झाले. गिब्सनने पाहिले भिंत अजूनही निश्चलच होती. मघाचा त्याचा उत्साह पुन्हा मावळला. तो नाउमेद झाला. त्याचे मन वेदनेने ठणकू लागले. सहाव्या लॅंकेस्टरला त्याने हल्ल्यासाठी पुकारले, त्या वेळी त्याचा स्वर केविलवाणा झाला होता.

सहाव्या विमानाचा कप्तान डेव्ह शॅनॉन हा होता. टेकडीवरून त्याने विमान धरणाकडे नेले. गिब्सनने देखील आपले विमान वळविले आणि तो बरोबर धरणाच्या माथ्यावर आला आणि अचानक त्याला ते दृश्य दिसले. प्रथम त्याचा विश्वासच बसेना. डोळे चोळून त्याने पुन्हा पाहिले. इतक्यात अंतर्गत संदेशवाहिकेवर कोणाचा तरी आवाज त्याने ऐकला. त्याच्या पाठोपाठ इतरांचेही आवाज त्याला ऐकू आले.

'मला वाटते निकाल लागला त्या धरणाचा.'

'फुटलं. आता मात्र निश्चित फुटलं ते धरण.'

खरोखरच धरणाच्या भिंतीला प्रचंड भगदाड पडले होते. बाकीची भिंतदेखील थोडीशी ढासळली होती. भगदाडातून पाणी अमर्याद वेगाने बाहेर कोसळत होते.

त्या पाण्याच्या आवेगाने विद्युत्पादन केंद्र तर कोसळलेच परंतु त्या पलीकडच्या इमारतींचा ग्रास घेण्यासाठी ते अधाशी पाणी बेभानपणे धावत सुटले.

ते विलक्षण दृश्य पाहताच गिब्सनने शॅनॉनला हल्ला थांबविण्यास सांगितले. आता आणखी हल्ल्याची गरजच कुठे होती मुळी ?

'ग्रॅंथामला संदेश पाठवा' गिब्सन संदेशकाला म्हणाला. 'निगर, निगर, निगर.'

निगर मृत्यू पावला होता. परंतु या मोहिमेत भाग घेणारे सैनिक जसे आपल्या पराक्रमाने अमर झाले तसाच निगरही झाला होता. ग्रॅंथाम येथे हॅरिस, कोक्रेन व बार्न्स वॉलिस यांच्या आनंदाला सीमा नव्हती.

गिब्सनने पुन्हा एकदा त्या पाण्याच्या लोंढ्याकडे पाहिले. दिसलेल्या दृश्याचे वर्णन त्याने आपल्या पुस्तकात ('एनिमी कोस्ट अहेड') पुढील प्रमाणे केले आहे. 'ते दृश्य मोठे विलक्षणच होते. उसळणाऱ्या पाण्याने निर्माण झालेल्या धुक्याने ते सगळे खोरे भरून गेले होते. धरणाजवळच्या गावात रस्त्यावरून पाणी मोकाट धावू लागले, त्या पाण्यात रस्त्यावरील मोटारी सामावून गेल्या. इमारतींना वेढून फुसांडत पुढे धावणाऱ्या त्या जलप्रवाहात दुकाने, आगगाड्या, पूल,— वाटेत असेल नसेल ते सारे वाहून चालले होते. धरणाच्या पलीकडे तीन मैलांवर हॉपगुडचे विमान अजून जळत होते. पण हत्येचा बदला आम्ही घेतला होता.. हे धरण जर्मनीच्या औद्योगिक चैतन्याचे केंद्रच आहे, हे मला ठाऊक होते. हे धरण कोसळल्याने जर्मनीवर फार मोठा आघात झाला होता. मी जवळजवळ तीन मिनिटे त्या परिसरावर घिरट्या घातल्या. नंतर सगळ्यांना बोलावले. मार्टिन आणि माल्टबी यांना तळाकडे परतण्यास सांगितले आणि बाकीच्यांना बरोबर घेऊन मी एडर धरणाकडे मोर्चा वळविला.'

आणखी एका तासाने या बहाद्दर धरणफोड्यांनी एडर धरण देखील उध्वस्त केले. अर्थात तेथेही स्क्वाड्रनला जीवाचे मोल द्यावे लागलेच. गिब्सनच्या मूळ नऊ जणांच्या तुकडीपैकी चार धारातीर्थी पतन पावले. ज्या सात विमानांनी गिब्सनच्या स्क्वाड्रनवरती होणारा संभाव्य हल्ला आपल्यावर ओढवून त्याला मदत केली होती त्या सातापैकी फक्त तीन विमाने सुखरूप परत आली होती. एकूण सोळा विमानांपैकी आठांचा बळी गेला होता. परंतु मॉन आणि एडर धरणे कोसळली होती. जर्मनीवर दीर्घकाळ परिणाम होईल असा प्रचंड आघात झाला होता. आणि स्वतः गिब्सन मोठ्या आश्चर्यकारक रीतीने मृत्यूच्या जबड्यातून सहीसलामत सुटला होता.

## कंटाळा-निरुत्साह-मरगळ

त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गिब्सनला प्रत्यक्ष मोहिमेत भाग घेण्याची मना केली. गिब्सनने इतक्या वेळा जीव धोक्यात घातला होता की पुनश्च त्याच्यावर तशी जोखीम टाकायला वरिष्ठांची तयारी नव्हती. त्यांनी अमेरिकेला प्रेसिडेण्ट रूझवेल्टच्या भेटीला जाणाऱ्या पंतप्रधान चर्चिल यांच्या परिवारात गिब्सनची वर्णी लावून टाकली. चर्चिलनेच त्याचे 'धरणफोड्या' असे नामकरण केले. दुसऱ्या कोणत्याही नावाने गिब्सनचा उल्लेख ते करीत नसत.

चर्चिलबद्दल वाटणाऱ्या आदरापोटी गिब्सनच्या मनात, युद्धोत्तर काळात राजकारणात भाग घेण्याचे विचार येऊ लागले. आयुष्य भर सैनिकीपेशा पत्करण्याची त्याची तयारी नव्हती. त्यामुळे भविष्याकडे लक्ष देणे त्याला क्रमप्राप्तच होते.

मॅकल्सफिल्ड येथून उमराव पक्षातर्फे उभे राहण्यासाठी त्याने अर्ज केला. इतर अनेकांनी अर्ज केले होते; पण मॅकल्सफिल्डने गिब्सनची निवड केली. परंतु तूर्त तरी युद्धापलीकडे कसलाही विचार करणे त्याला शक्य नव्हते. त्याचे भविष्य युद्धाशी अतूट जखडले होते. त्याने आपला विचार बदलला. आणि निवडणूक लढविण्यास तात्पुरता नकार दिला. युद्ध संपल्यानंतरच काय ते पाहू, अशी भूमिका त्याने घेतली.

हवाई मंत्रालयात मुद्दाम देण्यात आलेल्या व्यवस्थापकीय कामाचा गिब्सनला लवकरच कंटाळा आला. टेबलापाशी बसून कागदपत्र निवडणे हे त्याच्या उसळत्या रक्ताला मानवण्यासारखे नव्हते. लवकरच सैनिकी शाळेत शिक्षक म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. पण इथली हवा देखील त्याच्या रगेल प्रकृतीला मानवली नाही. याच काळात Enemy coast ahead ही आपल्या बॉम्बहल्ल्यांच्या मोहिमांतील अनुभवांची कथा त्याने लिहिली. परंतु दरम्यानच्या काळात जर्मनीवरील बॉम्बहल्ले अधिकाधिक प्रखर आणि निर्णायक होऊ लागले होते. त्यात भाग घेण्यासाठी गिब्सन तळमळू लागला.

आता सैनिकी कारकीर्दीत प्रथमच त्याचे वरिष्ठांशी खटके उडू लागले. गिब्सनने बॉम्बर-दलाला मदत करायला त्यांची यत्किंचितही हरकत नव्हती; मात्र ही मदत तळावरूनच करावी असा निर्बंध त्यांनी घातला होता. त्याच्या पूर्वीच्या तुकडीच्या ठाण्यावर (Group Headquarters) काम देण्यापलीकडे अधिक काही करायला वरिष्ठांची तयारी नव्हती. प्रत्यक्ष मोहिमेत भाग घेण्याबाबत त्याने पुनः पुनः केलेल्या साऱ्या विनंत्या त्यांनी फेटाळून लावल्या. गिब्सन इतका अनुभवी आणि कुशल माणूस दैनंदिन मोहिमात, युद्धाचा अंत जवळ आलेला असताना, धोक्यात घालणे मूर्खपणाचे आहे, अशी वरिष्ठांची भूमिका होती.

आणि आयुष्यात प्रथमच गिब्सन दुःखी झाला. भय, कंटाळा, निरुत्साह, थकवा मनाला येणारी मरगळ या सगळयावर गिब्सनने मात केली होती. परंतु सक्तीच्या प्रदीर्घ विश्रांतीच्या कल्पनेने मात्र त्याचा पराभव केला. तो मनातून मोडूनच गेला. त्याच्या जीवनाचा पायाच जणु उखडला गेला होता. तीन वर्षे हवाई दलातील शिक्षण आणि नंतर चार वर्षे प्रत्यक्ष युद्धात त्याचा केलेला उपयोग शाळा सोडल्यापासून त्याने दुसरे काही केलेच नव्हते. शत्रूच्यादेशात घुसून हल्ला चढवण्याचा आनंद आणि चित्तथरारी सहकाऱ्यांची जिवाभावाची मैत्री, तळावरील कारागिरांची अनन्य निष्ठा, दैनंदिन साहसात अनुभवाला येणारी मनाची उत्तेजकता याच्या शिवाय खुरडत चालणारे अळणी आयुष्य त्याला असह्य झाले.

एके दिवशी तर कार्यालयात बसल्या बसल्या त्याला रडत कोसळले. त्याच्या लाडक्या मित्रापासून झालेल्या ताटातुटीने तो अगदी कासावीस झाला. कोक्रेन आणि हॅरिसच्या कानांवर ही बातमी गेली आणि त्यांनी मोहिमेवर निघणाऱ्या विमानासाठी राखलेल्या कॉनिग्सबी विमानतळावर गिब्सनची बदली करण्याइतकी सवलत त्या निर्बंधात दिली. या ठिकाणच्या वातावरणाने तरी त्याला दिलासा लाभेल अशी त्यांची अटकळ होती. प्रत्यक्ष हल्ल्यात त्याने भाग घेण्याचा प्रश्न अर्थात त्यांनी मागेच निकालात काढला होता.

ही बदली करण्यात वरिष्ठांची फार मोठी चूक झाली. एखाद्या मुलाला रंगभूमीवर जाण्याची सक्त मनाई करावी आणि नंतर त्याला नाटयप्रयोगांची फुकट तिकिटे द्यावी तसला प्रकार गाय गिब्सनच्या बाबतीत झाला होता. त्याने परिस्थिती अधिकच बिघडली. गिब्सनचे मन विकल झाले.

## हॅरिसची मनधरणी

जुलै १९४४ मध्ये एके दिवशी कॉनिग्सबी विमानतळावर एक मॉस्क्विटो जातीचे विमान उतरले. गिब्सनचा मित्र मिकी मार्टीन त्याचा कर्णधार होता. मार्टिनने गिब्सनला घेऊन उड्डाण केले आणि मॉस्क्विटो कसे चालवायचे ते शिकवले. ते विमानतळावर उतरले तेव्हा गिब्सन निग्रहाने म्हणाला, 'या टेबल खुर्चीचा वैताग आलाय् मला. काय वाटेल ते झालं तरी मला परत मोहिमेत भाग घेतलाच पाहिजे.'

आपली व्यथा एकाच माणसाला कळू शकेल; त्याच्या जवळ मन खुले केले तर काहीतरी मार्ग निघेल असे गिब्सनला वाटले. तो माणूस म्हणजे हॅरिस. बाँबहल्ल्याच्या पहिल्या सत्रात हॅरिस त्याचा गटप्रमुख होता. दोन सत्रांमधील विश्रांतिकाळात फायटर विमानांचे शिक्षण घेत असताना, आपल्याला पुन्हा प्रत्यक्ष बाँबहल्ल्याच्या मोहिमेवर पाठवावे अशी विनंती त्याने, तोपर्यंत बाँबरकमांडचा प्रमुख झालेल्या, हॅरिसला केली होती, आणि ती यशस्वीही झाली होती. दुसरे सत्र संपल्यावर 'आणखी एकाच मोहिमेत' (धरण फोडीच्या) भाग घेण्याची संधी त्याला हॅरिसनेच दिली होती. आणि आता मोहिमेत प्रत्यक्ष भाग घेण्यासाठी तडफडणाऱ्या गिब्सनने पुन्हा एकदा आपल्या दुःखनिवारणासाठी हॅरिसकडेच धाव घेतली.

हॅरिसने याही वेळी गिब्सनची विनंती मान्य केली. त्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी त्याच्यावर लवकरच येणार होती. पण गोष्टी अशा निकराला आल्या होत्या की गिब्सनची अटळ भवितव्यता रोखणे हॅरिससारख्या खंबीर माणसालाही नव्हते.

हॅरिसने फक्त एका मोहिमेत भाग घेण्याची परवानगी गिब्सनला दिली होती. शिवाय त्याने कोक्रेनला हल्ल्याचे ठिकाण दोस्तांच्या सीमेपासून जवळचे निवडायची खास सूचना केली होती. अखेर पश्चिम जर्मनीच्या सीमेलगतच्या मंचेन ग्लाडबाश आणि ऱ्हाइट या शहरांची निवड हल्ल्यासाठी करण्यात आली. गिब्सनवर या मोहिमेच्या मार्गदर्शनाची जबाबदारी होती. हे विशिष्ट मार्गदर्शनाचे तंत्र धरणफोडया गिब्सनने निर्माण केले होते. इतकेच नव्हेतर पूर्णत्वाला नेले होते. गिब्सनचे विमान मॉस्क्विटो राहाणार होते.

हा हल्ला शत्रूच्या पिछाडीमागे घुसून दळणवळ उध्वस्त करण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग होता. आशेन कडून नैऋत्येला येणारा एक आणि कलोनवरून आग्नेयेला जाणारा एक असे दोन रेल्वेमार्ग ऱ्हाईट येथे मिळत होते. तेथून उत्तरेला दोन मैलावर मंचेन ग्लाडबाश येथे, ऱ्हूर खोऱ्यातून हॉलंडला जाणाऱ्या मुख्य रेल्वेमार्गाला ते जोडले जात होते. या भागातील रेल्वे यार्ड, इंजिनियरिंग वर्क्स, रेल्वेमार्गाचे वेगवेगळे भाग बनविणारे कारखाने ही या मोहिमेची लक्ष्ये होती. दोनशेवीस लँकेस्टर्स या मोहिमेत भाग घेणार होती. त्यांच्यासाठी परिसराचे तीन विभाग करण्यात आले होते.

प्रत्येक परिसरातील माऱ्याची ठिकाणे तीन मॉस्क्विटो विमान निश्चित करणार होती. या नऊ मॉस्क्विटोशिवाय असलेले दहावे मॉस्क्विटो गिब्सन चालविणार होता. आणि सर्व मोहिमेचे सूत्रचाल करणार होता.

मोहिमेच्या सुरुवातीलाच एक अपशकून झाला. विद्युत्वादळे आणि गडगडणारे ढग यांनी मार्गात अडथळे उत्पन्न केले आणि त्यामुळे लॅकेस्टर्सची रचना विस्कळीत झाली. अनेक विमानांनी, परस्परांशी टक्कर टळावी म्हणून, ओळख पटविणारे दिवे जळत ठेविले. काही


विमानांच्या देहावर वर्फ जमला; आणि त्यामुळे विमानांचे नियंत्रण करणे कठीण झाले. परंतु मंचेन ग्लाडबाश आणि व्हाईट येथे मात्र वातावरण पुष्कळच अनुकूल होते. फक्त औद्योगिक केंद्रामध्ये असतो तसा धूसरपणा त्यांच्या आकाशात आलेला होता.

युद्धाच्या या अवस्थेपर्यंत, माऱ्याची ठिकाणे निश्चित करण्याचे आणि रंगीत चंद्रज्योतींनी ती प्रकाशित करण्याचे तंत्र अगदी पूर्णत्वाला गेलेले होते. परंतु अनुभवांनी या तंत्रातील एक दोष लक्षात आलेला होता. माऱ्याचे ठिकाण निश्चित करताना थोडाजरी घोटाळा झाला तरी बॉम्ब हल्ल्याचा तोल बिघडून त्याचा हेतूच असफल होण्याचा धोका उद्भवायचा. सूत्रधाराची गरज अशावेळी लक्षात यायची. गटागटाने होणाऱ्या हल्ल्यांचे नियंत्रण करणे, झालेली चूक सुधारण्यासाठी सूचना करणे, प्रसंगी माऱ्याचे ठिकाण पुन: निश्चित करणे, ही सारी जोखमीची कामे सूत्रधारकालाच करावी लागायची. ती करण्यासाठी पहिल्या प्रकाशक चंद्रज्योती भूमीवर झेपावल्या म्हणजे सूत्रधाराला प्रतिकारी हल्ले होत असताना आणि आपली विमाने बॉम्बफेक करीत असताना त्या परिसरातच घिरट्या घालणे आवश्यक होई. गाय् गिब्सनने ही अशा प्रकारची जबाबदारी या मोहिमेत आपण होऊन पत्करली होती.

## आता घरी जायचं

सारी मोहीम मिनिटाच्या बारीक तपशिलासुद्धा व्यवस्थित आखलेली होती. साडेनऊ वाजता माऱ्याची ठिकाणे प्रकाशित करणारी विमाने तेथे गेली आणि बरोबर तीन मिनिटांनी त्यांनी पहिल्या चंद्रज्योती खाली फेकल्या. त्यांच्या प्रकाशात मंचेन ग्लाडबाश आणि व्हाईट यांच्या परिसरातील रस्ते, रेल्वेमार्ग, पूल, इमारती हे सारे उजळून निघाले. त्यांच्या मागोमाग रंगीत चंद्रज्योतींनी माऱ्याची ठिकाणे निश्चित करणारी विमाने आली. प्रत्येक विभागासाठी वेगळ्या रंगीत चंद्रज्योतींची व्यवस्था केली होती. मंचेन ग्लाडबाशच्या उत्तरेच्या औद्योगिक परिसरासाठी हिरव्या, व्हाईटच्या औद्योगिक केंद्रासाठी लाल आणि मंचेन ग्लाडबाशच्या दक्षिणेला असलेल्या रेल्वेजंक्शनसाठी पिवळ्या चंद्रज्योतींची योजना केलेली होती.

रेल्वेजंक्शनचे ठिकाण अचूक निश्चित करणे हे काम सर्वांत कठीण होते, पण म्हणूनच गिब्सनने त्याचा प्रथम निकाल लावण्याचे ठरविले. त्यामुळे दुसरी ठिकाणे निश्चित करताना उसळलेल्या धुराने अडथळा येणार नव्हता. एका मार्करने तीन हजार फुटांवरून एकदम आठशे फुटापर्यंत प्रचंड झेप घेतली आणि रेल्वेजंक्शनवर अचूक चंद्रज्योती टाकल्या. वर घिरट्या घालणाऱ्या गिब्सनने त्याच्या अचूक नेमबाजीचे कौतुक केले आणि दुसऱ्या दोन विमानांना पाचारण केले. त्यानंतर त्याने मंचेन ग्लाडबाशचा परिसर उजळण्यासाठी हिरवा प्रकाश फेकणाऱ्या विमानाला बोलाविले. या विमानाने फेकलेल्या चंद्रज्योती थोड्या बाजूला पडल्या. गिब्सनने ही गोष्ट त्या वैमानिकाच्या लक्षात आणून दिली आणि चंद्रज्योती अचूक फेकण्यास फर्माविले. या लक्ष्यवेधी मॉस्क्विटो विमानाने दोन हजार फुटांवरून सातशे फुटापर्यंत झेप घेतली आणि अचूक चंद्रज्योत टाकली. परंतु दुर्दैवाने ती सरळ एका छपरातून आत पडली आणि अस्तंगत झाली. गिब्सनने उरलेल्या दोन मॉस्क्विटो विमानांना पाचारण केले. पावणेदहा वाजेपर्यंत स्थूलमानाने या परिसरातील माऱ्याची ठिकाणे निश्चित करून ती प्रकाशांकितही झाली होती. फक्त हल्ल्याच्या वेळी थोडे अंतराचे मान ठेवणे आवश्यक होते. तशी सूचना गिब्सनने त्यांना दिली.



अचानक गिब्सचे विमान पेटले व त्याचे तुकडे होत होत जमिनीवर कोसळले

दरम्यान लाल प्रकाश टाकणा या लक्ष्यवेधी विमानाला त्याने तो परिसर उजळण्याची सूचना दिली होती. परंतु इथे मात्र त्या विमानाकडून थोडी दिरंगाई झाली. या ठिकाणाकडे येताना वाटेत त्याच्या विमानात काही बिघाड झाला होता. त्यामुळे वेळेवर चंद्रज्योती टाकणे त्याला जमण्यासारखे नव्हते. परिणामत: या परिसरात बॉम्बफेक करणाऱ्या विमानांना आकाशात घिरट्या घालीत वेळ काढावा लागणार होता आणि त्यात पुष्कळच धोका होता.

मोहिमेचे यश आता सूत्रधाराच्या योजकतेवर अवलंबून होते.लाल प्रकाशाच्या परिसरातील विमाने अधिक काळ थांबणे शक्य नव्हते. मग बॉम्ब इतस्तत: फेकून (बॉम्बचे ओझे हलके करून) त्या धोकेबाज क्षेत्रातून निघून जाणेच क्रमप्राप्त होते. दोन-तीन विमानांनी तर तसे केले देखील. त्यांच्या मागून येणाऱ्या विमानांनी आधीच्या बॉम्बहल्ल्याने जळणाऱ्या जागी एका पाठोपाठ बॉम्ब टाकण्याचा संभव होता. म्हणजे हल्ल्याचा सारा रोखच बिघडला असता.

गिब्सनने त्यांना बॉम्ब न टाकता धीर धरण्याची सूचना केली. परंतु त्यांना फार काळ तिष्ठत ठेवणे युक्त नव्हते. म्हणून त्याने तत्परतेने निर्णय घेतला आणि हिरव्या प्रकाशाने उजळलेल्या परिसरावर बॉम्बफेक करण्यास फर्मावले. त्यामुळे मंचेन ग्लाडबाशवरील हल्ला द्विगुणित होणार होता आणि व्हाईट मात्र सुदैवी ठरणार होते.

पण इतक्यात लाल लक्ष्यवेधी विमानांनी त्यांच्या परिसरातील ठिकाणे प्रकाशित करण्यात यश मिळविले होते त्या वेळी नऊ वाजून पन्नास मिनिटे झाली होती. गिब्सनने तावडतोब आपला आयत्या वेळी दिलेला हुकूम रद्द केला आणि पूर्वी ठरल्याप्रमाणे आपल्या नियोजित परिसरातच बॉम्बफेक करण्याची त्या विमानांना सूचना दिली.

त्यानंतर गिब्सनने लक्ष्यवेधी विमानांना घराकडे पाठविले. आता

मोहिमेची अपेक्षेप्रमाणे पूर्ती होणार होती. गिब्सनच्या हिकमतीमुळे फार थोडा वेळ व फार थोडे बॉम्ब फुकट गेले होते. सतत होणारा प्रतिकारी हल्ला, मोहीम उलथून पाडण्यास सरसावलेली जर्मन फायटर विमाने, आपल्याच विमानातून पडणारे बॉम्ब यांना तोंड देत गिब्सनचे विमान त्या सर्व परिसरावर निर्भयपणे घिरटया घालीत होते. पहिली चंद्रज्योत टाकल्यापासून अवघ्या वीस मिनिटांत मोहीम संपूर्ण यशस्वी झाली होती.

'चला मंडळी' गिब्सन खुशीने म्हणाला. 'मोठी मस्त कामगिरी केलीत तुम्ही. आता घरी जायचं.' इतक्यात गिब्सनचे विमान जायबंदी झाले. गिब्सन आणि त्याचा नॉव्हिगेटर जे. बी. वॉरविक यांनी विमान आणि आपले प्राण वाचविण्याची शर्थ केली. पंचेचाळीस मिनिटांनी याच कण्हणाऱ्या, कुथणाऱ्या विमानाच्या आवाजाने स्टीनबर्जेन येथील साखर कारखान्यातील रखवालदार अंतोन द ब्रुयेन याचे लक्ष वेधले होते. गिब्सनचे हे विमान निवांत आसरा शोधीत स्टीनबर्जेनवर घिरटया घालीत होते.

अचानक इंजिनाचा भयानक आवाज झाला आणि विमान तुकडे होतच अगतिकपणे धरणीवर कोसळले. विमानाच्या आवाजने शहरातील इतर लोकही जागे होऊन कुतूहलाने बाहेर आले होते. कोसळणाऱ्या विमानातील दोन मनुष्याकृती त्यांना स्पष्ट दिसल्या होत्या. स्टीनबर्जेनची ही सज्जन माणसे घाईघाईने विमान कोसळले त्या जागी गेली. विमानाचा चक्काचूर झाला होता. त्या दोन मनुष्याकृती दूरवर फेकल्या गेल्या होत्या. त्यांचे काही अवयव इतस्ततः तुटून पडले होते आणि त्यांची ओळख पटणेदेखील अशक्य झाले होते. लोकांनी हे दोन्ही देह एकाच शवपेटीकेमध्ये ठेवले. विमानात सापडलेले काही कागदपत्र तत्परतेने टाऊनहॉलमध्ये लपविण्यात आले.

## एक औचित्य

जे. बी. वॉरविक अशी अक्षरे कोरलेला एक बिल्ला मिळाला होता. तसेच एक पाकिटही सापडले होते. त्याच्यावर 'स्क्वाड्रन लीडर जे. बी. वॉरविक जी. एफ. सी., आर ए. एफ कॉनिंग्सनी असा पत्ता होता. त्यामुळे एका माणसाची तरी ओळख पटली होती. दुसऱ्या माणसाच्या एका अर्धवट जळलेल्या मोजाच्या आतल्या बाजूला एक लेबल होते त्या लेबलवर गिब्सन अशी अक्षरे होती. हा मोजा 'व्हिक्टोरिया क्रॉस' हे शौर्यपदक मिळविणाऱ्या विख्यात गाय गिब्सनचा आहे याची कल्पनाही कोणाला आली नाही.

स्टीन बर्जेन दोस्तांच्या आघाडीपासून फारसे दूर नव्हते. दोस्तांच्या संभाव्य आक्रमणाला भिऊन तेथील नाझी महापौर आधीच पळून गेला होता. उपमहापौर एक निष्ठावंत डच नागरिक होता. लोकांची भावना ओळखून या दोन हवाई वीरांना सन्मानाने मूठमाती देण्याचा निर्णय त्याने घेतला. परंतु स्थानिक जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या कानावर ही बातमी जाताच त्याने झटपट एक तासात मूठमाती देण्याचा हुकूम सोडला. तेवढया वेळात जेवढे करणे शक्य होते तेवढे सारे स्टीनबर्जेनच्या नागरिकांनी केले. अंत्ययात्रा थाटात निघाली. गावातील बहुतेक साऱ्या मान्यवर व्यक्ती या शूर वीरांना शेवटचे अभिवादन करण्यासाठी अंत्ययात्रेत सामील झाल्या होत्या. आपल्या स्वतंत्रभूमीसाठीच त्यांनी बलिदान केले आहे अशी सर्वांची श्रद्धा होती.

यथाविधी ती जोडशवपेटीका भूमीत निजवण्यात आली. त्या जागी एक पांढरा क्रूस उभारण्यात आला. त्याच्यावर स्वाड्रन लीडर वीरविकचे नाव कोरण्यात आले. बाकीची जागा, दुसऱ्या वीराची ओळख नीट न पटल्याने तशीच मोकळी ठेवण्यात आली होती.

काही महिने गेले. स्टीनबर्जेन पुनः मुक्त झाले. आणि नंतर त्या अज्ञात हवाईवीराची ओळख पटली. तो अज्ञात हवाईवीर म्हणजे सर्वश्रेष्ठ बॉम्बर कर्णधार विंगकमांडर गाय् गिब्सन, व्ही. सी. डी. एस्. ओ., डी. एफ्. सी हा होता. क्रूसावरील मोकळया जागी त्याचे नाव गिरवण्यात आले.

गिब्सनसारख्या मोहऱ्याच्या हट्टाला बळी पडून ज्यांनी त्याला पुनः या एकाच मोहिमेत भाग घेण्याची संधी दिली ते पश्चातापाने स्वतःला दूषण देत राहिले. परंतु एक गोष्ट त्यांनाही कळून चुकली होती. जर्मन राष्ट्रावर झुकलेल्या अस्मानाशी गिब्सनचे भवितव्य युद्धकाळात प्रथमपासूनच जखडलेले होते. त्या आकाशाचे स्वामित्त्व मिळविण्यासाठी प्रथमपासून तो झटला होता. आणि अंती त्याने ते मिळविलेदेखील होते. युद्धानंतर निर्भर होणाऱ्या या आकाशावर गिब्सनचा जणू कसलाच अधिकार उरणार नव्हता. म्हणूनच असेल कदाचित पण विजयाची चाहूल स्पष्ट ऐकू येऊ लागली असतानाच ब्रिटनचा हा आकाश संचारी वीर मृत्यू पावणे यात एक औचित्य होते.

# स मा प्त

# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## दि. १६ ते ३१ डिसेंबर १९७३

### भारत-रशिया, झेकोस्लोव्हाकिया कराराचे फलित

अतरिक्षांतील रवी, मंगळ शनी व बुध हे ग्रह राष्ट्राराष्ट्रात व एकूण मानवी जीवनात खळबळजनक बदल घडवीत असतात. मकर व मिथून या राशी भारताच्या एकूण जडणघडणीशी व भवितव्याशी निगडीत आहेत. सध्या रवी या ग्रहाचे धनू या राशीतून भ्रमण चालू आहे. सातवा व बारावा अशा गुणांचा रवीचा सध्या प्रत्यय येणार आहे. मंगळ तर राशीला चौथा व मिथून या राशीला अकरावा आहे. उमरोक्त तीन चारही ग्रहांचा विचार भारताच्या सध्याच्या संदर्भात करावा लागेल. नुकताच भारत व रशिया यांचे आर्थिक करार झाले, त्याचप्रमाणे भारत व झेकोस्लोव्हाकिया यांचेही आर्थिक करार झाले. रवी, मंगळ, शनी या ग्रहांच्या संदर्भात या कराराच्या घटनेचा विचार करता भारताला फक्त तात्कालिक असा फायदा होईल. भारताच्या आर्थिक परिस्थितीला थोडेफार अनुकूल वळण लागेल. राजकीय परिस्थितीच्या संदर्भात याचा विचार करता कम्युनिस्ट पक्षाचे वजन या देशात शून्यावर येईल. फेब्रुवारीनंतर सत्तारूढ काँग्रेस पक्षातच वरिष्ठ पातळीवर वेबनाव व संशय निर्माण होईल. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या लोकप्रियतेला झटके बसू लागणार असून पक्षात व पक्षाबाहेरच्या लोकांना त्यांना बरीच माघार घ्यावी लागणार आहे. मध्यवर्ती सरकारच्या सर्वच खात्यात असंतोष निर्माण होईल. महाराष्ट्राला थोडेफार समाधानाचे दिवस आहेत.

### मेष : अनुकूल ग्रहांचे वरदान

राशीस्वामी मंगळ सध्या राशीतच ठाण मांडून बसला आहे. हा एकच ग्रह तुमच्या सान्या आशाआकांक्षा पुऱ्या करायला समर्थ आहे. तो तुम्हाला सध्या एवढा अनुकूल आहे. की या वेळी ज्या ज्या योजना ठरवाल, जे जे संकल्प सोडाल ते ते सारे सफलतेचा तुरा तुमच्या शिरपेचात खोऊन जातील. याशिवाय रवी, शनी व गुरू हे ग्रहदेखील अनुकूल आहेत. याचा अर्थ असा की यावेळी अनुकूल ग्रहांचे वरदानच तुम्हाला मिळाले आहे. चालू नोकरीत तुमचे अधिकार व दवदवा एवढा वाढणार आहे की तुमचे सहकारीं व तुम्ही स्वतःदेखील आश्चर्याने थक्क होऊन जाल. दि. १७ ते २२ व २५ ते ३१ या काळाची कटाक्षाने नोंद घ्या. नव्या नोकरीच्या शोधात असाल किंवा बेकार असून नोकरीच्या शोधात असाल तर तुमचे काम फत्ते झालेच म्हणून समजावे. मनोहरपंत तुम्ही लॉटरीचे तिकिट घेता की नाही ? घेत नसाल तर यावेळी मुद्दाम घ्या. मिळणारे बक्षिस दुसऱ्या कुणाला मिळाल्याबद्दल उगीच हळहळ वाटायला नको ! हो, रेसदेखील या वेळी फलदायी ठरेल. उद्योग धंद्याच्या बाबतीत उगीच कसली काळजी करता ? धाडसाने पाऊल उचला ते यशाच्या शिखरावरच पडणार आहे. नातेवाईकांवर मात्र फारसे विसंबून राहू नका. कुणाही तुमच्या उपयोगी पडणार नाही. खुद्द पत्नीदेखील जरा घुश्शातच वागेल. संसारात तसे वाईट काही नाही. पण मुले व पत्नी तुमच्या मताला हो काही म्हणणार नाहीत. दुसरे म्हणजे लग्नाचा विचार थोडे दिवस बाजूलाच ठेवा, काही दिवसानंतर मनासारखे होईल. **महिलांस** : बाईसाहेब नोकरी धंद्यात तुम्हाला फार छान काळ आहे. तरुणींनी मात्र प्रेमाच्या फंदात तूर्त तरी पडू नये. ◘

### वृषभ : कडू गोड अनुभव

तुम्हाला साडेसाती अजून चालू आहे याची जाणीव विसरून चालणार नाही. दुसरा केतू व आठवा राहू हे ग्रहदेखील तुमच्या वाईटावरच आहेत. गुरु मात्र पूर्णदृष्टीने तुमच्याकडे पहात असून तोच तुम्हाला थोडेफार सावरीत आहे. कोणत्याही कामात जे अडथळे येत होते ते यावेळी कमी होतील. सरकारी काम थोड्या त्रासाने का होईना पण पुरे होईल. त्यासाठी विनाकारण पैसा खर्च होई. तो थांबेल. नोकरीत कामाचा ताण कमी होण्याची सध्या तरी मुळीच अपेक्षा करू नका. जे जे काम करावे लागेल. ते ते पडते घेऊन मुकाटयाने करा. २० नंतर वरिष्ठांची तुमच्याकडे सहानुभूती वळेल. आजचा अंधार अनेक बाजूंनी कमी होईल. किराणा मालाचे व्यापारी, गिरणी मालक शेअरचा धंदा करणारे दलाल यांनी कोणताही बेकायदेशीर व्यवहार करू नये. सौंदर्यप्रसाधने, कापड व्यापारी तयार कपडयाचे विक्रेते, मद्य विक्रेते, फिरते एजन्ट यांना आर्थिकदृष्टया हा पंधरवडा छान आहे. लेखकांना तूर्त मागणी येईल. पण मोबदला मात्र लांबणीवर पडेल. एकदा लाभ हाती येता येता दूर जाईल. नोकरी करणाऱ्यांना थोडाफार त्रासच आहे. स्वतंत्र उद्योगात अडचणी येऊन नंतर अपेक्षा पुऱ्या होतील. राजकारणात तुमच्या सेवेचे चीज होईल. पण मत्सरी लोकांच्या त्रासाला तोंड द्यावे लागेल. आर्थिक परिस्थिती फार चांगली नसली तरी फार वाईट देखील असणार नाही. दि. १६ ते २०, दि. २२ ते २४ व दि. २८ ते ३१ अनुकूल असून बऱ्याच अपेक्षा पुऱ्या होतील. शनिवारचा उपास करा. **महिलांस** : मिळते जुळते घेऊन नोकरीत वागल्यास अनेक अपेक्षा पुऱ्या होतील.

## मिथुन : साडेसातीचा बाऊ नको

बारावा शनी पहिला झाला त्याचवेळी तुमच्या भोवतालचा प्रतिकूलतेचा अपेक्षाभंगाचा, निराशेचा, उदासीनतेचा, अंधार कमी झाला असून तुमच्या जीवनाला रुपेरी कडा येऊ लागल्याचे तुमच्या लक्षात आले असेलच. शनीबरोबर केतू आहे. तो तेवढा वाईट आहे. पण पहिला आहे तो देखील तेवढासा वाईट नाही. मनाचा निर्धार, धाडस व आपल्या अंगीकृत कार्यावर निष्ठा ठेवून जर तुम्ही कोणतेही काम करण्याचे ठरवले तर हा काळ वाईट नाही. दि. २० ते २७ हा काळ मुद्दाम लक्षात ठेवा. अघटित व आश्चर्यकारक असे काहीतरी यावेळी घडेल. अनपेक्षितपणे परदेशी जायचा योग येणार असून ते पारदेखील पडणार आहे. पत्रकार लेखक व सरकारी नोकरीत उच्च स्थळी असणाऱ्यांना हा योग अधिक जबरदस्त आहे. नोकरीत साधारण ठीक असा काळ आहे. पगारवाढीचा विचार लगेच होईल असे नाही. परंतु त्यासंबंधी अनुकूल वारे वाहू लागतील. वरिष्ठाची जी तुमच्याबाबतीत वक्रदृष्टी होती ती निवळू लागल्याचा प्रत्यय यावेळी येईल. नोकरी नसणाऱ्यांना लगेच कॉल येणार नाही पण आजवर ज्यांचा इंटरव्ह्यू अयशस्वी होई. ज्यांचा प्रभाव अजिबात पडत नसे त्यांच्या परिस्थितीत निश्चितच सुधारणा होईल. धंद्या व्यवसायाची स्थिती एकंदरीत प्रगतीची राहील अनपेक्षित पैशाच्या नादी फारसे लागू नका. शुभराशी पहाण्याचे देखील हा पंधरवडा सोडून द्या. तुम्ही लग्नाच्या बोहल्यावर उभे असाल तर तूर्त फक्त वधूसंशोधन करा. कारण अजून काही दिवस लग्नाचा योग नाही. प्रेमात प्रगती दिसेल पण त्या विस्तवाशी खेळ करू नये **महिलांस :** मामा व आई, यांच्याकडून स्थावर मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत प्रगतीकारक पंधरवडा आहे. ◻

## कर्क : गुरु-मंगळ अनुकूल

तुम्हाला साडेसाती सुरू झाली आहे. उगीच गोड गोड लिहिण्यात जसा काही अर्थ नाही त्याचप्रमाणे केवळ एवढ्यावरून तुम्ही घाबरूनदेखील जाण्याचे मुळीच कारण नाही. तुम्हाला सध्या गुरु जसा अनुकूल आहे तसाच स्वग्रहीचा दशमस्थानी असलेला मंगळ देखील उत्तम आहे. शनी फक्त एवढेच करील की थोडी फसवणूक, थोडा आजार, थोडेफार कर्ज यासाठी तुमचा खिसा मोकळा करीत राहील. पण मंगळ आणि गुरू तुमचा खिसा मोकळा राहू न देता भरीत राहतील, आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीने मात्र हा काळ तसा अनुकूल नाही. स्वतःच्या मर्यादा पाहूनच खर्च करा. रेस, लॉटरी याच्या नादी फारसे न लागणे बरे. नोकरीत मनाविरुद्ध काम करावे लागेल. कामासाठी धावपळ होईल. चुका होतील. पण तरीही फारसे प्रतिकूल घडणार नाही. चालू नोकरीत बदल करू नये. नोकरीचा कॉल आला तरी प्रत्यक्ष नोकरीवर रुजू व्हायला रेंगाळावे लागेल. व्यापारी लोकांनी कोणत्याच प्रकारच्या वायद्यासाठी पैसा गुंतवू नये, धाडस करू नये. शेतीचा व्यवसाय ठीक होईल. जमिनीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार फायद्याचा ठरावा. स्वतःचे घर व जागा घेण्याचे स्वप्न साकार होईल. कोर्टकचेरीची कामे लांबणीवर पडतील. लेखनात प्रगती होईल. पहिल्या प्रसिद्धीचा आनंद मिळण्याचा योग आहे. राजकारणांत चलती राहील. प्रतिष्ठा वाढेल. वाहन खरेदीचा योग असला तरी तूर्त अडचणी येतील. लग्नाचा प्रयत्न करा. याच पंधरवड्यात हा योग आहे. जुळून जाईल. लग्न मात्र लांबणीवर पडेल. एकंदरीत पंधरवडा अगदीच वाईट नाही. **महिलांस :** ज्यांची लग्ने आजवर रेंगाळत होती. त्यांची लग्ने सहज जुळून येतील. अनेकांचे संसार यावेळी सुरू होऊ शकतील. ◻

## सिंह : राजकारणात नेतृत्व

तुमच्या राशीचा अधिपती व राजकारणाचा कारक ग्रह जो रवी तो तुम्हाला अत्यंत अनुकूल झालेला असताना तुमच्या मनांत पुढारीपणाची भावना उफाळून न आली तरच नवल ! गेले अनेक दिवस तुमच्या शत्रूंनी खूपच गडबड केली तुमचे स्थान कमी करण्यासाठी व राजकारणातील तुमच्या यशाला अपशकून करण्याचा मोठा प्रयत्न केला पण त्यांचे सारे प्रयत्न बंद पडून तुमच्या यशाची लाट पुढे पुढे सरकतच राहिली. या पंधरवड्यात प्रामुख्याने दि. १७ ते २५ व २९,३०,३१ हे दिवस तुमच्या यशाने दिपवून टाकणारे ठरवेत, नोकरी व्यवसाय, राजकारण या सर्वच बाबतीत तुमचे पुढे पाऊल पडणार आहे. नोकरीत तुमच्या उपेक्षेचा व अपयशाचा जुना इतिहास विसरला जाणार असून तुमच्या जीवनाचे नवे पान लिहिले जाणार आहे. तुमच्या आजवरच्या कामाबद्दल योग्य मूल्यमापन होणार असून तुम्हाला नवी संधी दिली जाईल. तुम्ही बँकिंग क्षेत्रात असाल तर तुम्हाला वरची जागा मिळणार आहे. तुमच्या बौद्धिक कर्तृत्वाचे चीज होणार आहे. इंजिनियरींग उद्योग, इन्कमटॅक्स व संरक्षण या क्षेत्रातील वरच्या अधिकाऱ्यांना नवी संधी मिळणार आहे. राजकारणात तुमच्या नेतृत्वाला सर्व मान्यता मिळणार आहे. या राशीचे आमदार, खासदार वगैरे लोकांनी त्यांच्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनाकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष द्यावे. त्याचा फायदा होणार आहे. स्टेशनरी लोकर, खादी, मध, किराणा माल सोनेचांदी व काच या व्यापाराशी संबंध असणाऱ्या व्यावसायिकांना चांगला नफा होईल. चार पैसे हाती खेळतील. **महिलांस :** रवी अनुकूल आहे. महिलामंडळात मोठे स्थान मिळेल. सार्वजनिक कार्यात मानाचे स्थान मिळेल. ◻

## कन्या : आर्थिक स्थितीत सुधारणा

तुमचा आत्मविश्वास व धीर जसा आठव्या मंगळाने थरथरून टाकला तसाच चौथ्या राहूने तुमची मनःस्थितीदेखील हादरून टाकली. पैसा मिळण्याचे सारे मार्ग रोखले गेले व खर्चाचे नवे नवे मार्ग मात्र निर्माण झाले. त्यामुळे तुम्ही उदास व निराश झालात. पण आता ते अंधेरी जग नवे होण्याच्या मार्गावर असून सर्वच क्षेत्रात सुधारणेची व प्रगतीची नवी पावले वाजत असल्याचा प्रत्यय याच पंधरवड्यापासून येऊ लागेल. तुमचा पिंड व मनोधर्म प्रामुख्याने स्वतंत्र व्यवसायापेक्षा नोकरीला अनुकूल असतो. दि. २० ते २८ हा या पंधरवड्यातील कालखंड नोकरीच्या दृष्टीने नोंदून ठेवा. चालू नोकरीत तुमच्यावर अनुकूलतेचा प्रकाशझोत पडणार आहे. दूर गेलेली संधी पुनः तुमच्या हाती येणार आहे. तुमच्या बुद्धीला योग्य क्षेत्र उपलब्ध होणार आहे. वरिष्ठांची नाराजी नाहीशी होणार असून तुमचे महत्त्व

त्यांना पटणार आहे. तुमच्यावर लादले गेलेले अवांतर कामाचे ओझे कमी होईल. यापुढे तुम्हाला डोके तापवावे लागणार नाही. भांडण करावे लागणार नाही. नव्या नोकरीला अनुकूल वातावरण निर्माण होईल. आर्थिक स्थितीत निश्चित सुधारणा होईल· तुमचे जे पैसे, वसूल होतील की नाही याची शंका वाटत होती, ते पैसे ध्यानीमनी नसताना वसूल होतील. थांबलेला व्यवसाय पुनः जोराने सुरू होईल व पैसे हाती खेळू लागतील. पैशाची अडचण दूर होईल. उद्योगधंदा व्यवस्थित चालेल. पत्रव्यवहार बंद पडल्यामुळे तुम्हाला शिव्या खाव्या लागत होत्या तसे आता होणार नाही. मनात मोठा उत्साह निर्माण होईल. ज्या आजाराने तुम्हाला हैराण केले होते, तो आजार आता जाणवणार नाही. भीती दूर होईल. रेंगाळलेल्या सर्व कामांना आता गती मिळेल. प्रवासाचा बेत सफल होईल. विवाहेछूंचे विवाह सहज ठरून पार पडतील. हौसेची वस्तू खरेदी करता येईल. **महिलांस :** निराशा व आजार कमी होईल. संसारातसुख निर्माण होईल. पत्निचे प्रेम मिळेल. ¤

## तूळ : नव्या क्षेत्रात प्रवेश

चौथ्या गुरुची सुखस्थान दुर्बल करून टाकण्याची क्षमता आता कमी झाली आहे. तो तुमचे आता कोणतेच वाईट करू शकणार नाही. मनःस्थितीत देखील चांगलीच सुधारणा होणार आहे. तुमच्या राशीतच चंद्राबरोबर हर्शलने मैत्री केलेली आहे व रवीसारखा ग्रहांचा सम्राट अनुकूल झाला आहे. अनेक प्रकारची डोकेदुखी व काळजी या पंधरवड्यापासून कमी होऊ लागणार आहे, तुमची वृत्ती ही मुळातच कलावंताची आहे. शुक्र हा राशिस्वामी आहे. या वेळी रवी व शुक्र अनुकल आहे. त्यामुळे सिनेमा, संगीत वगैरे क्षेत्रात मित्राच्या मदतीने प्रवेश मिळेल. प्रसिद्धीचा जबरदस्त योग आहे कीर्ती व प्रतिष्ठा माळ गळयात घालणार आहे. आजवर होत असलेल्या अडचणी आता दूर होतील. तुमचा जवळचा मित्र तुमच्याशी चांगला वागत नव्हता· तो आता सरळपणाने व प्रेमाने वागू लागेल. दि. १६ ते १९, दि. २१ ते २४ दि. २७ ते ३१ या मुदती लक्षात ठेवा. अनेक शुभ घटनांनी हे दिवस तुमच्या जीवनात गाजणार आहेत. मानसिक स्वास्थ्य मिळणे कठीण आहे. धावपळदेखील फार करावी लागेल. पण प्रतिष्ठेचा पाया याचवेळी घातला जाईल. तुम्ही निवडणुकीकरिता उभे असाल तर विरोधकांचे डिपॉझीट देखील जाईल. नातेवाईक व सासुरवाडीकडील मंडळीत तुमच्याबद्दल नाराजी होती ती आता कमी होऊ लागेल. बंगला वा फ्लॅट विकत घेण्याची मनात बाळगलेली इच्छा मूर्त स्वरूप धारण करील. या बाबतीत चटकन मनासारखे जमूनही जाईल. आर्थिक परिस्थितीची रावसाहेब, कसली काळजी करता ? एखादे लॉटरीचे तिकीट काढा. एखादी 'उदार' व्यक्ती तुम्हाला मदत करायला उभी राहील. व्यवसाय धंद्याच्या क्षेत्रात उत्साह वाटणारे वातावरण निर्माण होईल. साऱ्या अडचणीत लीलया मात करू शकाल. नोकरीत तुम्हाला महत्त्व प्राप्त होणार आहे. तुमचा सल्ला महत्त्वाचा मानला जाईल. आर्थिक स्थिती समाधान देईल. **महिलांस :** पोटापुरता उद्योग करणाऱ्या महिलांना चांगला योग आहे. पैसा कमी पडणार नाही. नोकरीत बढती मिळेल. ¤


# आम्ही आता आपल्या ठेवींवर दरमहा व्याज देतो

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार लागावा या हेतूने आम्ही ही नवी ठेव योजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेव योजनेखाली किमान २४ महिने ठेवा. आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल अशापैकी कोणताही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित रहाते हे या योजनेचे वैशिष्टच आहे.**

अधिक तपशिलाकरता नजिकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

**हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २**

## वृश्चिक : समजूतदारपणाने फायदा

राशिस्वामी मंगळ सहावा होऊन बसला आहे. हा मंगळ तुमच्या तब्येतीला मधून मधून चिमटा घेत असला तरी तुमच्या विरोधकांना त्याने चांगलाच धाक घातला आहे. कोर्ट-कचेरीतील दावे, कल्पकतेने लढवा. जय तुमच्या बाजूचा आहे. अनेक विरोधक तुमचे मित्र बनून सहकार्याचा हात पुढे करतील. या वेळच्या ग्रहस्थितीचे हे खास वैशिष्टच होय. ज्यांनी तुम्हाला त्रास दिला तेच स्तुस्ती करू लागतील. दुसरा गरू तसा ठीक नसला तरी कौटुंबिक सुखात अडचण नाही. संतती सुख यावेळी चांगले आहे. मुलाच्या, जेष्ठ मुलाच्या बाबतींत तुम्हाला वाटत असलेली काळजी आता दूर होणार आहे. गेले वर्षभर त्याच्या तब्येतीने तुमच्या मनात काळजी निर्माण केली होती. तो आजार आता कमी होऊ लागेल. बदलेला रवी रक्ताच्या संबंधानं निर्माण होणारे आजार कमी करतो. आर्थिक स्थिती मात्र हाताबाहेर जाण्याचा धोका आहे. हर्शल बारावा ही काही चांगली स्थिती नव्हे. पैसा अंगाशी येणे, फसवणूक होणे, विस्तवापासून नुकसान होणे, पैसा बुडणे वगैरे घटना घडतात. पण मूळची ग्रहस्थिती जर चांगली असेल तर हे नुकसान होणार नाही. सर्व क्षेत्रात वावरणारे व्यापारी, शेअरचा धंदा करणारे लोक यांनी परिस्थितीवर डोळचात तेल घालून लक्ष ठेवावे. कोणत्याही प्रकारच्या अकल्पित धनलाभाच्या नादी लागू नका. दि. १७ ते २०, दि. २४ ते ३० हा काल लक्षात ठेवा. कोणतेही लेखी व्यवहार या मुदतीत करू नका. भांडण टाळा. साध्या बोलण्यातून कोर्ट कचेरीची प्रकरणे निर्माण होतील. हाताखालच्या लोकांकडून अपमानाचे प्रसंग निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. नोकरीत फारसा आशादायक असा काळ नाही. फक्त वाईट वा प्रतिकूल असे काही घडणार नाही. पण कामाने जीव मेटाकुटीस येईल. वरिष्ठांकडून बोलणी बसली तरी जमवून घेणे भाग पडेल. चालू नोकरी सोडू नका. **महिलांस :** तापट स्वभावाने नुकसान होईल. लोक त्रास देण्याचा प्रयत्न करतील. ¤

## धनू : प्रगतीकडे वाटचाल


रवीसारख्या समर्थ ग्रहाने गेले काही दिवस तुम्हाला अगदी बेजार केले होते. विशेष करून तब्येतीची अक्षरशः नासाडी केली होती. पण तो आता अनुकूल झाला आहे. त्याचा महत्त्वाचा परिणाम तुमच्या मन:स्थितीवर व शरीरावर अनुकूल होईल. तुम्हाला अकारण वाटणारी भीती, धाकधुक कमी होईल. तुमची तब्येत सुधारू लागणार असून मन उत्साही बनू लागेल. केवळ अनारोग्यामुळे तुमचे जे आर्थिक नुकसान होत होते, धाडस करता येत नव्हते, आत्मविश्वासाचा अभाव निर्माण झाला होता ही सारी स्थिती आता पालटणार आहे. दि. १८ नंतर बदल जाणवू लागेल. प्रतिष्ठा वाढेल. लेखनात प्रगती व पैसा मिळू लागेल. नोकरीत कामाचे नवे नवे क्षेत्र लाभेल. वरिष्ठांच्या मनात सहानुभूती निर्माण होईल. तुमच्यासाठी काहीतरी करावे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होईल. नोकरीत बदल करावयाचा असल्यास ही वेळ अनुकूल आहे. आजवर नोकरीचा वा नव्या नोकरीचा लांबणीवर पडत असलेला कॉल आता याच वेळी येईल. तुमची बेकारी संपून महत्त्वाकांक्षा, सफलतेचा मार्ग मोकळा होईल. तुम्हाला सध्या पाचवा मंगळ असून अजून काही काळ तो तेथे आहे. पाचवा आणि तोही मेष या स्वगृहीच्या राशीचा हा मंगळ म्हणजे यशाची गुरुकिल्लीच होय. परीक्षेत मोठे यश मिळणार आहे. चालू उद्योगातील अडचणी दूर होऊन प्रगतीचे आशादायक नवे पर्व सुरू होईल. तुम्ही एखादा नवा धंदा सुरू करावयाचा ठरवून कामाला लागा. अडचणी निवारण होऊन सहाय्य मिळेल. चालू उद्योगात नव्या योजना अंमलात आणू शकाल. तुमच्या कारखान्यात अगर व्यवसायात संप चालू असेल तर तो यावेळी तडजोडीने मिटला जाईल. आर्थिक परिस्थितीत जरी मोठे स्थित्यंतर घडले नाही, तरी गेल्या पंधरवडचाइतकी चणचण भासणार नाही. **महिलांस :** आता परिस्थितीत अनुकूल सुधारणा होत आहे. उद्योगात भरीव प्रगती दिसेल. ¤

## मकर : आर्थिक स्थित्यंतर

तुमच्या राशीतील गुरूची कारकीर्द आता लवकरच संपणार आहे. त्याने तुम्हाला बरेच सावरून घेतले आहे. आणखी काही काळ तो तसा सावरून घेईलच. आता रवी प्रतिकूल झाला असला तरी तेवढचाने घाबरून जाण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे हातपाय गाळून बसण्याचे देखील कारण नाही. सुखस्थानात मंगळ ठाण मांडून बसला असून तो मकर राशीला वाईट नाही. सहावा शनी तुमच्या शत्रूला भारी असून त्याने तुमचे वर्चस्व वाढवून विरोधकांना बापूडवाणे करून ठेवलेच आहे. अशीच परिस्थिती या पंधरवडचात देखील प्रत्ययाला येईल. तुमच्या जीवनात आर्थिक स्थित्यंतर निश्चितपणे घडणार आहे. दि. १६ ते २०, २४ ते २८ हा काळ अतिशय खळबळजनक ठरणार आहे. यावेळी आर्थिक परिस्थितीत विलक्षण चढउतार होतील. तुम्ही घडणाऱ्या घटनेमुळे अवाक् होऊन जाल. तुमच्या महत्त्वाकांक्षेला काही अनुकूल साथ मिळेल. लाभदायक असेही काही घडू शकेल. पण त्याचबरोबर मन हादरून टाकणारा अनपेक्षित खर्च दत्त म्हणून उभा राहील. प्रामुख्याने रक्तदाब, हृदयविकार असणाऱ्यांनी जास्त श्रम करू नयेत. काळजी घ्यावी. वाहने हाकू नयेत. व्यवसायाची स्थिती सर्वसामान्य राहील. चालू धंद्यातील पेचप्रसंग सुटण्याची चिन्हे दिसू लागतील. तात्पुरती पैशाची व्यवस्था होईल. प्रतिष्ठेला कोठेही तडा जाणार नाही. पण संसाराला कर्ज काढावे लागेलच. त्यासाठी देखील फार फार दगदग करावी लागेल. परदेशी प्रवासात अचानक अडचणी उद्भवतील. पण नंतर अनेक लटपटी करून यश मिळेल. चालू राहत्या घरात काही अनपेक्षित अडचणी निर्माण होतील. **महिलांस :** विवाहाचा विचार इतक्यातच करा. कारण गुरूची अनुकूलता आहे. प्रेमात थोडी फार प्रगती होईल. संसारात प्रसन्नता येईल. ¤

## कुंभ : उत्कर्षाची चाहूल

बारावा गुरू आपले मकर राशीतील प्रस्थान हलवून ते तुमच्याकडे ठेवण्याच्या तयारीला लागलाच आहे. आता त्याचा तुम्हाला अजिबात उपद्रव होणार नाही. तुमच्या बौद्धिक कर्तृत्वावर या बाराव्या गुरूने जो प्रभाव टाकून तुमचे नुकसान केले त्याची भरपाई मात्र याच काळापासून होऊ




# आपण असे आहात !

वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे आपल्या कुंडलीत राहू असेल तर आपण आरोग्य दृष्ट्या दुर्बल व्हाल असे समजावे. या ठिकाणी राहू येणे ही गोष्ट सुखावह नाही.

आपली प्रकृती निकोप नसेल. आपणास नाकासंबंधाने विकार उद्‌भवेल. नाकाची हाडे वाढुन श्वासोच्छ्वास करणे आपणास कठीण जाईल व एक दिवस नाकाच्या हाडावर शास्त्रक्रीया करावीच लागेल.

व त्यामुळे नाक फेपटे होण्याची शक्यता फार. आहे. तरतरीत नाकाचे सौंदर्य नष्ट करणारा हा योग समजावा. एखाद्या व्यक्तीचे ओठ जन्मत:च फाटलेले असू शकतील किंवा अन्य व्यंगही असू शकेल.

बौद्धिक दृष्टचाही हा योग चांगला नाही. माणूस बुद्धीमान होणार नाही किंबहुना झालाच तर तो वाममार्गाला लागून आपल्या बुद्धीच्या दुरूपयोग करील.

या राहूमुळे आपण निर्दय बनाल. भांग-गांजा-मद्य, जुगार, त्याचप्रमाणे वेश्यागमनही आपण कराल आणि समाजात अप्रीय व्हाल.

आपला पैसा आपण पाण्यासारखा उधळाल व एकेकाळी आपण उंची कपड्यात मोठ्या दिमाखाने जरी मिरवला असलात तरी एक काळ असा येईल की त्यावेळी आपणास मिळेल त्या लक्तराने आपला देह झाकावा लागेल.

आपणास गुप्तरोग, व्रण, त्वचा विकार होण्याचा धोका फार आहे.

पत्नीसुख पाहिजे तसे मिळणार नाही. प्रथम पत्नीचा वियोग घडल्यामुळे पुर्नविवाह करावा लागेल. पत्नीच्या मृत्युपेक्षा घटस्फोट घडून येण्याची शक्यता फार.

या राहूमुळे आपल्या पत्नीचे आरोग्यही ठीक राहाणार नाही. तिला कडकीचा फार त्रास होईल किंवा मासीक पाळीत अनियमीतपणा निर्माण झाल्यामुळे औषधोपचार करावे लागतील.

आपणास गुप्त शत्रू फार राहतील.

आपले वर्चस्व कुणालाही सहन होणार नाही त्यामुळे आपण जर अरेरावीने वागलात तर आपणास एखादे दिवशी भर रस्त्यात आपल्या शत्रूकडून मारहाणही होऊन अब्रुचा पंचनामा करून घ्यावा लागेल.

आपणास मन:शांती कधीच लाभणार नाही.

हा राहू जर इतर पापग्रहांनी फारच बिघडला असेल तर अखेर आपण भ्रमिष्ट किंवा वेडे होऊन आपणास 'मेंटल् असायलम्'मध्ये पाठवून द्यावे लागेल.

असा प्रसंग येऊ नये अशी आमची इच्छा आहे.

**एन. आर. साळवी**, पनवेल

लागेल. प्रामुख्याने तुमच्या एखाद्या निर्णयाने तुमच्याबद्दल जो गैरसमज झाला होता व वैयक्तिक अप्रतिष्ठा होण्याचा प्रसंग निर्माण झाला होता तो आता टळणार आहे. तुमच्या चुका लोक विसरून जातील. दि. २१ पासून तुम्हाला खऱ्या अर्थाने थोडे फार मानसिक समाधान मिळू लागेल. या वेळेपासून तुमच्या अवती भवती प्रसन्न वातावरण निर्माण होऊ लागेल. लेखक असाल तर आता तुमच्याकडून भरीव लिखाण होऊ लागेल. नाटक कादंबरी असे लिखाण व्हावे. वृत्तपत्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण लिखाण व्हावे. नोकरीच्या बाबतीत अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. अडचणीच्या जागी झालेली बदली रद्द होऊन तुम्हाला मनासारखे काम देण्याचा विचार वरिष्ठ करू लागतील. मुद्दाम तहकूब ठेवली गेलेली पगारवाढ व प्रमोशन तुम्हाला देण्याबद्दल मालकाच्या मनात सहानुभूती निर्माण होईल. इंजिनियरिंग उद्योग, रासायनिक उद्योग, विणकाम कापड उद्योग, तेल हे उद्योग अडचणीतून मुक्त होतील. आर्थिक स्थिती सुधारू लागेल. पण अजून काही काळ पैसा जपूनच वापरा. ज्यांचे विवाह व्हायचे आहेत त्यांनी आता वधू संशोधन सुरू करावे. यश येईल. **महिलांस** : नोकरीत उत्कर्षाचा काळ सुरू होईल. फिरतीची कामे अवश्य स्वीकारा. पैशाची अडचण आता भासणार नाही. ◻

### मीन : मुत्सद्देगिरीची कसोटी

राशीस्वामी गुरू अकरावा ही अतिशय जमेची बाजू होय. पण त्याचे कर्तृत्त्व मर्यादितच आहे. पण सध्या तुम्हाला अनुकूल आहे फक्त रवी, तो मात्र तुमच्या भोवती प्रतिष्ठेचे आवरण निर्माण करणार आहे. राजकारणात तुम्हाला प्रतिष्ठेचे मानाचे स्थान प्राप्त होणार आहे. सहकारी मनाला आनंद देतील. आमदार, जिल्हा परिषदेचे सदस्य खासदार, मंत्री या साऱ्या या राशीच्या लोकांना हा पंधरवडा लोकप्रियतेचा जाणार असला तरी विरोधही जाणवणार आहे. त्यांच्या मुत्सद्देगिरीची कसोटी लागणार आहे. यातून ते सहीसलामत पार पडले तर त्यांच्यावर स्तुतीची फुले उधळली जातील. व अपयश आले तर निंदा होऊ लागेल. सर्व सामान्यदृष्टचा मात्र हा काळ तसा वाईट नाही. ज्यांचे स्वत:चे उद्योग धंदे आहेत त्याला जरा उसंत मिळू लागेल. त्यांच्या धंद्यात जर अडचणी निर्माण झाल्या असतील तर त्या चटकन कमी होऊ शकतील. कामगारांचे संप असतील तर ते मिटण्याची चिन्हे दिसू लागतील. विचारविनीमयाचे वातावरण निर्माण होऊ लागेल, समजूतदार माणसे भेटतील. आर्थिक नुकसान थांबेल. नोकरीत अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. दि. २२ नंतरचा काळ जास्त अनुकूल आहे. तडजोड, थोडी माघार अशी वृत्ती उपयोगी पडेल. लेखकांना व कलावंतांना उपेक्षेतून बाहेर येता येईल. कौटुंबिक स्थिती मात्र अजून काही काळ विचित्रच राहील. ताणू नये. **महिलांस** : कोणत्याही दृष्टीने आग्रही वृत्ती ठेवू नये. पतीराजाबरोबर प्रेमाधे वागा. मुलांच्या कलाने घ्या.

# अवांतर

## शरद गोखले

माय नेम इज जया भादुरी. आय एम फ्रॉम भोपाल. कोर्स : फिल्म ॲक्टिंग.
फिल्म इन्स्टिटयूटमध्ये नवीनच दाखल झालेल्या मंडळींनी आपला परिचय पहिल्याच दिवशी करून द्यायचा असतो. या प्रथेप्रमाणे नव्यानेच दाखल झालेल्या या बारकुली मुलीने आपला परिचय उत्साहाने ओथंबणाऱ्या सभागृहाला करून दिला. परिचय झाला की ज्येष्ठ मंडळींपैकी एखादा तरी आपला अभिप्राय जरूर नोंदवणारच. पण ही मुलगी आली, आपला परिचय करून दिला आणि रंगमंचावरून बाजूला गेली तरी सभागृह शांतच. दखल घ्यावी असं या पोरीमध्ये कुणाला काही आढळलं नसावं. १९६७ ते १९६९ अशी तब्बल दोन वर्षे जया इन्स्टिटयूटमध्ये विद्यार्थिनी म्हणून वावरली. प्रारंभी या मुलीची कोणी फारशी गंभीरपणे दखलच घेतली नाही. वास्तविक इन्स्टिटयूटमध्ये ॲक्टिंगच्या पोरांचा नेहमीच वरचष्मा. संस्थेकडूनही प्रत्येक बाबतीत त्यांना झुकते माप. अग्रहक्क असलेल्या अशा भाग्यशाली खात्यातील ही मुलगी, एकशेदहा विद्यार्थ्यातील एक म्हणून ती वावरत होती. ६९ सालच्या डिप्लोमा फिलमस्‌ची तयारी सुरू झाली. ६७–६९ या काळात जयाच्या वाटयाला फारशा फिल्मस्‌ आल्याच नाहीत. पण ६९ साली तिच्या वाटयाला आलेल्या ‘ सुमन ’ या छोटया चित्राने बघता बघता या मुलीला आघाडीवर नेऊन बसवले. या सुमनचा दिग्दर्शक होता एम. जी. बावरिया. कथा कल्पना सत्यजितच्या ‘ समाप्ती ’वरून घेतली असली तरी सुमन या लघुचित्राला निश्चितपणे स्वतःचा असा आकार होता. ‘ एका अत्यंत हूड मुलीला वयात आल्याची जाण येते ’ एवढेच सूत्र एका छोटया कथेतून मोठ्या मार्मिक पद्धतीने चित्रीत करण्यात आले होते. या सुमनचा खूप बोलबाला झाला. स्वाभाविकपणे या चित्राची यशस्वी नायिका म्हणून जयाचे नाव सर्वतोमुखी झाले. चांगल्या-वाईट कशा का होईना, जयाच्या संदर्भामध्ये कॉमेंटस होऊ लागल्या. ‘ कॉमेंटस ’ हे या शो बिझनेसचे पहिले सूत्र. काय वाटेल ते होवो तुम्ही, तुमच्या भूमिका या नेहमी चर्चेमध्ये राहिल्या पाहिजेत. तुम्ही दुर्लक्षिले गेलात की संपलात असे खुशाल समजावे. दीड वर्षभर असे उपेक्षिलेले दिवस काढल्यावर ‘ सुमन ’ हे चित्र जयाच्या वाटयाला आले आणि इन्स्टिटयूटमधील अखेरच्या चित्राने जया जी झेपावली, ती पुन्हा मागे वळून न पाहण्यासाठीच. सुमनसारखे यशस्वी चित्र, हृषिकेश मुखर्जीसारखा समर्थ मार्गदर्शक आणि अभिनयाचे सुवर्णपदक घेऊन जया मुंबईच्या मायानगरीमध्ये आली. कलाकाराचे वास्तव वय, शरीरयष्टी, आवडनिवड याच्याशी मिळत्या जुळत्या भूमिका मिळाल्या की बऱ्या कुवतीचा कलाकारही सरस वाटावा, इतपत उभा राहू शकतो. जया तर डॅनीसारख्या मातब्बर माणसाला मागे टाकून सुवर्णपदक पटकावून आणि सुमनच्या सुखावणाऱ्या यशावरोबर कलाकाराला आवश्यक असलेला दांडगा आत्मविश्वास घेऊनच मुंबईमध्ये दाखल झाली होती. पहिल्याच चित्राला हृषीदांसारखा दिग्दर्शक लाभलेला, त्या गाजलेल्या ‘ गुड्डी ’ची भूमिकाही अशी की जराही परिश्रम करण्याची गरजच भासू नये. कॅमेऱ्याची भीती, हा नवीन कलाकाराच्या बाबतीत हमखास आढळणारा प्रकार दोन वर्षे इन्स्टिटयूटमध्ये घालवलेल्या जयाच्या बाबतीत संभवतच नव्हता. अभिनयातील सहजता व नैसर्गिकता, याचे सुंदर दर्शन तिने सुमनमध्ये घडवलेच होते. गुड्डीमध्ये हे भांडवल पुरेसे ठरले, शिवाय वयाला, शरीरयष्टीला साजेसा रोल मिळाल्याने गुड्डीतील तिचे यश भलतेच तेजाळून निघाले. गुड्डी प्रदर्शित झाले आणि भल्या भल्या फिल्मी कलमबहाद्दरांनी बोटे दुखेपर्यंत लेखण्या झिजवल्या. दुसरी मीनाकुमारी, असामान्य प्रतिभेचीची कलावंत, असल्या स्तुतीसुमनांची बरसात झाली. दम घ्यायला मंडळी तयार नव्हती. नशीब सहसा प्रसन्न होत नाही आणि एकदा प्रसन्न झाले तर–बस पूछो मत. गुड्डीच्या यशाने जया सुखावली होती. तरी उतली मातली नव्हती. आपला मार्ग निश्चित करण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. तिच्या सुदैवाने जयाला पुढील दोन चित्रे मिळाली ती पण–जयाला जया म्हणूनच प्रोजेक्ट करणारी. उपहार हे सुधेन्दु रॉय यांनी दिग्दर्शित केलेले चित्र सरळ सरळ समाप्ती वरून घेण्यात आले होते. समाप्तीची–छोटी आवृत्ती जयाने इनस्टिटयूट मध्येच पचवली होती. शिवाय भोवतालचे कलावंत म्हणजे कचराच होते. उपहार प्रदर्शित झाले आणि पुन्हा एकदा त्याच सुरामध्ये नगारे बडवले गेले. त्या नंतर आलेले जयाचे चित्र पीया का घर. राजा ठाकूर यांच्या ‘ मुंबईचा जावई ’ या गाजलेल्या चित्राचा हा हिन्दी अवतार. या चित्राचीही खूप चर्चा झाली. सुरेखाने केलेली भूमिका जयाने केली. पहिली तीन चित्रे यशस्वी ठरली. हिन्दी चित्रपटांचा परंपरागत नायीकेचे रूप न घेता जयाने मिळवलेले यश कौतुकास्पद होते खरे. पण गुडघाभर पाण्यात किती वेळ पोहणार ? केव्हा ना केव्हा तरी मुख्य प्रवाहामध्ये उतरणे जरूर होते. आणि ‘ चालू ’ सिनेमाच्या या प्रवाहामध्ये सफाईने तरंगता आल्या खेरीज फिल्मी नायीका म्हणून टिकून राहणे कठीण होते. हेवा वाटावा अशी साथ नशिबाने दिल्याने आणि पहिली तीन चित्रे सोन्यासारखे नाव देऊन गेल्यामुळे जया मुख्य प्रवाहामध्ये उतरण्यास उत्सुक होती आणि त्यातल्या त्यात बरा दिग्दर्शक म्हणून रेहना सुलतानाचे नशीव उजळवणाऱ्या बाबूराम इशारा यांचे दिग्दर्शन लाभलेल्या एक नजर मधील भूमिका तिने स्वीकारली. त्याच्याच आत बाहेर बन्सी बिरजू हे दुसरे चित्र तिने


नशिबाचा वरदहस्त
घेऊन आलेली
जया भादुरी






स्वीकारले. या चित्रपटांच्या जाहिराती झळकल्यावर मात्र जयाच्या बाबतीतील आपली उत्सुकता चाळवली गेली. म्हटलं–अभी देखेंगे ! या दोन्ही–चित्रपटांमध्ये नायक होता–अमिताभ बच्चन ! दबल्या आवाजात–जया–अमिताभ संबंधी चर्चा सुरू झाली होती. चित्र वर्तुळातील ही चर्चा रसिकजनांपर्यंत पोचली नव्हती. तथापी इतर सर्कलमध्ये आवाज घुमू लागला होता. यथाकाले एक नजर पडद्यावर आले. त्याच्याच आगेमागे बन्सी बिरजू आले. दोन्ही चित्रपटाचे असे काही वांगे झाले, की चित्रपटांची प्रसिद्धी यंत्रणाही हाय खाऊन गेली. फिल्मी नायिकेला नृत्य हे करावेच लागते. जया आत्तापर्यंत बचावली होती. पण एक नजर मधील भूमिकाच कोठीवालीची होती. कोठीवाली नृत्याचे तेज वैजंयतीमालाने चोप्राजींच्या ‘ साधना ’मध्ये दाखविले होते. आम्ही अपेक्षा ठेऊन एक नजर पाहिला. नऊशे प्रेक्षकांची व्यवस्था असलेल्या चित्रपटगृहामध्ये केवळ शे-दोनशे प्रेक्षक होते. त्यातही ज्यांनी शेवटपर्यंत दम काढला अशा प्रेक्षकांची संख्या शंभरच्या आतबाहेर असावी. बन्सी बिरजू तर आला कधी नि गेला कधी ते कळलेही नाही.

### जागरूक वाटचाल

यशाचा आस्वाद घेणाऱ्याला अपयश पचवणे कठीण असते. बन्सी बिरजू आणि एक नजर या चित्रपटांशी जणू काही आपला संबंधच नाही, असा आव आणून जयाने पुढे वाटचाल चालू ठेवली. मात्र ही वाटचाल विलक्षण जागरूक होती. भूमिकांचा निवड आपण कशी करतो या संदर्भामध्ये बोलताना जया माझ्याजवळ म्हणाली होती, चांगली कथा, आणि चांगला दिग्दर्शक यांना प्राधान्य द्यायचे धोरण मी एक नजर नंतर कटाक्षाने जोपासले. चित्रपटातील स्वतःची भूमिका, पोशाख, बरोबरचा नायक, निर्मिती संस्था यांचा तपशील सर्वसाधारण फिल्मी तारका विचारात घेतात. इन्स्टिट्यूटमधून बाहेर पडलेल्या रेहना सुलताना (चेतना) किंवा राधा सलुजा (दो राहा) यांनी शरीर सौंदर्याचे मुक्त प्रदर्शन करून स्वतःची वाट निश्चित करून घेतली होती. रेहनाला–दस्तक बद्दल उर्वशी अॅवॉर्ड मिळाले. काही



जंजीर रौप्यमहोत्सवी ठरला अमिताभमुळेच पण जया त्याच्या छायेपासून दूर राहिली.

चित्रपटही पदरामध्ये पडले. राधाही दो राहा नंतर—दहा चित्रपटांचे करार करून बसली. पण चित्रपट तारका म्हणून चित्रपट व्यवसाय व चित्रपट रसीक यांच्यावर जो ठसा उमटावा लागतो, तसा ठसा या दोघी उमटवू शकल्या नाहीत. भाग्यवान जयाच्या वाट्याला पहिली तीन चित्रे अशी जबरदस्त आली की चित्रपट तारका म्हणून या दोघीं-पेक्षा ती कितीतरी पुढे झेपावली. १९६२ ते ७२ या वर्षांमध्ये इन्स्टिटयूट मधून अनेक प्रशिक्षित मंडळी बाहेर पडली. अभिनयाचा अभ्यासक्रम सुरू झाल्यापासून जवळ जवळ शंभर मंडळी कलाकार बनण्याची 'चिठ्ठी' इन्स्टिटयूटकडून घेऊन मुंबईस आली. तथापी ज्यांची जबरदस्त छाप उमटली असे दोनच कलाकार एक जया आणि दुसरा शत्रुघ्न.

एखादा फलंदाज छान सेट व्हावा,—आत्मविश्वासाने त्याने टोलेबाजीला प्रारंभ करावा, आणि अगदी त्यालाही कल्पना नसताना नवीनच आलेल्या गोलंदाजाने त्याला सफाईने फसवावे, आणि पुनः सावधगिरीने खेळण्यास प्रारंभ करावा असा असा काहीसा प्रकार जयाच्या बाबतीत एक नजर व बन्सी बिरजू—या चित्रपटाच्या

या भास्करवरूनच एककाळी केवढे वादळ उठले होते.



निमित्ताने झाला खरा. येणाऱ्या गोलंदाजाला खेळत असलेल्या फलंदाजाला तोंड द्यावेच लागते, जयाच्या बाबतीत ही अपरिहार्यता नव्हती. नको असलेला गोलंदाज टाळण्याची तिला मुभा होती. आणि तिने नेमके हेच केले. त्यामुळे या नंतरच्या चित्रपटांनी जया पुन: उंचावली. बावर्ची, कोशिश, अनामिका, परिचय, जवानी दिवानी, जंजीर, शोर, अभिमान,—हे जयाचे प्रमुख यशस्वी चित्रपट. या खेरीज समाधी, गाय और गौरी या चित्रपटातून जयाने भूमिका केल्या. चित्रपटाच्या नावावरून धावती नजर फिरविली तरी एक गोष्ट लक्षात येईल,—की या पैकी एकही चित्रपट पूर्ण अयशस्वी झालेला नाही. आर्थीक यशाच्या संदर्भामध्ये सगळ्यात खालच्या पातळीवर समाधीचा नंबर लागतो. अनामिका, परिचय, जवानी दिवानी, जंजीर, शोर हे चित्रपट तर रौप्यमहोत्सवी ठरले. तर बावर्ची, व कोशिश या चित्रपटांनी जयाची प्रतिष्ठा वाढली.

ज्यांना करारबद्ध करण्यासाठी निर्मात्यांना जिवाचा आटापीटा करावा लागतो. ज्यांच्या तारखा मिळाव्यात म्हणून जोडे झिजवावे लागतात अशा मोजक्या कलाकारामध्ये जया भादूरी हे नाव केव्हाच जाऊन बसले आहे. १९६९ मध्ये चित्रपट व्यवसायामध्ये आलेल्या जयाने केवळ डझनभर चित्रपटातून कामे करून हे यश मिळविले, त्याचे श्रेय तिच्यापेक्षा, चित्रपटाची चोखंदळ निवड करण्याच्या तिच्या वृत्तीला द्यावे लागेल. एक नजर नंतर—आपण जवळ जवळ वीस चित्रपट नाकारले, असे तिचे म्हणणे आहे.

तिच्या चित्रपटाची नामावली वर दिलीच आहे. यापैकी बावर्ची, शोर, कोशिश, जंजीर हे जयाचे चार चित्रपट यशस्वी झाले, तरी ते जयामुळे यशस्वी झाले असे म्हणता येणार नाही. 'शोर' मधील तिच्या कामाचा ढंग अस्सल हिन्दी फिल्मी नायीकेचा होता. नेमका हाच साचा तिने जंजीर मध्ये वापरला. हिन्दी फिल्मी नायीकेचे परंपरागत रूप तिला अनामिका, जवानी दिवानी व गाय और गौरी, या चित्रपटातून उभे करावे लागले. आणि या वेळी तिने हे काम नेटकेपणे वजावले हे मान्य करावे लागेल. तिच्या पहिल्या तीन चित्रपटाखेरीज— अभिनेत्री म्हणून जयाचा 'Impact' असलेल्या चित्रपटामध्ये परिचय, अभिमान या चित्रांचा उल्लेख करावा लागेल. दोन्ही चित्रपटांच्या यशामध्ये तिचा सिंहाचा वाटा आहे. तिच्या या भूमिकांना जवळ जवळ पर्याय नाहीच असे माझे मत आहे.

### इन्स्टिटयूटमधील जया

फिल्म इन्स्टिटयूटमध्ये वावरत असताना आपली फारशी दखल घेतली जात नाही याची प्रारंभी तिला खंत होती. कदाचित काहीशा या न्यूनगंडाच्या भावनेतून—तिने भास्करबरोबर आपला स्नेह वाढवला असावा. कोणाच्याही डोळ्यावर यावे (किंबहुना ते यावे म्हणूनच) मोकळेपणे त्याच्याबरोबर ती वावरली. याच भास्करवरून गुलाबी प्रणयाचा वेध घेण्यात गढून गेलेल्या पत्रकारांनी केवढे काहूर उठवले. मंडळी त्यांचे लग्नही करून मोकळी झाली. निखळ स्नेह हे जया—भास्करच्या जवळकीचे स्वरूप नसावे, त्या पलीकडील भावनिक आपुलकी त्या दोघांमध्ये जरूर निर्माण झाली असावी, असे त्यांचा 'स्नेह' पाहिलेला कोणीही त्रयस्थ (माझ्यासारखा!) सांगू शकेल. पुढे कलकत्त्यामध्येही काही काळ ही मैत्री टिकून होती असे म्हणतात. मुंबईला आल्यावर मात्र जयाने निर्विवादपणे एकाच नावाचा ध्यास घेतला—आणि अखेर त्याच्याच—म्हणजेच अमिताभच्या नावाने मंगळसूत्र बांधले, या दोघांचा विवाह आज ना उद्या होणार याची जाणीव सर्वांना—अगदी तिच्या 'फॅन' मंडळींनाही असल्याने या प्रेमविवाहाचे स्वागत झाले. तरी राजेश डिम्पलच्या विवाहाप्रमाणे आश्चर्य मात्र कुणालाच वाटले नाही. अमिताभखेरीज एकाही कलाकाराबरोबर आपले नाव गुंतले जाणार नाही याची जयाने दक्षता घेतली. राजेश खन्नापासून विजय अरोरापर्यंत अनेक कलाकारांबरोबर तिने कामे केली पण—ते तिचे सहकलाकार ठरले. अमिताभबरोबर तिने जास्तीत जास्त चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. जंजीर आणि आता अभिमानच्या यशामुळे तिने या जोडीच्या माथी लागलेले बन्सी बिरजू व एक नजरचे अपयश धुवून काढले.

जया मध्यमवर्गीय कुटुंबातील. वडील पत्रकार. इन्स्टिटयूटला विद्यार्थिनी असताना बससाठी रांगेत उभी राहिल्यावर दहा पैशाचे नाणे हाताला घाम येईपर्यंत घट्ट धरून ठेवणारी ही मुलगी, इन्स्टिटयूट सोडल्यापासून केवळ दोन वर्षांनी इन्स्टिटयूटमध्ये आली ती स्वत:च्या शानदार गाडीतून. दार उघडायला शोफर, पाठीमागे चिटणीस सुशिलाबाई, शिवाय स्वत:चा मेकअप आर्टिस्ट व लेडी हेअर ड्रेसर एवढा जामानिमा घेऊन. पण आल्यावर लाइट बॉयीजपासून सर्वांची आस्थेने वास्तपुस्त केली. तुम्ही जुन्या चित्रपटतारका पहा. स्वत:भोवतीचे ग्लॅमर त्या काळजीपूर्वक जोपासत. बाई आल्या की कोण दबदबा. आज तेच यश जयाने संपादन केले आहे. पण नटीच्या भोवती असणारा हा खोटा भपका तिच्या भोवती नाही. अमिताभ—फिल्मी दुनियेत येण्यापूर्वीच चाळीस हजाराची गाडी त्याच्या सेवेस हजर होती. सोनेरी चमचा तोंडात ठेवून कवी बच्चनच्या या मुलाने, जया त्याच्या दृष्टीने फारशी अनुरूप नसूनही तिच्याबरोबर सूत जमवले. पत्नी म्हणून तिला घरात आणले. कालची ही गुड्डी चार-सहा महिन्यात माता होणार आहे. कलाकार म्हणून जया टिकून राहील. जाणकार पत्रपंडितांनी असे भविष्य वर्तवले आहे की, ७५ सालापूर्वी जया विस्मृतीप्राय होईल. बन्सी बिरजू, एक नजरच्या वेळी हे भविष्य विचार करण्याइतपत तरी होते पण आठ रौप्यमहोत्सवी चित्रपट (त्यामध्ये— गाय गौरी, जवानी दिवानीसारखे 'चालू' चित्रपट) आणि परिचय, अभिमानसारख्या तरल अभिनयाने नटलेल्या आणि जयाचा सुस्पष्ट ठसा असलेल्या सुंदर चित्रकृती जयाच्या नावे आज नोंदल्या गेल्या आहेत. तिचा मुद्राभिनय मोहक असला तरी त्याला मर्यादा आहेत हे वहिदा रेहमानचे मत ग्राह्य मानले, तरी हा दोष अगदी मीनाकुमारीपासून सर्वांच्या बाबतीत आढळतो. तात्पर्य काय—आघाडीची कलाकार म्हणून आता कोठे तिच्या कारकीर्दीला प्रारंभ होत आहे. पुढील सात-आठ वर्षे तरी बिनधोक आहेत. हां! आता तिने खुशीची निवृत्ती स्वीकारली तर भाग वेगळा.



मौसमीची सारी मदार आता राजेशबाबूंवरच.

# स्टुडिओ झलक

## एकेकाचे नशीब

पहिला चित्रपट तसा अयशस्वी ठरूनही प्रवीण बाबी ७३ ची ग्रेटेस्ट स्टार डिसकव्हरी ठरली. अपयशी ठरूनही प्रवीण यशस्वी ठरली, तर अनुरागचे उसळते यश वाट्याला येऊनही मौसमी चॅटर्जी या यशातील आपला वाटा उचलू शकली नाही. अनुरागच्या यशाचे सारे श्रेय नूतन व अशोककुमार घेऊन गेले. कच्चे धागे हे मौसमीचे दुसरे चित्र यशस्वीही झाले नाही, अयशस्वीही झाले नाही. सपाटून चालणारे आणि दणकन आपटणारे चित्रपट जेवढे लक्ष वेधून घेतात तेवढे हे तोंडमिळावू सपक चित्रपट लक्ष वेधू शकत नाहीत. तात्पर्य काय की कच्चे धागे किंवा अनुराग दोन्ही चित्रपटाद्वारा ठसा न उमटवलेली मौसमी राजेश बरोबरच्या आपल्या चित्रावर लक्ष ठेऊन आहे. चित्रपटाचा ढंग मद्रासी आहे. 'अपना देश' नावाचे एकदम कंडम चित्र देणारे जम्बू (काय नाव आहे!) मौसमीच्या या चित्राचे दिग्दर्शक आहेत. अर्थात मौसमी दिग्दर्शकापेक्षाही आपल्या नायकावर मदार ठेऊन आहे. राजेश बरोबर प्रथमच मिळालेला हा पहिला चान्स मौसमीचे भवितव्य ठरवील, असे प्रेक्षकांपेक्षा, टीकाकारांपेक्षा तिलाच जास्त वाटते.

### आपकी कसम

माल मसाला तोच नेहमीचा, मग कलाकारही तेच नेहमीचे हवेत. राजेश मुमताजचा, बंधन, सच्चा झूटा, अपना देश, दुष्मन–असा सेटच्या सेट यशस्वी ठरला आहे. चित्रांचा ढंग तोच, साज नवा. चित्राचे नाव आहे आपकी कसम. हां या वेळी निर्माता मात्र जागरूक आहे. सलग सहा यशस्वी चित्रांची सिक्सर मारणारे जे. ओम प्रकाश आखो आखो मे व राजारानी या दोन चित्राच्या अपयशाने खडबडून जागे झाले आहेत. राजेश मुमताजची हुकमी यशस्वी जोडी घेऊन आणि दिग्दर्शनाची जबाबदारी स्वतःच पत्करून ओम प्रकाश सादर करीत आहेत आपकी कसम.

या ओमप्रकाशचा जावई–राकेश रोशन याला प्रथम पडद्यावर पाहिला–तेव्हा वाटले हा शम्मी कपूरला रिप्लेस करणार. शम्मी कपूर जायचा तो गेलाच. त्याची नक्कल करणारा जॉय मुखर्जी त्याचेही तीन तेरा वाजले ! आणि आता राकेश रोशन पराया धन मध्ये चांगला हेमा बरोबर स्टार्ट मिळूनही सुस्थिर होऊ शकला नाही. संजय, प्रवीण बाबी, शिवकुमार यांच्या भूमिका असलेल्या 'त्रिमूर्ती' या चित्रामध्ये



शशीकपूर । रिंकू जस्वाल
रोमिओ । ज्युलिएट



वहिदा रहेमान । प्राण
खास ए. व्ही. एम्. शॉट



ही हुकमी जोडी हातात असली तरी...



राकेश रोशन
चाल शम्मीकपूरची
पण नशीब ?

राकेशची स्वारी तिसरी मूर्ती बनून येत आहे. झकास उंची, देखणे रूप लाभूनही भ्रष्ट नक्कल करण्याच्या प्रयत्नात राकेश रोशन काळवंडला आणि कोणतेही वैशिष्टय नसलेला अनिल धवन दहा-बारा चित्रपटातून येत आहे.

देव मुखर्जी, रामू मुखर्जी, सोमु मुखर्जी जॉय मुखर्जी–इतकी मंडळी मार खाऊन परत आली तरी मुखर्जी मंडळींची नवीन ' मुखर्जी ' भारतीय चित्रपट सृष्टीच्या सेवेत रुजू करण्याची खोड काही जात नाही.

हां–आता फरक इतकाच की येणारे नवीन मुखर्जी–पडद्यावर येण्याच्या अट्टहासाने न येता–पडद्यामागे राहून सूत्रे संभाळणार आहेत. ' मिस्टर रोमीओ ' हे सुभाष मुखर्जी (सुबोध मुखर्जींचे चिरंजीव) यांचे पहिले चित्र मुंबई मध्ये दाखल झाले आहे.

' चित्रपटाचे प्रत्येक दृष्य आपण एका विशिष्ट पद्धतीने का घेतले याची–सुस्पष्ट जाणीव दिग्दर्शकाला असली पाहिजे असे हे मुखर्जी म्हणतात. आता यांनी ती जाणीव कितपत ठेवली ते मिस्टर रोमिओ पाहून प्रेक्षकांनी ठरवायचे.

रिंकू जस्वाल ही इन्स्टिटयूट मधील ताजी भरती या रोमिओची जुलिएट आहे. तर रोमिओ आहे खाशी हिरोगिरी करण्यात (पहा जानवर और इन्सान मधील इन्सान) सध्या एकदम आघाडीवर असलेले छोटे कपूर. शशी कपूर.

कौटुंबीक चित्रांना नाके मुरडली तरी हे चित्रपट अजूनही बऱ्यापैकी चांदी गोळा करतात. आता इन्साफ मधील प्राण व वहिदा रेहमान यांचे इन्साफच्या सेट वरील हे छाया चित्र अगदी तसल्याच चित्राची आठवण करून देते की नाही. सुब्बाराव यांनी दिग्दर्शित केलेल्या या इन्साफ मध्ये तनुजा एका महत्त्वपूर्ण भूमिकेमध्ये चमकत आहे. ■

# कोल्हापूर वार्ता

मराठीतील रौप्यमहोत्सवी 'थापाडया' ह्या चित्रपटाचे दिग्दर्शक प्रभाकर नायक यांचे एक तुफान विनोदी व ग्रामीण असे चित्र 'वरात' कोल्हापूरला जयप्रभा स्टुडिओमध्ये वेगाने चित्रित होत आहे. शानो मुव्हीज, पुणे या नवोदित चित्रसंस्थेने हा चित्रपट हाती घेतला असून डिसेंबर २० ते ३० या दहा दिवसात या चित्रपटाचे अखेरचे चित्रीकरण कोल्हापूरला पूर्ण करण्यात येणार आहे. मार्च ७४ च्या सुमाराला हा चित्रपट पुण्यासह अखिल महाराष्ट्रात प्रदर्शित केला जाईल. ह्या चित्रपटाची गीते मा. दा. देवकाते यांनी लिहिली असून त्यांच्या गाण्याला संगीत दिग्दर्शक बाळ पळसुले यांनी सुरेल साज चढविला आहे. या चित्रपटात मराठीतील आजची यशस्वी जोडी उषा चव्हाण आणि निळू फुले हे प्रमुख भूमिकेत चमकत आहेत. त्यांच्या बरोबर मोहन चोटी, इंदुमती पैंगणकर, मीना टी व जयश्री टी इत्यादी वरातच्या कथेला साकार करीत आहेत. हा चित्रपट सुरम्य चित्र प्रकाशन, भानुविलास थिएटर कंपाऊड, पुणे ३० यांच्यामार्फत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकमध्ये वितरीत केला जाणार आहे.

मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार र. वा. दिघे यांच्या 'कार्तिकी' या कथेवरून याच नावाचा चित्रपट धनश्री चित्रातर्फे जयप्रभा स्टुडिओ, कोल्हापूर मध्ये चित्रित होत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन दत्ता माने हे करीत आहेत.

'सती अरुंधती' या नावाचा चित्रपट तयार होत आला असून या चित्रपटाचे लेखक जयवंत वालावलकर असून संगीत दिग्दर्शन बाळ पळसुले यांनी केले आहे. गिरीराज मूव्हीज या संस्थेतर्फे सदर चित्रपट तयार केला जात आहे.

या चित्रपटाचे वैशिष्ठच असे की याचा मुहूर्त शांताराम बापूंच्या हस्ते त्यांच्या नवीन राजकमल रेकॉर्डिंग थिएटरमध्ये करण्यात आला आहे. सदर चित्रपट पूर्ण झाला असून त्याचे संकलनाचे काम श्री. गंगाराम मातफोड हे करीत आहेत.

मराठी चित्रपटाचा इतिहास घडवणाऱ्या प्रभात फिल्म कंपनीचे भागीदार पैगंबरवासी फतेलाल यांचे चिरंजीव यासिन आणि मराठीतील आजचे लोकप्रिय संगीत दिग्दर्शक राम कदम या दोघांनी मिळून 'सुगंधी कट्टा' हा वास्तव आणि सत्य घटनेवर आधारलेला चित्रपट नुकताच कोल्हापूरच्या शांतकिरण स्टुडिओत पूर्ण केला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन वसंत पेंटर यांनी केले आहे. संगीत राम कदम यांनी दिले आहे.

यशस्वी जोडी    निळू फुले । उषा चव्हाण






राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच, संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर